
साप्ताहिक

# माणूस

२१ जुलै ८४/दोन रुपये

अन..
शब्दांचा प्रपंच सगळा
कमळासम हा मिटला ग..



विंबल्डन
१९८४



नागपूरात
गाजलेलं
एक
प्रकरण

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : चोविसावे
अंक : आठवा

२१ जुलै १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
सुरेश नावडकर

## सप्रेम नमस्कार, माणूस

'लष्कर आणि लोकशाही' हे संपादकीय व 'कितीही झाले तरी हिंदू व शीख भाऊ भाऊ आहेत' हा अभय गोखले यांचा लेख वाचल्यावर विसंगती लक्षात येते. संपादकांनी लष्करी कारवाईची अपरिहार्यता मान्य केली असली तरी ही परिस्थिती उत्पन्न होण्यास शासन व इंदिराजींचा पक्ष कारणीभूत आहे असे आपले मत मांडले आहे. या मुद्द्यावर किती भर द्यावा ( आजच्या परिस्थितीत ) यावर मतभिन्नता झाली तरी आपण शिखांना मात्र फुटीरतेच्या राजकारणाला जवळ केल्याबद्दल अजिबात दोष देत नाही. सुवर्णमदिराचे शस्त्रागारात रूपांतर केल्याचे आता पुराव्यानिशी सिद्ध झाले असतानाही शिखांना झालेल्या कृत्याबद्दल कमीपणा वाटत नाही. उलट सुवर्णमदिरातून लष्कर जावे यासाठी केंद्रीय मंत्री बुटासिंगपासून मंडळी प्रयत्नशील आहेत.

श्री. अभय गोखले यांनी मात्र शिखांना सुनावले आहे. त्याचे माप त्यांच्या पदरात टाकले आहे. 'भारतातील बहुसंख्य मुस्लिमांप्रमाणे शिखाच्यात अलगतेची भावना बाळीस लागेल व तिला तेच जबाबदार असतील सुवर्णमंदिरातील लष्करी कारवाईबद्दल हिंदूनाही यातना होत आहेत. कारण कितीही झाले तरी हिंदू व शीख भाऊ–भाऊ आहेत. रागावलेल्या भावांची समजूत आपणच घालावयास हवी !'

श्री. गोखले यांनी संयमित भाषेत शीख व हिंदू दोन्ही जमातींना उचित मार्गदर्शन केले आहे.

मला वाटते अशा परिस्थितीत संपादकीय समतोल विचारांचा, प्रबोधन म्हणून अधिक उपयोग होतो. कॉंग्रेस पक्षाने अगर इंदिराजींनी या प्रश्नाचे स्वपक्षासाठी राजकारण करू नये असे सुचवताना इतरांनीही ते पथ्य पाळावयास हवे. शीख समाजाला योग्य मार्गदर्शनाची जरुरी आहे. अतिरेक्यांचे हातचा शीखसमाज गेले चार वर्षे बाहुले बनला होता. खलिस्तानचा ना त्यांना लाभ ना देशाच्या एकतेला उपयोग. भारत एक प्रकारे फुटीरतेच्या कड्यावर उभा आहे. लष्करशाही यावयास नको असेल तर वृत्तपत्रांवर खास जबाबदारी आहे. 'माणूस' सारख्या राष्ट्रवादी व सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या नियतकालिकाकडून उचित मार्गदर्शनाची अपेक्षा आहे.

१ जुलै, १९८४ वि. शं. गोखले
घाटकोपर

दिनांक १६ व २३ जूनच्या अंकात डॉ. कि. मो. फडके यांचे 'मन:चक्षूचे सामर्थ्य' हे लेख वाचले. व्यक्तीच्या वाईट सवयी दूर कशा कराव्यात, चांगल्या गोष्टी कशा आचरणात आणाव्यात, हे मन:चक्षूचे साध्य आहे हे पटले; परंतु हल्लीच्या तरुण पिढीतील वाईट सवयीबद्दल, उदाहरणार्थ धूम्रपान, मदिरापान, वास्तवाकडे पाठ फिरवणे यावर उपाय दिला असता तर जास्त उपयोग झाला असता.

४ जुलै, १९८४ चं. द. तासे
विलेपार्ले

पुणे वार्ता

# निवासी डॉक्टर्स...

आज महाराष्ट्रात अनेक ठिकाणी निवासी डॉक्टरांचा संप चालू आहे. या सपाची परिस्थिती पुण्यात काय आहे हे बघण्यासाठी जेव्हा पुण्याच्या बी जे. मेडिकल कॉलेजात चक्कर टाकली तेव्हा तेथील निवासी डॉक्टरांच्या सपाबाबत तेथील: विद्यार्थी–प्रवक्त्याने सागितले ते असे . . . .

□

महाराष्ट्र शासनाने गेल्या वर्षी म्हणजे ८३–८४ साली महाराष्ट्रात अनेक नवीन इंजिनियरिंग महाविद्यालये (पदवी व पदविका) सुरू केली आहेत. ही सर्व महाविद्यालये विनाअनुदान तत्त्वानुसार निघालेली आहेत आणि याच धर्तीवर यदा महाराष्ट्रात तीन नवी वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यासाठी सरकारने परवानगी दिलेली आहे. अमरावती, प्रवरानगर आणि कराड येथे ही महाविद्यालये येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरू होतील असे सरकारने जाहीर केल्यावर, या नव्या खाजगी महाविद्यालयांना विरोध करण्यासाठी राज्यातील चार हजार निवासी डॉक्टर दहा जुलैपासून बेमुदत संपावर गेलेले आहेत. या निवासी डॉक्टरांच्या संपाला पाठिंबा म्हणून राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी दडावर काळ्या फिती लावून काम करीत आहेत. पुण्यातील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शासनाच्या निर्णयाच्या निषेधार्थ व निवासी डॉक्टरांना पाठिंबा दर्शवण्यासाठी म्हणून दिनाक १३ जुलै रोजी एक मूक मोर्चा काढला. या मोर्चात दीड हजार विद्यार्थी होते.

महाराष्ट्र राज्य निवासी डॉक्टर संघटनेच्या (माई) प्रवक्त्याने याबाबत संघटनेची भूमिका स्पष्ट करताना सागितले की, मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया व केंद्र सरकार यांची अधिकृत मान्यता न घेता महाराष्ट्र शासनाने पाच नवीन वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यासाठी परवानगी दिली आहे. केंद्र सरकारनेदेखील अशा प्रकारची महाविद्यालये सुरू करण्याबाबत वेळोवेळी आपला विरोध दर्शवला आहेच. आज महाराष्ट्रातील शिक्षणाला निश्चितच काही तरी दर्जा आहे. कर्नाटक, बिहार आणि ओरिसा येथील वैद्यकीय महाविद्यालयाची मान्यता इंडियन मेडिकल कौन्सिल (IMC) ने काढून घेतलेली आहे. कारण तेथील शिक्षणाचा दर्जा हा वादाचाच मुद्दा आहे.

ही सर्व महाविद्यालये विनाअनुदान तत्त्वावर चालविण्यात येणार आहेत. मध्यतरी महाराष्ट्र शासनातर्फे असे अधिकृतरीत्या जाहीर केले गेले होते की, शासन प्रत्येक वैद्यकीय विद्यार्थ्यामागे कमीत कमी १ लाख रुपये खर्च करते. जर नवीन महाविद्यालये ही विनाअनुदान तत्त्वावर चालविण्यात येणार असतील तर विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च होणारी प्रचड रक्कम ते कोठून उभी करणार? उत्तर अगदी साधे आहे, त्याच विद्यार्थ्यांकडून. तेथे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून मोठमोठ्या कॅपिटेशन फीज मोठ्या प्रमाणात वसूल केली जाण्याची शक्यता आहे. त्याप्रमाणेच येथे प्रवेश हा पैशाच्या जोरावरच असल्याने तेथील विद्यार्थ्यांच्या दर्जाबाबत काही न बोललेलेच बरे आणि या सर्वांमुळे वैद्यकीय शिक्षण व वैद्यकीय व्यवसाय याचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान होणार आहे. वरील महाविद्यालयांत गरीब पण हुशार विद्यार्थ्यांस प्रवेश मिळूच शकणार नाही. म्हणजे शिक्षण हे फक्त श्रीमंतांसाठीच आहे का? असा प्रश्न उभा रहातो.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील, दुर्गम भागातील गरीब लोकांना वैद्यकीय सोयी उपलब्ध होण्यासाठी म्हणून ही नवी महाविद्यालये काढण्यात येत असल्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील म्हणतात. ते म्हणतात की ग्रामीण भागातील डॉक्टरांच्या जागा पण भरल्या जात नाहीत. पण सध्या परिस्थिती अशी आहे की, ग्रामीण भागातील ३९४० जागांपैकी ३९०१ जागा भरलेल्या आहेत व फक्त ३९ जागा रिकाम्या आहेत. ग्रामीण भागात पुरेसे डॉक्टर्स नाहीत हे खरे; पण जेथे डॉक्टर्स आहेत तेथे तरी निदान अत्यावश्यक अशी औषधे वेळेवर व पुरेशा प्रमाणात पुरवणे आवश्यक आहे.

वरील खाजगी महाविद्यालयांतून बाहेर पडलेले विद्यार्थी हे तरी ग्रामीण भागात जाऊन व्यवसाय करतील का? नाही. कारण अगदी उघड आहे की, त्यानी शिक्षणासाठी घातलेले लाख–दीड लाख रुपये भरून काढण्यासाठी ते शहरातील श्रीमंत रुग्णाचीच सेवा करणार व अशा तऱ्हेने शहरातील डॉक्टराच्यातच वाढ होणार. केंद्रसरकारच्या हेल्थ स्टॅटिस्टिक्सच्या १९८३ च्या अंकात म्हटले आहे की, ३१–१२–८२ पर्यंत देशात १२४९९ डॉक्टर्स बेकार होते. त्यापैकी महाराष्ट्रात ११२२ बेकार डॉक्टर्स होते. याच तुलनेने आज ही सख्या जवळजवळ ४००० च्या जवळपास आहे असे असताना आपले महाराष्ट्र सरकार म्हणते की, येथे डॉक्टर्स कमी पडत आहेत.

आज जी सरकारी वैद्यकीय महाविद्यालये आहेत त्यामध्ये देखील पुरेसा शिक्षकवर्ग नाही. पुण्याच्या ससून रुग्णालयातील एकूण ३०९ शिक्षकाच्या जागांपैकी १।३ म्हणजे ९८ जागा या अद्यापही भरल्या गेलेल्या नाहीत व ऑनररी डॉक्टराच्या २२ जागा रिकाम्या आहेत. आज सरकारी महाविद्यालयातच तज्ज्ञ शिक्षकांची कमतरता आहे. अशा परिस्थितीत नव्या महाविद्यालयांचा शैक्षणिक दर्जा काय राहील?

या निवासी डॉक्टराच्या सपामुळे रुग्णांची मोठी गैरसोय होणार असल्याचे सघटनेस मान्य आहे. परतु या संपकाळात जे गरजू रुग्ण असतील त्याची गैरसोय होऊ नये म्हणून या रुग्णावर उपचार करण्यासाठी प्रत्येक रुग्णालयाच्या बाहेर सघटनेतर्फे वैद्यकीय उपचारकेंद्रे चालवण्यात येणार आहेत. ही मदतकेंद्रे चालवण्यासाठी आवश्यक ती औषधे व इतर आर्थिक मदत याच विद्यार्थी व डॉक्टरांनी गोळा केली आहे.

–राजेंद्र सखदेव

# ऐसे केले चोज सुकृताचे

## —बा. भ. बोरकर

कविवर्य श्री. बा. भ. बोरकर गेले. वाटले होते, काव्याची ईश्वरी देन असलेले हे प्रेमार्द्र सत आषाढी एकादशी गाठणार. ते बेशुद्ध, अत्यावस्थ असल्याच्या बातम्या पाच-सहा दिवस वृत्तपत्रातून येत होत्या. कसनुसे वाटत होते. एकादशीला पाडुरंगरुपी विलीन होण्यासाठी त्याचा प्रवास जणु आदल्या दिवशीच सुरू झाला. 'कांचनसंध्ये'तील 'काही अभगा'तून त्यांनी म्हटल्याप्रमाणे

अनायास फिटे ऐहिकाची आस,
राहिला प्रवास थोडा आता.
चालविला भला सारा योगक्षेम,
दिले स्नेहप्रेम गेलो तेथे
हिशेबावाचून ज़मविला ताळा
अनृणी गोपाळा केले मज.

( पृष्ठ १३३ )

श्री. बोरकर गेले हे कळताच प्रथमत: जाणवले की जणु महाराष्ट्राचे रवीद्रनाथच गेले. दोघेही आनंदयात्री. काव्याच्या 'सरीवर सरी'नी साऱ्याना 'सचैल' खिळवून ठेवणारे, यमक– अनुप्रासांच्या छुनछुन् पैजणांनी देहभान हरपून टाकणारे...

मन तर पार मागे भूतकाळात गेले. १९५५–५६ ही वर्षे असतील– नुकतीच मी मॅट्रिक झाले होते. स्थानिक कविसमेलनातून कविता वाचायला केव्हा केव्हा जात होते. पण 'पुणे आकाशवाणी'वरील कविसमेलनात भाग घेण्याचा तो पहिलाच प्रसग असावा. खूपच बुजलेली होते मी. त्या वेळी श्री. बोरकर पुणे आकाशवाणीकेंद्रात अधिकारी होते. प्रथम त्याच्या ऑफिसमध्येच त्यांनी आमच्याकडून कविता वाचून घेतल्या. प्रत्येक नव्या कवीला जणु कवितावाचनाचा पाठच ते देत होते. शब्द कुठे तोडावे, जशी लिहिली तशीच नैसर्गिकपणे कविता कशी वाचावी, वगैरे. नव्या कवीबद्दल, कवितेबद्दल त्याना जरूर आस्था होती; पण उघडेवाघडे, अश्रवणीय शब्द, बीभत्सपणा याचे त्याना निश्चितच वावडे असावे. एका कवीसंमेलनानंतर ते नर्मविनोदाने म्हणाले होते, 'मला तालचित्रेही आवडत नाहीत अन् बेताल चित्रेही!' कविता वाचून होईतो माझ्या तर जिवात जीव नव्हता; पण तेवढ्यात हसून ते म्हणाले, 'छान वाचतेस तू कविता, अगदी अकृत्रिमपणे––तालात. मला तर वाटते, कविता तू चांगल्या गाऊ शकशील. कविता गायली तर श्रोत्यांच्या अंत.करणाचा ठावच घेते.' आणखीही काही ते बोलले; पण मला ऐकूच कुठे येत होते... पाठ्यपुस्तकातील छायाचित्रावरून केवळ तोडओळख असलेले सर्वार्थाने सुदर कवी साक्षात समोर बसले होते. नंतर प्रत्यक्ष त्याच्या कविताही ऐकायला मिळणार होत्या. केवढा आनद!...

कविसमेलन झाल्यावर त्यानी आम्हा सर्व १५–१६ कवि–कवयित्रीना घरी चहाला बोलावले होते. शिवाजीनगर स्टेशनजवळ त्या वेळी त्याचे घर होते त्यांच्या त्या स्नेहार्द्र आतिथ्याने आम्ही सारेच भारावून गेलो. कविराजाच्या साध्यासुध्या पत्नी–ते स्वयपाकघर–गोकुळासारखं भरलेले घर अजूनही डोळ्यापुढे येते.

त्याचा तो अनुनासिक लडिवाळ स्वर तर साऱ्यांच्याच कानात भरून उरलेला.

'घन वरसें रें, घन वरसें रें, वरसें जळ सर आले सरसर मल्हाराचे स्वरसें रें, घनऽऽ वरसें रें.'

गंमत म्हणजे त्याची कविता मी प्रथम वाचली ती त्यांच्या कोणत्याही संग्रहातून नव्हे. माझ्याहून पाच–सहा वर्षांनी मोठा असलेला भाऊ, बोरकर–कुसुमाग्रज ही तर त्याच्या पिढीची आराध्यदैवते, त्याच्या वहीत या दोघांच्याही खास कविता उतरवून घेतलेल्या असत. नववीत असताना त्या वहीतील कविता मी नेहमी वाचत असे. तीच कविता आजही अचानक आठवून गेली...

तुला मला उमगला जिव्हाळा जन्माचा
पट फिटला ग
अन् शब्दाचा प्रपंच सगळा कमळासम हा
मिटला ग
तुला पहाता पहाट वाटे ओती कुरणे
मोती ग
प्रभेस मिळती कृतार्थ होती अभिलाषांच्या
ज्योती ग
आलिंगन–चुबनाविना हे मीलन अपुले
झाले ग
पहा, पहा, परसात हरीच्या रुमडाला
सुम आले ग

—'आनंद भैरवी' पृष्ठ १५

श्री. बोरकर देहरूपाने गेले असतील; पण त्यांच्या हजारो कविता वाचकाच्या, श्रोत्यांच्या अंत करणात विराजत आहेत. फार थोडला कवीच्या ललाटी ही भाग्यरेखा असते. विरागी तरी ऐश्वर्यशाली शब्दप्रभू. त्यांच्याच शब्दात सागायचे तर...

मी विझल्यावर त्या राखेवर
नित्याच्या जनरितीप्रमाणे
विस्मरणाचे थड काजळी
उठेल थडगे केविलवाणे.
मी विझल्यावर त्या राखेवर
पण कोण्या अवसेच्या रात्री
घुळित विखुरल्या कविता माझ्या
धरितिल चद्रफुलांची छत्री.

—'चैत्रपुनव' पृष्ठ ११०

'आनदभैरवी', 'चित्रवीणा', 'चैत्रपुनव', 'अनुरागिणी', 'चांदणवेल' अगदी अलीकडला 'काचनसंध्या' हे श्री. बोरकराचे सारे सग्रह पाहिले की वाटते, ओथंबून लवलेला मेघ झिरमिर झिरमिर झरतो आहे... झरत राहणार आहे. आपणच आकंठ पान करायला असमर्थ आहोत. त्यांच्या चिरतरुण कवितेला जराजीर्णतेचा जराही शाप नसावा. किंवा उ:शाप घेऊन आलेले ते जणु स्वर्गातील यक्षगधर्वच. 'चैत्रपुनव' मधील पहिल्याच कवितेत ते म्हणतात,

'अजून तरुण मी, अजून तरुण मी
अजून उगवे अरुण मनात,
अजून भ्रमरसा भुरळुनि भ्रमतो,
सकाळचा मी कमलवनात' ( पृष्ट १ )

अर्धामुर्धा आषाढ संपण्यापूर्वीच त्यांनी यात्रा संपवली. या वर्षीचा श्रावण त्यांच्या

कवितेला अंतरला. 'चत्रपुनव' मधल्याच 'घन लवला रे' मध्ये ते म्हणतात,

'घन लवला रे घन लवला रे
क्षणभर श्रावण सवला रे
जरतारांचा फुलून मांडव
अनल जिवींचा निवला रे' (पृष्ठ ५)

साठीच्या जवळपास पोचल्यावर झालेली ही जणु विशी-पंचविशीतील एक कविता पहा—

'पौषातिल ऊन गडे' 'चैत्रपुनव'
(पृष्ठ ९५)

पौषातील ऊन गडे :
रजताच्या झारींतुन
झाडांवर सोनसडे...
केळीचें पान पहा
उजळ किती, नितळ किती :
वाळचानें भिजलेलें
उर्वशीचें वस्त्र उडे...
पौषातिल ऊन गडे :

'कांचनसंध्ये' तील 'न्यूयॉर्कमधील चंद्रास' (पृष्ठ ४६) ही गोव्याच्या विरहाने व्याकुळ अशी कविता आपलेही मन विषण्ण करून जाते.

'न्यूयॉर्कच्या गगनभेदक राउळांत
मी राहतों तरि सदा असतों बिळांत :
तेथून व्योम कुठले? सगळाच भिंती!
भिंतीसवें चढत जाति अनंत खंती!
आधार डॉलर इथे—प्रभु तोच एक :
त्याच्यापुढे न गणितो कुणि बापलेक,
यंत्रास बद्ध सगळे नच शांति कोणा
जो तो झुरे उरिं वरी करितो बहाणा
आता चल गडधा घरास उद्याच जाऊ
गोव्यातल्या जनवनांत सुखें विसावूं,
हिंडूं कुळागर, तलाव, समुद्रवेला,
सारा प्रदेश तव राजरसीं भिजेला'

'दिसली नसतीस तर' ही एक मुक्तछंदातील कविता ('कांचनसंध्या', पृष्ठ ८३) या कवितेआधी मुक्तछंदातील काही चिंतनिकाही त्यांनी लिहिल्या आहेत; पण सदैव मुक्तछंदात वावरणाऱ्या बोरकरांना कवितेतला मुक्तछंद मात्र फारसा मानवलासे वाटत नाही. कदाचित त्यांची गोड सुडौल छंदोबद्ध रचना वाचण्याचे व्यसन आपणा वाचकांस जडून गेले असावे.

'ज्ञानियाला सोपानाचा' ('कांचनसंध्या', पृष्ठ ५४) या कवितेत वत्सल कौटुंबिक असे बोरकर उभे दिसतात.

'तुझ्या रचनेच्या चोजा वहिनीच्या
'वाटाघाटी'
'अतोनात' नातवंडे झोंबतात सहीसाठी;
जगीं दुःख झालें फार लोक विसरले हसूं,
लाव पान, ऊठ गडया, पुन्हा मैफलीला बसूं,
परवाच मुक्तामाता गेली बहिणाये भेटी,
सुखें सारून करिती दोघी तुझ्यामाझ्या गोष्टी
त्यांच्याकडे तुला-मला अंती जावयाचे आहे,
नको पण इतुक्यांत, ऱूप गावयाचें आहे'

'चैत्रपुनव' मधील 'जपानी पोरगी' (पृष्ठ १३०) ही एक खटचाळ गंमतीदार कविता. साठीबुद्धी नाठीतला भरपूर खोडकरपणा यात आहे.

'काबूलहून माझ्या मुलानेंच
ही मला आठवणीनें पाठवून दिली
मी त्याला लिहिले :
'तुझी आई नातवंडांत गुंतली आहे,
तेव्हा दुधाची तहान ताकावर भागवायला
—म्हणजेच आंबटशौकाला—
ही ठीक आहे'

'चल कवडी आण दह्याची' ('कांचनसंध्या', पृष्ठ २४)

—मनात सतत कुटुंबाची ओढ असलेल्या त्यांच्यातल्या मुशाफराची ही कविता.

'मी मुशाफरीस निघालों,
चल कवडी आण दह्याची :
होईल उरीं ती माझ्या
पाकळी तुझ्या हृदयाची
राहुं दे वळकटी—लोटा
का वृथा उद्याचें ओझें?
पाऊल पडेल जिथे हे
भेटेल कुणी मज माझें!
जरि रान भेटलें वाटे
ते तुझेंच गाइल गान
जपतील उशाशी पानें
अन् तुझेंच पंचप्राण'

महात्माजींवरील 'साबरमतीकाठी' आदि कविताही या संग्रहातून आहेत. स्वातंत्र्य-संग्रामाच्या, गोवामुक्तिसंग्रामाच्याही आहेत; परंतु श्वासोच्छ्वासाइतकी नैसर्गिक अशी त्यांची कविता म्हणजे प्रेमकविता...चांदण्यावर नक्षत्रमोत्यांची उधळण करणारी. त्यांचे कथासंग्रह, ललितलेखसंग्रह, कादंबऱ्या तेवढ्याच तोलामोलाच्या. परंतु कविता हे त्यांचे जीवनस्पंदन हेच खरे.

तीन—चार वर्षांपूर्वी एका दिवाळी अंकात वैषयिक सत्य अनुभवावर आधारित एक लेख त्यांनी लिहिला होता. तो मला फार खट. कला होता. वाटले आपल्या मनातली बोरकरांची प्रतिमा कायमची डागळली गेली. पण आज वाटते, अशी प्रतिमा तयार करण्याचा आणि पुन्हा ती डागळली म्हणून रडण्याचा आपल्याला काय अधिकार आहे? शेवटी कोणी कसे जगावे—काय लिहावे हे ज्याचे त्याचे ऐहिक आहे आणि मजसारखा एखादा वाचक अशा एखाद्या गोष्टीसाठी चिडला तरी बोरकरांच्या कवितेची थोरवी तसूभरही कमी होऊच शकत नाही. आता तर सर्व रागालोभांच्या पल्याड ते जाऊन पोचले आहेत. जिवंतपणी त्यांच्या आत्म्याला त्यांच्या कवितेनेच अविरत शांती दिली. आता ईश्वराच्या अंकी तीच शांती चिरंतन झाली आहे!

—सौ. अंजली ठकार





# पँथर्स चळवळीतली तीन प्रमुख व्यक्तिमत्त्वे . . .

" नामदेव काळासावळा, उंचापुरा—५ फूट ८–९ इंच आणि सडपातळ. अतिशय एक्स्प्रेसिव चेहरा व डोळे सतत हसणारे, सतत कशाचा तरी नवीन प्रकारे शोध घेण्यात दंग.

□

राजा खरा डाउन टू अर्थ, अर्थली माणूस. या मातीचा, जगाचा, व्यवहाराचा. बुटका आणि सर्व बुटक्यांचा आत्मविश्वास स्वतःकडे राखून असलेला.

□

भाई संगारे तसा दिसायला सॉफ्ट माणूस. चांगले नाकडोळे, मध्यम उंची आणि बॉर्न लीडर.

पँथर चळवळीतली ही तीन प्रमुख नोटेबल व्यक्तिमत्त्वं !"

□

" पण सांगा, कोणती डावी चळवळ आज टिकून आहे ?

कम्युनिस्ट पार्टीच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या !

समाजवादयांची तर हाडंही शोधून सापडणार नाहीत.

इव्हन उजव्या चळवळींना इंदिरेने धुळीला मिळवलं आहे.

अशा या जबरदस्त मोनॉपली कॅपिटॅलिझमच्या शक्तिशाली भांडवलशाही समाजात पँथरचं जे काही टिकून आहे ते खूपच आहे असं मला वाटतं. "

□

नुकताच दलित पँथरचा १२ वा वर्धापनदिन पुणे येथे साजरा झाला. या निमित्त या सर्व चळवळीचा व तिच्या यशापयशाचा कॉम्रेड जयंत प्रधान यांनी घेतलेला शोध !

**माणूस पुढील अंकी...**

# फळ हे एक तपाचे

राजधानी दिल्ली

# आषाढस्य प्रथम दिवसे....

निशिकांत मिरजकर

जूनचा पहिला आठवडा संपला की महाराष्ट्रात पावसाळा सुरू होतो. मृगनक्षत्र लागले की, आमच्या लहानपणी आई सकाळी सकाळी हिंगाचे पाणी प्यायला द्यायची. त्यामुळे पावसाळ्यात पोटाचा त्रास होत नाही, अशी समजूत होती. किती तरी वर्षे ही प्रथा आमच्याकडे चालू होती. त्यामुळे त्या ७ जूनच्या दिवसालाच कसा हिंगाच्या पाण्याचा वास लपेटलेला आहे.

इतक्या वर्षांनी, महाराष्ट्रापासून इतके दूर आल्यावरही, ७ जून उजाडला की हिंगाच्या पाण्याचा वास जाणवायला लागतो. हुरहुरते ढगाळ वातावरण आठवते; पण दिल्लीत तर तेव्हा उन्हाळा ऐन भरात असतो. हवा तापत असते तगमग होत असते. या वर्षी, गेल्या चाळीस वर्षांत नव्हती एवढी उन्हाळ्यात तलखली होत होती; पण ओढाळ मन हिंगाच्या पाण्याच्या वासाभोवती घुटमळत होतेच. तापलेल्या जमिनीवर टपटपणाऱ्या मृगाच्या स्पर्शाने दरवळणारा कस्तुरीसारखा मादक मृद्गंध चाहूल घेऊन शोधत होते. महाराष्ट्रातल्या पावसाच्या बातम्या त्याची चाहूल गडद करीत होत्या. रोज मान्सून किती पुढे सरकला त्याची बित्तंबातमी टी. व्ही.च्या बातमीपत्रातून मिळत होती. दिग्विजय गाजवून घरी परतणाऱ्या जिवलगाच्या स्वागतासाठी आतुरलेल्या विरहिणीच्या हृदयाने त्याच्या प्रवासाची नोंद टप्प्याटप्प्यागणिक आपल्या स्पंदनात सामावून घ्यावी, त्याप्रमाणे मान्सूनच्या प्रत्येक पुढारलेल्या पावलाची नोंद घेतली जात होती. उन्हाळ्याचा ताप जास्त जास्त सहन होईनासा होऊ लागला होता.

दिल्लीमध्ये मान्सूनचे आगमन साधारणपणे २९ जूनला होते. त्या रात्री आम्ही बाहेर गच्चीत झोपलो नाही. ३० जूनला पहाटेच आभाळ भरून गेले. या दिवसांत रोज पहाटे साडेपाचला सूर्योदय होतो. पाच वाजल्यापासूनच उजाडलेले असते; पण त्या दिवशी पाच वाजता उजेड गुदमरलेला होता. विजाही चमकू लागल्या आणि सूर्योदयाच्या सुमारास सोनेरी किरणांऐवजी सरसरून कोसळणाऱ्या जलधारांनी दिल्ली न्हाऊन निघाली!

त्या दिवशी आषाढप्रतिपदा होती. आषाढाचा पहिला दिवस! शेकडो वर्षांपूर्वी याच दिवशी एका महाकवीच्या व्याकुळ प्रतिभेने गिरिशिखरावर ओणवलेला पहिला मेघ पाहिला होता. प्रेमक्रीडा करणाऱ्या भव्य हत्तीशी त्या मेघाची त्याने तुलना केली होती. सृष्टीचे हे सौंदर्यरूप पाहून त्याला इतका हर्ष झाला होता की, प्रियेच्या विरहाने झुरणाऱ्या आपल्या काव्याच्या नायकाचा संदेश पाठविण्यासाठी या दूताची योजना त्याने केली होती. त्याची ही कल्पना या देशाच्या सांस्कृतिक वैभवात कोंदणाप्रमाणे जाऊन स्थिरावली. शेकडो वर्षे रसिकांच्या मनाला तिने भुरळ घातली. 'आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुम्। वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श॥' ह्या ओळी भारतीय कवितेचे एक भूषण ठरून बसल्या. महाराष्ट्रात असताना या ओळीमागील हृद्य भावार्तता जाणवली, तरी त्याचे औचित्य पूर्णार्थाने लक्षात आले नव्हते. तिथे ज्येष्ठातच असे विशालकाय मेघ आकाशाच्या अंगणात प्रवेश करतात. 'ज्येष्ठआषाढात मेघाची दाटी। कडाडे चपला होतसे वृष्टी' हे तिथल्या निसर्गाचे रूप. त्यामुळे आषाढातल्या पहिल्या दिवशी उगवलेल्या मेघाचे काय कौतुक? पण तीन महिन्यांच्या प्रखर उन्हाळ्यानंतर, बरोबर आषाढप्रतिपदेला हत्तीसारखे प्रचंड मेघ आकाशात प्रविष्ट झालेले पाहिले आणि 'आषाढस्य प्रथमदिवसे' या ओळीचे सारे मर्म मनाच्या गाभ्यापर्यंत जाऊन पोचले.

दिल्लीचा पाऊस मोठा वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रारंभी आपल्याकडचे लोक 'दिल्लीला पावसाळा कसा असतो?' असे कुतूहलाने विचारू लागले की त्यांना काय उत्तर द्यावे हे कळेनासे होई. कारण महाराष्ट्रातल्यासारखा 'पावसाळा' इकडे दिल्लीला नसतोच. अजिबात नसतो. ती विशिष्ट ओली सर्द हवा, ती वेळीअवेळी होणारी पावसाची रिपरिप, तो चिखल, न वाळणारे कपडे, निथळणाऱ्या छत्र्या, रेनकोटस् वगैरे पावसाळ्याची खास रूपे इकडे कधी आढळतच नाहीत. २९ जूनला दिल्लीमध्ये मान्सून प्रवेश करतो, पण 'पावसाळा' सुरू होत नाही. पाऊस उन्हाळ्यात आणि हिवाळ्यात पडतो. वर्षभर केव्हाही पडतो. फक्त मान्सूनच्या पावसाला 'मान्सूनचा पाऊस' म्हणायचे आणि इतर वेळी दुसरे काही तरी नाव द्यायचे.

## जांभळा बहार

इथल्या पावसाने 'पावसाळी हवा' तयार होत नाही. जणू पावसाचे हवेशी नातेच नाही. तो आपला स्वतंत्रपणे येतो, मस्तीत वावरतो आणि जातो. पाऊस येण्यापूर्वी काळ्याकुट्ट मेघांनी आकाश भरून गेलेले असले, तरी सरसरून पाऊस पडून गेल्यावर पुन्हा लख्ख ऊन पडते. एकांतात प्रियकराला भेटून पुन्हा साळसूदपणे चेहऱ्यावर काही मागमूस न ठेवता लोकांत वावरणाऱ्या चलाख प्रणयिनीप्रमाणे हवा पावसाशी काही संबंधच दाखवत नाही. हळूहळू संथपणे दीर्घकाल पडत राहणाऱ्या पावसाला खेड्यात 'म्हातारा' पाऊस म्हणतात. दिल्लीला असा म्हातारा अगदी क्वचितच कधी तरी एखाद्या दिवशी भेट देतो. एरवी दिल्लीचा पाऊस 'तरणाताठा' असतो. अगदी तारुण्याने मुसमुसलेला, अवखळ आणि चंचल! हट्टी आक्रमकपणाने अचानक तो झेपावून येतो; अनिवार उत्कटतेने कोसळतो आणि ओल्या आठवणी ठेवून दिगंतराला निघूनही जातो. येताना त्याचे पाऊल अडखळत नाही की जाताना ते रेंगाळत नाही. त्याचा आवेग चांगला अर्ध्यापाऊण तासाच्या वर टिकला की रस्त्यांच्या खळाळत्या नद्या होतात. लहान मुले त्यात उड्या मारू लागतात. एकमेकांच्या अंगावर पाणी उडवतात. पाणी

कापीत जाणाऱ्या नावांप्रमाणे बसेस आणि मोटारी दोन्हीकडे पाण्याचे फवारे उडवीत त्यातून विहार करतात. मिंटोब्रिजसारख्या सखल भागात इतके पाणी साठते की चक्क त्यात एखादी बस अडकून पडते.

त्यामुळे दिल्लीकरांना छत्र्या–रेनकोटांचे वळण नाही धबाधबा कोसळणाऱ्या पावसात छत्रीचा काही उपयोगच नाही आणि रेनकोट सर्वच दृष्टींनी गैरसोयीचा. अंगावरती ते ओले चिलखत घेऊन, माणसांनी ठिच्च भरलेल्या बसमध्ये लटकायचे कसे? त्यापेक्षा, पाऊस थांबेपर्यन्त निवाऱ्याला वाट पाहून, पाऊस ओसरल्यावर बाहेर पडणे बहुतेकजण पसंत करतात. अगदीच हलका शिडकावा असेल, तर रंगीबेरंगी फॅन्सी छत्र्या स्त्रियांच्या हाती दिसतात; पण पावसाची रिमझिम चालू असताना 'सांभाळून अंचल–ओचे' जाणारे छत्रीधारी 'भिजले लावण्य' इथल्या रस्त्यातून दिसत नाही.

कायम आठवणीत राहण्यासारखा दिल्लीतल्या पावसाचा एक अनुभव तीन वर्षांपूर्वी मला आला होता. अजून तो मनात ताजा ठसठशीत आहे. असेच आषाढाचे दिवस होते. विद्याधर पुंडलीक आलेले होते, ते पुण्याला परत जायचे होते. सकाळी ११ वाजता झेलम एक्सप्रेस सुटायची होती. पुंडलीकाना स्टेशनवर पोचवून मला परस्पर विद्यापीठात जायचे होते. तत्पूर्वी बँकेत जाऊन पैसे काढायचे होते. पुंडलीकानाही स्टेशनवर जाण्यापूर्वी विद्यापीठ अनुदान मंडळाच्या कार्यालयात काही चौकशी करायची होती. बँका आणि ऑफिसेस दहा वाजता सुरू होतात. त्यामुळे रिक्षाने मी बँकेत आणि पुंडलीकानी यू. जी. सी. मध्ये जाऊन आपापली कामे उरकायची आणि तसेच स्टेशनवर भेटायचे असे आम्ही ठरवले. पुंडलीकाची एक बॅग माझ्याकडे घेतली. दोघे दोन रिक्षांनी निघालो. बँकेत मी जाऊन पोचलो आणि असा मुसळधार पाऊस अचानक कोसळू लागला, की रस्ते पाण्याने भरून गेले. रिक्षाची चाके पाण्यात बुडाली, तेव्हा रिक्षावाल्याने पुढे येण्याचे नाकारले. कशीबशी एक बस पकडून स्टेशनच्या पुलापर्यंत गेलो. त्याच्यापुढे बसही जाईना! हतबलपणाने पावसाचे तांडव पहात रहाण्यापलीकडे काही करता येणेच शक्य नव्हते. स्टेशन तिथून दोन मिनिटांच्या अंतरावर होते; पण पाण्यातून जाणे शक्य नव्हते. गाडीची वेळ टळून अर्धा तास झाल्यावर पाणी हळूहळू ओसरू लागले होते. वाट पहात राहण्याचा, अगतिकतेचा तो मानसिक ताण आणि समोर धुवाधार पावसाचे तांडव हा अनुभव मोठा विलक्षण होता.

ह्या वर्षी आषाढाच्या पहिल्या दिवशी मस्त पाऊस झाला. हवेतील उष्णतेची तीव्रता ओसरली. चैतन्याची एक लहर पानापानात शिरशिरली. त्यानंतर आणखी एक–दोन पाऊस झाले; पण ते पावसाचे उत्तान रूप अजून दिसायचे आहे. अजून ढगाचे गडगडाट आणि विजाचे कडकडाट कानावर पडलेले नाहीत. दिल्लीकर त्याचीच वाट पहात आहेत. माणसाच्या मनाइतकीच धरतीही त्या उन्मादासाठी आसुसलेली आहे.

तिची ही असोशीच जणू जांभळा बहार बनून उतरलेली आहे. दिल्लीतली जांभळाची झाडे सध्या रसरशीत टपोऱ्या काळ्याभोर जांभळानी अक्षरशः लगडलेली आहेत. विद्यापीठाच्या परिसरात किती तरी जांभळाची झाडे आहेत. प्रत्येक झाडाखाली जांभळाचा सडा पडतो. शाळेतली मुले टपोरी जांभळे वेचूनवेचून मटकावतात. बाकीची विद्यापीठात आणि परिसरातील कॉलेजात प्रवेश घेण्यासाठी धांदलीत असलेल्या मुलामुलींच्या पायांखाली तुडवली जातात, चिरडतात. रस्त्यावर जांभळ्या ठिपक्याची विचित्रे उमटत राहतात.

¤

धुवांधार सरीची प्रतीक्षा करणाऱ्या दिल्लीला अगदी अनपेक्षितपणे वेगळ्याच प्रकारचा पाऊस पहायला मिळाला. इंडियन एअरलाइन्सची एअरबस शीख अतिरेक्यानी अपहरण करून लाहोरला नेली. दोन दिवस दिल्लीकरांच्या जिवात जीव नव्हता! वातावरण अतिशय ताणलेले होते. काय होईल आणि काय नाही, सांगता येत नव्हते आणि अचानक गुंता सुटला. पाकिस्तानी अधिकाऱ्यांच्या मुत्सद्देगिरीला यश आले किंवा अतिरेक्यांचा धीर खचला आणि एअरबसच्या सर्व प्रवाशाची सुखरूप सुटका झाली! पाकिस्तानच्या विमानातून हे सर्व प्रवासी दिल्लीला सुखरूप परतले, तेव्हा पालमविमानतळावरचा देखावा अभूतपूर्व होता. उतारूंच्या स्वागतासाठी जमलेला अफाट समुदाय एकाच भावनेच्या लाटावर हेलकावत होता. रडता रडता हसत होता. आनंदाने उजळलेल्या चेहऱ्यांवरून अश्रूंच्या सरी ओघळत होत्या. ऊनपावसाचे मिश्रण होत होते. हाही एक पाऊस आणि तोही आषाढातच! ☐

# अशी पाखरे येती..

उन्हाळ्यातली एक दुपार. साधारण तीनचा सुमार असेल. रस्ते निर्मनुष्य आणि शांत. वातावरण रखरखीत असूनही स्वच्छ होते. ते निश्चल वातावरण पहात उभी असताना कावळ्यांच्या ओरडण्याने माझे लक्ष वेधले गेले. जवळच्याच विजेच्या तारेवर सात–आठ कावळे ओळीने बसले होते. मधून मधून ते जोरजोराने ओरडत होते. त्यांच्या ओरडण्याचे कारण शोधण्यासाठी मी इकडे तिकडे पाहिले. समोरच्या झाडावर एक करुण दृश्य दृष्टीस पडले. त्या झाडावर पतंगाचा एक दोरा अडकला होता आणि त्या दोरात एक पंख अडकल्यामुळे एक कावळा त्याला लोंबकळत होता. बिचारा किती वेळ अडकला होता कुणास ठाऊक! अधूनमधून त्याची उडण्याची धडपड चाललेली होती; पण पंखाला कच बसून एक हेलकावा मिळण्यापलीकडे काहीही होत नव्हते. पुन्हा तो असहायपणे लोंबकळतच रहायचा. त्याची ती अवस्था पाहून मला फार वाईट वाटले. पटकन जाऊन तो दोर कापावा आणि त्याची सुटका करावी असे वाटले; पण दोर तसा उंच होता. कुणी तरी त्या झाडावर चढून तो दोर तोडला तरच ते शक्य होते; पण त्या झाडावर चढण्यासारखे कुणीही जवळपास नव्हते आणि असते तरीही कुणी ते काम करील असे वाटत नव्हते. त्या कावळ्याची चोच वासलेली होती. तो खूप तहानेला असेल असे मला वाटले. माझाच घसा कोरडा पडू लागला असे वाटू लागले. त्याची ती दयनीय अवस्था पहावत नव्हती. त्याचबरोबर आपण

त्याची सुटका करू शकत नाही याची खतही मनाला तीव्रतेने वाटत होती. नकळत त्या कावळ्याच्या व्यथेशी माझे मन एकरूप झाले होते त्याची तडफड ही माझ्या मनाची तडफड बनली होती. एका परीने त्याची सुटका करणे अगदी सोपे होते. फक्त तो लोंबकळणारा दोर कापणे... आणि बस्! मग तो क्षणात मुक्त होऊ शकला असता! दोर तुटताक्षणी पुन्हा तो उडत उडत स्वच्छंदीपणाने मजेत हिंडला असता. आपल्या तीक्ष्ण दृष्टीने पाणी शोधून ते पोटभर प्यायला असता. एखाद्या काठीने तो दोर तोडावा असे वाटत होते; पण काठीही तिथपर्यंत पोहोचू शकली नसती. मांजाचा दोरा असल्यामुळे तो मजबूत होता. एखादी डबल डेकर बस आली तरी त्याला पाय टेकायला आधार मिळेल आणि तो झाडावर उडत जाऊन बसेल. मग चोचीने पखात अडकलेला दोरा तोडू शकेल, असे अनेक विचार मनात येत होते; पण बराच वेळ बसचाही पत्ता नव्हता. तारेवर बसलेले कावळे मधून मधून ओरडतच होते. ते त्या कावळ्याला सहानुभूती दाखवीत होते की त्याची फजिती पहात होते देव जाणे; परंतु आता माझे सपूर्ण लक्ष त्या कावळ्यावरच केंद्रित झाले होते. त्याची सुटका कशी करता येईल या एकाच विचाराने मन ग्रासले होते. तारेवरचे कावळे त्याची फजिती पहात असतील हा विचारही मनाला व्यथित करीत होता. ते त्याला सहानुभूतीच दाखवीत असतील, या विचाराने मनाला सांत्वन मिळत होते.

*एरवी गच्चीतल्या दोरीवर वाळणाऱ्या* कपड्यावर एखादा कावळा येऊन बसला तरी ते कपडे पुन्हा धुतल्याशिवाय चैन पडत नाही; पण कपड्यावर एखादे कबूतर येऊन बसले तर त्याचा कधी विधिनिषेध वाटत नाही. कावळा घाणेरडा वाटतो असे असूनही त्या लोंबकळणाऱ्या कावळ्याबद्दल मात्र मनात अपार सहानुभूती दाटून आली होती. एकदम मला एक युक्ती सुचली. फायरब्रिगेडला फोन केला तर ते त्यांच्या उंच शिडीवर चढून तो दोरा तोडू शकतील. ती कल्पना मनाला एकदम पटली. फक्त फायरब्रिगेडच आता त्याची सुटका करू शकेल. नाही तर तो तडफडून तडफडून आपल्या डोळ्यांदेखत मरेल! दोरा तोडण्याची एक साधी गोष्टही आपण करू शकत नाही आणि त्या मुक्या पाखराला जीवदान देऊ शकलो नाही, याची बोचणी मनाला लागून राहील असे वाटले आणि मी चटकन फोनजवळ गेले; फोनवर सांगायच काय? 'आमच्या दारासमोरच्या झाडावर पतंगाच्या दोराला अडकून एक कावळा लोंबकळत आहे. त्याची सुटका करायला या' असे सांगायचे? इतक्या छोट्या कामासाठी फायरब्रिगेडचे लोक येतील का? त्याना त्या कावळ्याची तडफड आपल्याइतक्या तीव्रतेने जाणवेल का? 'मरने दो उस कौवेको. ऐसे कामोके लिए भी कभी फायरब्रिगेडको बुलाया था?' अशासारखे काही तरी त्याच्याकडून ऐकायला मिळेल किंवा ते आपल्याला हसतील, असे वाटून मी फोनपासून दूर झाले. बाहेर येऊन पुन्हा त्या कावळ्याकडे पाहू लागले. तोही मधून मधून उडण्याची धडपड करीतच होता. एक उच हेलकावा घेऊन त्याने त्या झाडाच्या एका फांदीवर टेकावे आणि तो पंखात अडकलेला मांजा चोचीने कुरतडून तोडावा किंवा त्या बघ्या कावळ्यानी चोचीनी तो मांजा तोडावा... वगैरे लहान मुलासारखे विचार मनात येत होते. माझ्या मनातल्या सहानुभूतीने परमावधी गाठली होती. त्याची त्या स्थितीतून सुटका व्हावी हा एकच विचार मनात तीव्रतेने दाटला होता...आणि काय चमत्कार! एकदमच तो कावळा जोराने उडत उडत निघून गेला! क्षणभर माझा विश्वासच बसेना. मी नीट पाहिले. मांजाचा दोरा नुसताच *लोंबकळत होता. अगदी सहजपणाने* कावळा उडून गेला होता. काळ आल्यावर प्राणपाखराने उडून जावे तसा. हे कसे घडले?

## कावळा—हुषार व तत्पर

मला अगदी खात्रीपूर्वक वाटले की माझ्या तीव्र इच्छाशक्तीच्या प्रभावामुळेच त्याची सुटका झाली. तो कावळा नावाचा घाणेरडा वाटणारा पक्षी आहे वगैरेसारखे विचार त्या वेळी माझ्या मनात आले नव्हते. फक्त तहानेने व्याकुळलेल्या, असहायपणे तडफडणाऱ्या त्या कावळ्याच्या दयनीय अवस्थेने माझ्या मनात सहवेदना निर्माण केली होती. योगायोगाची गोष्ट अशी की त्यानतर तीनच दिवसांनी मुबईला अशीच एक घटना घडल्याची बातमी महाराष्ट्र टाइम्समध्ये वाचायला मिळाली. पतंगाच्या दोराला अडकून असाच एक कावळा लोंबकळला होता आणि फायरब्रिगेडच्या लोकानी येऊन त्याची सुटका केली. आपल्यासारखीच इतरांच्याही मनात कावळ्याविषयी सहानुभूती निर्माण झाली होती, हे वाचून त्या वेळी माझ्या मनाला समाधान झाले.

दिल्लीतल्या उच बरसातीमधून कावळे, कबुतरे, चिमण्या, बुलबुल वगैरे पक्ष्यांचे जग फार जवळून पहायला मिळते. इथल्या बहुतेक घरांना बरसाती असतात. बरसाती म्हणजे तिसऱ्या मजल्यावर दोन–तीन खोल्या आणि प्रशस्त गच्ची असलेली जागा. अनेक पक्षी या मोकळ्या गच्चीत विहारासाठी येत असतात. त्या पक्षीजगताच्या आपण अगदी जवळ रहात असतो. या पक्ष्यांच्या सवयी, गुण–दोष, लकबी न्याहाळणे हा माझा नेहमीचा विरंगुळा आहे.

तसा कावळा हा पक्षी कुरूपच. कुठल्याही आकर्षक रंगाची देणगी त्याला लाभलेली नाही. संपूर्ण काळा आणि बेडौल अन् आवाजही कर्कश. असे असले तरी अत्यत हुषार आणि तत्पर. या त्याच्या गुणांमुळे मला त्याचे नेहमीच कौतुक वाटते. कुठे तरी वळचणीला किंवा घरावर तो बसलेला असला तरी त्याची दृष्टी सारखी शोधत असते. एखादा खाद्यपदार्थाचा तुकडा गच्चीच्या कठड्यावर ठेवला की कुठेही लाब बसलेली ही कावळेबुवांची स्वारी क्षणात झपाट्याने तिथे हजर. पोळीचा तुकडा एखादाच असला तर तो घेऊन पसार होणार; परंतु जास्त तुकडे असतील तर दुसऱ्या कावळ्यानाही साद घालून बोलावणार. स्वार्थीपणा फक्त पहिल्या तुकड्यापुरताच. नतर मात्र परोपकारबुद्धीच!

पहाटे सर्वांत आधी उठणारा पक्षी म्हणजे कावळाच असावा. उजाडायला सुरुवात झाली न झाली की यांच्या 'कावकाव'ला सुरुवात झालीच. एका कावळ्याला जाग आली की त्याने 'काव' म्हणून दुसऱ्या कावळ्याला उठवावे. मग दोघांनी 'कावकाव' करून इतर कावळ्याना उठवावे आणि नंतर सर्वांनी कावकावचा गलका करून साखरझोपेतल्या माणसाना जागे करण्याचा प्रयत्न करावा, ही रोजचीच तऱ्हा. कधीकधी बाहेरचे दृश्य पहायला सहज जरी

गच्चीत गेले तरी जवळून कुठून तरी 'काव' म्हणून आपल्या अस्तित्वाची तो जाणीव करून देतो. अशा वेळी मोकळेपणाने उभे रहाण्याचे आपले स्वातंत्र्यच त्याने हिरावून घेतले असे वाटू लागते आपल्या एकटेपणाची समाधी भंग पावल्याने त्याचा राग येतो; परंतु कधी कधी तो खास दूतासारखा येऊन जवळपास कुठे तरी बसतो आणि जोरजोराने ओरडू लागतो. तेव्हा तो नक्कीच काही तरी शकुन सागत आहे आणि काही तरी विशेष बातमी कळणार आहे असे वाटल्यावाचून रहात नाही. वास्तविक बऱ्याच वेळा शकुनाचा पडताळा येतही नाही. तरी पण 'पैल तो गे काऊ कोकताहे, शकुन गे माये सांगताहे' असे ज्ञानदेवांच्यासारखे नेहमीच वाटते !

### फक्त देखणेपणाच

दिल्लीत सर्वात जास्त संख्येने दिसणारे पक्षी म्हणजे कबुतरे. सगळी एकजात राखी रंगाची. पांढरे कबूतर चुकूनच कधी तरी दृष्टीस पडते. पंखांवर आडवे काळे पट्टे, माणकासारखे चमकदार लाल डोळे आणि इवले लाल पाय. आपल्या गुबगुबीत अंगाचा भार सावरीत मोठ्या डौलात चालत असतात ती. प्रत्येक पाऊल टाकताना मानेला पुढे हेलकावा देण्याची त्यांची लकब फार ऐटदार वाटते. आपल्या सौंदर्याच्या मिजाशीत–तोऱ्यात चालताना पाहून त्यांना ओंजळीत हळूच पकडून गोंजरावेसे वाटते; पण हे कौतुक फक्त सुरुवातीलाच टिकते. बरसाती म्हणजे आपले मुक्त क्रीडास्थान आहे अशा समजुतीने ती जेव्हा दिवसभर धुडगूस घालतात, तेव्हा त्यांचे त्रासदायक स्वरूप लक्षात येऊ लागते. गच्ची स्वच्छ धुऊन झाली की, एकेक तारा उगवल्याप्रमाणे ही एकेक येऊन गच्चीत टपकतात. मजेत हिंडतात. फरशीवर साठलेले पाणी पितात आणि कुठे तरी घाण करून ठेवतात. तेव्हा त्यांची इतकी विलक्षण चीड येते की, 'कुणी आहे का रे तिकडे, त्या कबुतरांना मारून टाका !' असा हुकूम मनातल्या मनात दिला जातो. त्यांना हुसकायला मागे धावत गेले तरी एक गिरेबाज वळण घेऊन पुन्हा आपल्याच जवळपास कुठे तरी ती उडत येऊन बसलेली असतात. हुसकायला त्यांच्या अगदी जवळ जाईपर्यंत ती मजेत बसून असतात. मग हळूच आपल्या शरीराचा तोल सावरत नाखुषीने उडतात. पुन्हा थोड्या वेळाने ती तिथेच हजर ! आपल्या गुबगुबीत शरीरामुळे यांना फारसे उडता येत नाही असे मात्र मुळीच नाही. मनात आले तर ती विलक्षण वेगाने उडत जाऊ शकतात. तिन्हीसाजेला ती पंधरा–वीसच्या समूहाने आकाशात चक्राकार उडत असतात. मधूनमधून विसाव्यासाठी एखाद्या घरावर टेकतात. पुन्हा गोल गोल फिरत राहतात. असे बराच वेळ चालते. त्यांचे हे भिरे जेव्हा आपल्या डोक्याजवळून जाते, तेव्हा त्यांच्या पंखांचा सुसाट वारा लागतो आणि त्यांच्या उडण्याचा झपाटा जाणवतो.

तीव्र उन्हाळ्याचे दोन महिने सोडले की, बाकी वर्षभर या कबुतरांचे जोडीने हिंडणे आणि शृंगारक्रीडेत रमणे चालूच असते. त्यासाठी ते घराच्या आत किंवा बाथरूममध्ये निवातपणाच्या अखंड शोधात असतात. बाथरूममध्ये त्यांना मज्जाव न करणे आपल्याला परवडणारे नसते. कारण मधूनमधून त्यांना घरटे बांधण्याची आठवण होत असते आणि घरटे बांधण्याऐवजी काड्या आणून टाकणे एवढेच त्यांना करता येते. एखादे साधेही घरटे कबूतर बांधू शकत नाही देखणेपणाव्यतिरिक्त त्यांच्यात कोणताच गुण नसतो. हा निर्बुद्ध पक्षी प्राचीन काळी संदेशवहनाचे काम कसा करीत असेल याची कल्पनाच करवत नाही.

कावळ्यांचे आणि कबुतरांचे परस्पर संबंध मात्र वैशिष्ट्यपूर्ण असतात. या कबुतरांची अंडी खायला कावळे टपलेले असतात. कबुतरांची राखण नसेल तर त्यांची अंडी कावळ्यांनी किंवा घारींनी पळवलीच म्हणून समजा; पण आश्चर्य असे की, घारी जेव्हा कबुतरांच्या पिलांना पळवून नेण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा मात्र हे कावळे त्या घारींना पळवून लावतात. त्यांचा पाठलाग करतात. त्यांच्यामागे लागून त्यांना चोचींनी टोचतात. कावळे कबुतरांची अंडी खात असले तरी एरवी त्यांना सन्मानाने वागवीत असतात. एखादा पदार्थ खाताना कबूतर पुढे सरसावले तर कावळा बिचारा बाजूला होतो आणि कबूतराला आधी खाऊ देतो. कबूतरांच्या पिढ्यान् पिढ्या अशा दोन–चार बरसातींच्या परिसरात सुखाने नांदत असतात !

मधूनमधून या बरसातीत विहार करायला साळुंक्याही येत असतात. आपल्या कर्कश आवाजात त्या ओरडू लागल्या तरी त्यांचा इतर कसलाही त्रास नसतो. त्या येतात आणि थोडा वेळ हिंडून निघून जातात. 'साळुंकी मंजूळ बोलतसे वाणी' ही काव्यपक्ती खरी करण्याकरिता क्वचित कधी तरी त्या मजुळ स्वरातही ओरडतात. सूर्योदय झाल्यावर आकाशात एखाद्या हिरव्या रेषेप्रमाणे वेगाने उडत जाणारे पोपटही बऱ्याच वेळा दिसतात. सकाळ–संध्याकाळ देखणे बुलबुल जोडीने येतात. टी. व्ही.च्या अँटिनावर गोड शीळ घालीत शेपटी उडवत बसतात. काळ्या तुऱ्याचा आणि शेपटीखालील लाल रंगाचा दिमाख या चिमुकल्या पक्ष्याला फार शोभून दिसतो; पण जरा कुठे खुट्ट झाले की, तो तीरासारखा उडून निघून जातो. तेव्हा 'स्वभास दावुनि, प.रे ते झर्टदिशि. जाइ लोपुनी, मग मी हाका मारितसे' अशी माझी अवस्था होते.

जुलैमध्ये उन्हाळ्याची रखरख संपून आकाशात ढग जमू लागले आणि पावसाची एखादी सर कोसळली की जवळच्याच 'बुद्धजयंती उपवना'त मुक्त संचार करणाऱ्या मोरांचे आनंदाने ओरडणे सुरू होते. रात्रीच्या नीरव शांत वेळी बरसातीत झोपल्यावर त्या मोरांचे 'मियाँव मियाँव' ऐकू येऊ लागले की, उघड्या गच्चीत झोपण्याचे दिवस सपले, असे समजायला हवे. उन्हाळ्यात बाहेर झोपल्यावर मलयपर्वतावरील गार वाऱ्याच्या झुळुकांप्रमाणे भासणाऱ्या वाऱ्याच्या झुळुका अनुभवण्यात फार सुख वाटते; परंतु मोरांचे ओरडणे सुरू झाले की, आता उन्हाळा संपत आला असून गाशा गुंडाळून घरात पळण्याची जणू सूचनाच मिळते. दिल्लीतल्या उद्यानात मोर पुष्कळ आहेत. आपल्या गच्चीत येऊन एखाद्या मोराने पिसारा फुलवून नाचावे असे फार वाटते; परतु या मोराचेही ओरडणे कर्कशच असते. रात्री दुरून ऐकू येणारा त्याचा आवाज सुसह्य असतो; ऐकावासाही वाटतो. तथापि आपल्या सुरेल कंठाने पंचमात गाणाऱ्या कोकिळेचा स्वर मात्र दिल्लीत फार क्वचित ऐकायला मिळतो. आंब्यांची झाडे इथे अभावानेच असल्यामुळे त्याचा मोहोर खाऊन तृप्तपणे गाणे गायला तिला इथे वाव नसतो. कधी तरी तिची मधुर 'कुहू कुहू' ऐकू आली तर तिची कोण अपूर्वाई वाटते ! महाराष्ट्रात वसंताच्या आगमनापासून सतत चार–पाच महिने वेळोवेळी ऐकू येणारी ही 'कुहू कुहू' आठवू लागते आणि मन भारावून जाते !

—ललिता मिरजकर

**एका पत्नीने पतीला, पती मूल नाकारतो म्हणून चपलेने बदडून काढले! ही एक अघटित अशी घटना. सध्या नागपुरात त्यावर प्रचंड वादळ सुरू आहे. एकूणच स्त्रियांच्या प्रश्नाबाबत ह्या निमित्ताने साऱ्यांचे लक्ष वेधले जात आहे.**

# नागपुरात गाजलेल्या या लता (कामत) उधोजी प्रकरणाचा यथातथ्य तपशील

नागपूरच्या यशवंत स्टेडियममधील युनिव्हर्सल हाउस ऑफ म्युझिक ह्या दुकानात २६ जूनला संध्याकाळी ५.३० वाजता चार तरुणी घुसल्या. दुकानाचा मालक विलास उधोजी ह्याला जाब विचारू लागल्या. विलास असभ्यपणे वागताच त्यातील एका तरुणीनं पायातली चप्पल काढली व तणतणत दुकानाबाहेर पडलेल्या विलासला त्या चार तरुणींनी दुकानासमोरच सर्वांसमक्ष चपलांनी यथेच्छ बडवून काढलं! पाहता-पाहता बघ्याची गर्दी गोळा झाली. ५००-६०० लोक गोळा झाले. कारण कळल्यानं व मार खातानाही निर्लज्जपणे बोलणाऱ्या विलासला पाहून अनेक बघे तरुण वेळोवेळी मारायला धावायचे; पण त्या ठिकाणी आधीच कुणकुण लागल्यानं उपस्थित असणारा पत्रकार आणि सुरेश अग्रवाल, सुनील कुलकर्णी, डॉ. भा. ल. भोळे, प्रकाश गावडे इ. सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी त्या भडकलेल्या तरुणांच्या तावडीतून विलास उधोजीला सोडवलं. पंधरा-वीस मिनिटं हा प्रकार चालू होता. शेवटी जमावतल्या कुणी तरी त्या टी. व्ही. दुकानावर दगड भिरकावला. काच फुटली. त्यानंतर भडकलेल्या जमावाला पांगवण्याचे काम महत्प्रयासान उपस्थित सामाजिक कार्यकर्त्यांनी पार पाडलं!

का चपलांनी सडकलं ह्या तरुणींनी?

## लता उधोजीच्या मते

सौ. लता विलास उधोजी ही विलास उधोजीची पत्नी. ह्याच युनिव्हर्सल हाउस ऑफ म्युझिकमध्ये ती गेल्या दीड वर्षापासून काम करीत होती. दरम्यान दोहोत प्रेमसंबंध निर्माण झाले. विलास वारवार लग्नाचं अभिवचन देत होता. ती गरोदर राहिली. ॲबॉर्शन करून घे ही विलासची विनंती तिनं अव्हेरली. विलास लग्नाच्या अभिवचनापासून फिरला हे लक्षात घेऊन ती मुंबईस भावाकडे निघून गेली; पण विलासनं मात्र मुंबईस फोन करून ह्या अवस्थेतही मी लग्न करण्यास तयार आहे असं सांगून तिला मुंबईहून परत बोलावून घेतलं.

तिसऱ्याच दिवशी दि. ७ नोव्हेंबरला लताच्या घरी त्यानं लताशी विवाह केला. त्या वेळी विलास उधोजीकडलं कुणीच हजर नव्हतं. बहुधा त्यान घरच्यांना कळूही दिलं नव्हतं. ह्या वेळी लता चार महिन्यांची (पूर्ण) गर्भवती होती.

त्यानंतर विलासनं लताला आपल्या धरमपेठेतल्या राहत्या घरी नांदवायला नेलं. खालच्या मजल्यावर त्याचे वडील ॲड. उधोजी राहायचे तर वरच्या मजल्यावर ही दोघं राहायची. ३ महिने त्यांचा संसार त्या घरात चालला. हे मूल विलासचंच असल्यामुळं व तेवढ्यासाठीच (गर्भधारणेमुळं) त्यानं लताशी लग्न केल्यामुळं ह्या काळात कुठंही त्यानं होणाऱ्या अपत्याविषयी संशय व्यक्त केला नाही.

लता बाळंतपणासाठी माहेरी आल्यानंतर अगदी शेवटच्या महिन्यात तिला कळलं की, विलास उधोजीनं तिला होणारं अपत्य त्याचं नसल्याचं निमित्त करून मॅरेज 'नलिफाय' करून मिळाव अशी कोर्टात केस टाकली आहे!

'आपल्याला होणाऱ्या अपत्याचा पिता त्याचं पितृत्व नाकारतोय' हा फार मोठा आघात होता लतावर. ज्याच्यासाठी लग्न केलं त्याच मुलाच पितृत्व नाकारतोय हा? दि. १४ एप्रिल रोजी ती मातृसेवा सघात प्रसूत होऊन तिनं एका मुलीला 'समता'ला जन्म दिला!

खरं तर सकृतदर्शनी विचार करणाऱ्या कोणत्याही माणसाला एक गोष्ट स्पष्ट दिसतेय. चार महिन्याची पूर्ण गर्भवती असणाऱ्या लताशी (वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या आपल्या निवेदनात विलासनेच तारखा देऊन लताने विवाहानंतर पाच महिन्यांनी मुलीला जन्म दिला असल्याचे म्हटले आहे.) विलासनं लग्न केलं. हे अपत्य खरंच विलासचं नसतं तर त्याला पहिल्या एक-दोन रात्रीतच लता गरोदर आहे हे लक्षात आलं असतं व त्यानं तडकाफडकी लताला लाथा घालून घराबाहेर काढलं असतं. चौथा महिना पूर्ण झालेली गर्भवती स्त्री न ओळखता येण्याइतका दुधखुळा पती ह्या जगात कोण असू शकतो? पण त्यान तीन महिने लताशी संसार केला. ह्याचाच अर्थ ते अपत्य त्याचंच आहे ह्याची त्यालाही पूर्ण खात्री होती हे सिद्ध होत नाही का?

## पत्रकारपरिषद

मुलगी झाल्यावर लताला मुलीच्या भविष्याचा प्रश्न खूपच भेडसावू लागला. तिच्या वतीनं तिचे बंधू, ती स्वतः व बहीणही वेगवेगळ्या वेळी विलासकडे जाऊन समजावून आले, 'बाबा रे, तुला घटस्फोट हवा असेल तर आम्ही देतो; पण अशी लक्तरं वेशीवर टांगू नकोस. मुलीचं पितृत्व नाकारू नकोस!' पण त्यानं ऐकलं नाही.

त्यानंतर मात्र लता भडकली. आपल्या दीड महिन्याच्या मुलीला सोबत घेऊन जगताना तिच्या मनात काही प्रश्न भेडसावू लागले. तिची चूक तिला मान्य आहे, ती प्रायश्चित्त भोगतेच आहे; पण विलासचीही चूक आहे तो मात्र चक्क नामानिराळा राहतो आहे. निसर्गानं स्त्रीवर लादलेल्या मर्यादेचा व सामाजिक दुटप्पी नीतिमत्तेचा गैरफायदा घेऊन एका मुलीला देशोधडीला लावून आरामात प्रतिष्ठितपणे जगतो आहे. लग्नासाठी दुसऱ्या मुलीही शोधतो आहे!

लता आणि तिच्या मैत्रिणी, नेत्रा, यामिनी चौधरी विलासशी बोलणी करण्याच्या हेतूने विलासच्या दुकानात गेल्या. अद्वातद्वा बोलून त्याने लताच्या समक्ष मुलीचं पितृत्व नाकारताच त्यांनी त्याला यथेच्छ बदडून काढलं. विलासनं पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी लता उधोजी, तिच्या दोन मैत्रिणी व उपस्थित पत्रकार (ज्यान घटनेचे फोटोही घेतले) ह्यांच्यावर जुजबी गुन्हा रजिस्टर केला.

ही बातमी वाऱ्यासारखी नागपुरात पसरली. दुसऱ्या दिवशी लतान स्वतःच्या घरी मी 'विलास उधोजीला का मारलं' हे सांगण्यासाठी प्रेसकॉन्फरन्स घेतली!

साऱ्या सामाजिक संघटनांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी ह्या घटनेची तडफेनं नोंद



विलास असभ्यपणे वागताच चार तरुणींनी त्याला चपलेनं बडवलं...

□

घेतली. २७ जूनलाच संध्याकाळी ६ वाजता एक बैठक झाली. त्याद्वारा सगळ्या स्त्री-संघटना, युवकसंघटना व सामाजिकदृष्ट्या सक्रिय असणाऱ्या कांही विचारवंतांनी 'लता उघोजी नागरिक अभिनंदन समिती'ची स्थापना केली. त्यात हुंडाविरोधी आघाडी, अ. भा. अंधश्रद्धा निर्मूलनसमिती, मानवीय नास्तिक मंच, संयुक्त महिला संघटना (नागपुरातल्या सगळ्या ८० महिला संघटनांचं एकत्रित व्यासपीठ) दलित पँथर, लोहिया विचार मंच, सामाजिक समता समिती, लोकविज्ञानसंघटना, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ युथ वेलफेअर, छात्र युवा संघर्षवाहिनी, भारतीय महिला फेडरेशन, सावित्रीबाई फुले महिला मंडळ, लोकशाही हक्कसंरक्षणसमिती, समता सैनिक दल, जय युवक क्रांतिदल अशा किती तरी संघटना आणि डॉ. श्री व श्रीमती वानकर, डॉ. भा. ल. भोळे, श्री. गोलपेलवार, मोतीरामजी पावडे, रजनी अग्रवाल, अॅड. अग्रवाल, श्री. र. वि. रानडे, उमेश चौबे, अॅड. सुबोध धर्माधिकारी, नागेश चौधरी, अशोक थूल, सुभाष उमाठे, सुरेश अग्रवाल इ. नागरिकांचा ह्यात समावेश आहे.

ह्या अभिनंदनसमितीच्या वतीने दि. २९ जूनला झाशीराणीचौकात संध्याकाळी ५.३० वाजता एक पथनाट्य सादर झाले. सुनील कुळकर्णी यांनी दिग्दर्शित केलेल्या आणि विवेक केदार, दिनेश वंजारी, रवी जोशी, सुनील देशपांडे, रेखा दंढिगे, अनिता वगैरेंनी सादर केलेल्या ह्या पथनाट्याद्वारा लता उघोजीच्या जीवनात घडलेले हे सारे नाट्यच प्रदर्शित केले होते. पथनाट्यानंतर संध्याकाळी ६.३० वाजता विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या पूर्णचंद्र बुटी हॉलमध्ये एक अभिनंदन-सभा झाली.

डॉ भा. ल. भोळे ह्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेत डॉ. रुपा कुळकर्णी, श्याम मानव, सुगंधा शेंडे, नलिनी सामकुंवर, उषा मिश्रा, र. वि. रानडे, उमेश चौबे, कमल सारडे इ. वक्त्यांनी लताचे अभिनंदन केले. हे अभिनंदन लताच्या चुकीचे नव्हते, तिच्या कुमारी मातृत्वाचेही नव्हते तर तिच्या बरोबरीनंच चुका करणाऱ्या तरीही नामानिराळा राहून प्रतिष्ठितपणे जगणाऱ्या एका पुरुषाला धडा शिकवला म्हणून तिचे अभिनंदन करण्यात आले! एक मुलगी आणि तिच्या तीन मैत्रिणी एकत्र येऊन जाहीरपणे एका बेजबाबदार पुरुषाला ठोकतात हीच गोष्ट मुळात कौतुकास्पद होती! अघटित होती. ह्या प्रकरणामुळे आपल्या चारित्र्याची आणखी चिवडाचिवड होणार, हा पुरुषी समाज आपल्यालाच अधिक दोषी ठरवणार ह्याची पूर्ण कल्पना असूनही ही बदनामी जाहीररीत्या सहन करण्याचे धारिष्ट्य दाखवले म्हणून तिचे हे अभिनंदन होते! पर्वच वक्त्यांनी हा एकट्या लताचा प्रश्न म्हणून ह्या प्रश्नाकडे पाहिले नाही. हा पुरुषप्रधान समाजरचनेतील पुरुषी संस्कृतीविरुद्ध समताधिष्ठित संस्कृतीचा लढा असल्यामुळे ह्या प्रश्नाची सामाजिक पातळीवरून दखल घेऊन त्याला चळवळीचे स्वरूप देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

डॉ. भा. ल. भोळे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, 'अशा परिस्थितीत ९९ मुली पुढे येत नाहीत. निमूटपणे अन्याय सहन करतात. ही एक मुलगी पुढे आली म्हणून आम्ही तिच्या धाडसाचं अभिनंदन करतो आहोत. हा दोन संस्कृतींतला संघर्ष आहे. त्यातली एक संस्कृती पुरातन परंपरेला सारसर्वस्व मानते, पुरुष-वर्चस्वाला त्रिकालाबाधित सत्य समजते. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हात' म्हणणारा मनू हा त्यांचा मार्गदर्शक असतो. मातृत्वाचा ते दांभिक गौरव करतात आणि फक्त स्त्रियांसाठीच योनिशुचित्वाचे स्तोम माजवीत असतात. याच संस्कृतीने या प्रकरणातील तरुणाला आपल्या प्रेयसीवर मातृत्व लादायला आणि नामानिराळे व्हायला शिकवले तर दुसरी संस्कृती ही स्त्री-पुरुष समानता मानणारी आहे. भारतीय संविधानाला ती प्रमाण मानते. परंपरागत पुरुषवर्चस्व ती झुगारून देऊ इच्छिते. कर्वे–फुले–गांधी–लोहिया––आंबेडकरप्रभृतींनी जोपासलेली ही संस्कृती आहे. या संस्कृतीच्या संस्कारात वाढलेल्या एका स्त्रीला त्या संस्कृतीने हे शिकवले आहे की, आपल्या चुकीमधून जे मूल जन्माला येणार आहे त्या निरागस जीवाची भ्रूणहत्या करणे गैर आहे. त्याला जन्म द्यायला हवा, त्याचे संगोपन करायला हवे; पण एकीकडे आपल्या स्खलनाचे हे प्रायश्चित्त आपण घेत असतानाच त्यातला आपला पुरुष साथीदारही तसा मोकळा सुटता कामा नये. त्यालाही धडा शिकवायलाच पाहिजे. आम्ही या स्त्रीचे अभिनंदन करीत आहोत. कारण ही पहिलीच अशी धाडसी स्त्री आहे.' या घटनेमुळे स्त्री ही नेहमीच गुपचुप राहत नाही तर ती बोलूही शकते ही जाणीव निर्माण झाली आहे. कदाचित ह्यापासून इतर मुलीही प्रेरणा घेतील. समताधिष्ठित संस्कृती ह्या समाजात रुजवण्याच्या दृष्टीने हा संघर्ष महत्त्वाचा आहे असे सांगून 'ज्या दोन प्रवृत्तींमधला हा झगडा आहे त्यांच्यापैकी कोणत्या प्रवृत्तीच्या बाजूने आपण उभे राहणार आहात?' असा खडा सवाल त्यांनी भरगच्च सभागृहाला केला.

अभिनंदनसभेमुळे संपूर्ण नागपूर शहरात ठिकठिकाणी या प्रश्नावर चर्चा सुरू झाली आहे. परंपरावाद्यांनी नेहमीचेच चारित्र्यावरच्या संशयाचे व चारित्र्यहननाचे हत्यार वापरायला सुरुवात केली आहे. अभिनंदनसमितीने विलास उघोजीच्या घरासमोर, दुकानासमोर व चौकाचौकात पथनाट्य व निषेधपर कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा कार्यक्रम जाहीर केला आहे. एकंदरीत या प्रश्नाने बरेच दिवस नागपूरचे वातावरण तापत राहणार असे दिसते.

**–श्याम मानव**

२ अ, टिळकनगर, नागपूर–१०

## विंबल्डन टेनिस स्पर्धा

### क्रिस लॉइड, लेंडल, विलँडर, पॅटकॅश, कॉनर्स चमकले; पण

# मार्टिना-मॅकेन्रोचं वर्चस्व वादातीतच !

सीमा कुलकर्णी

८ जुलैची सध्याकाळ. लाखो प्रेक्षक विंबल्डनच्या सेंटर कोर्टवर जमलेले किंवा दूरदर्शनला चिकटलेले. १९८४ च्या विंबल्डन स्पर्धेतील जॉन मॅकेन्रो आणि जिमी कॉनर्स या दोन-चॅम्पियन-खेळाडूमधला एकेरीचा अंतिम सामना रंगतदार होणार याबद्दल कुणाच्याच मनात शंका नव्हती; पण प्रत्यक्षात मात्र काही वेगळंच. सामना सुरू झाला आणि बघता बघता संपलासुद्धा! अमेरिकेच्या प्रथम सीडेड मॅकेन्रोने आपल्याच देशाच्या जिमी कॉनर्सचा फक्त ८० मिनिटांत ६-१, ६-१, ६-२ असा धुव्वा उडवून मानाचा विंबल्डन-चषक आपल्याकडेच राखला होता. त्याच्या आदल्याच दिवशी मार्टिना नवरातिलोवानेही क्रिस एव्हर्ट-लॉईडला सरळ लढतीत ७-६ (७-५) ६-२ असं हरवून विजेतेपद आपल्याकडेच ठेवण्यात यश मिळवले होते.

अंतिम सामना, तोही विंबल्डनसारख्या स्पर्धेतला, त्यामुळे साहजिकच चुरशीच्या लढतीच्या अपेक्षेने प्रेक्षक आले होते; पण मॅकेन्रो-कॉनर्स सामन्याने याबाबतीत मात्र त्यांची साफ निराशा केली. तसं कॉनर्सनं २ वर्षांपूर्वी ८२ च्या विंबल्डनमध्ये मॅकेन्रोला अटीतटीच्या लढतीत हरवलेलं आणि या वेळेसही लेंडलला हरवताना त्यानं आपल्या सुरेख खेळाची चुणूक दाखवली होती. असं असलं तरी या सामन्यात मॅकेन्रो वरचढ ठरणार याबाबत बहुतेक तज्ज्ञांचं एकमत होतं; पण म्हणून हा मॅकेन्रोचा 'वन मॅन शो' ठरेल असं कुणाच्या स्वप्नातही आलं नसेल! मॅकेन्रोनं अगदी चॅम्पियनच्या थाटात सामन्याला सुरुवात केली आणि बघता बघता ३-० अशी आघाडीही घेतली. १ ल्या सेटच्या ४ थ्या गेममध्ये कॉनर्सने स्वतःची सर्व्हिस राखली आणि हाच त्याला जिंकता आलेला या सेटमधला एकमेव गेम ! तसं पाहिलं तर सर्व्हिसवर परतीचे फटके मारण्याबाबत कॉनर्सची ख्याती आहे; पण या वेळेस मात्र मॅकेन्रोच्या प्रभावी सर्व्हिसला कसं तोंड द्यावं याची विवंचनाच त्याला पडली होती. खरं तर हा दिवस कॉनर्सचा नव्हताच. मॅकेन्रो तुफान फॉर्ममध्ये होता, तर कॉनर्सला मात्र अजिबात सूर सापडलेला नव्हता. दुसऱ्या गेममध्येही पहिल्याचीच पुनरावृत्ती झाली. यात तर सुरुवातीला मॅकेन्रोने ४-० अशी आघाडी घेतली. या सेटमध्येही कॉनर्सला फक्त १ गेम जिंकता आला. मॅकेन्रोचा हा खेळ कॉनर्सला अगदी अनपेक्षित असावा. कोर्टवर मुक्त संचार करत मॅकेन्रोने जे फटके लगावले त्यांच्या-पर्यंत पोचणं कॉनर्सच्या आवाक्याबाहेरच होतं. काही वेळेस तर त्याची रॅकेट नुसतीच हवे-तल्या हवेत फिरली ! लागोपाठ दोन सेटस् हरल्यावर तिसऱ्या सेटमध्ये मात्र लागोपाठ दोनदा कॉनर्सने स्वतःची सर्व्हिस राखली आणि तो लढत देईल अशी थोडीफार आशा निर्माण झाली; पण याच वेळेस मॅकेन्रो परत उसळला. स्वतःची सर्व्हिस राखून त्याने ३-२ अशी आघाडी घेतली. सेटच्या सहाव्या गेम-मध्ये सर्व्हिसची दुहेरी चूक कॉनर्सला भोवली आणि त्यानंतर मात्र चहात्याचे जोग्दार प्रोत्साहनही त्याला तारू शकले नाही! सेटच्या ९ व्याच गेममध्ये कॉनर्सच्याच सर्व्हिसवर त्याला एकही गुण मिळू न देता मॅकेन्रोने हा एकतर्फी सामना रुबाबात खिशात टाकला. *खरोखर त्या दिवशी त्यानं जो अप्रतिम खेळ* केला त्याला तोड नव्हती ! त्याच्या त्या खेळावर कॉनर्सकडे बिलकुल प्रत्युत्तर नव्हतं. मॅकेन्रोने या संपूर्ण सामन्यात आपल्या ११ सर्व्हिस गेमवर फक्त ११ गुण गमावले आणि १० दा बिनतोड सर्व्हिस टाकली यावरून त्याच्या खेळाचा दर्जा लक्षात येतो. मॅकेन्रोने फक्त ८० मिनिटांत कॉनर्सचा तीन सरळ सेटस्मध्ये 'कचरा' केला आणि विंबल्डन-मधल्या आतापर्यंतच्या दारुण पराभवांच्या आठवणी समीक्षक काढू लागले !

### क्रिस – प्रेक्षणीय खेळ

या सामन्याच्या तुलनेत मार्टिना नवरा-तिलोवा आणि क्रिस एव्हर्ट-लॉईड यांच्या-तील अंतिम सामना मात्र खूपच रंगला. मार्टिना आणि क्रिस खूपच जुन्या प्रतिस्पर्धी. जगातील अव्वल टेनिसपटू आज अनुक्रमे पहिल्या-दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या या दोघींची *गाठ विंबल्डनच्या अंतिम फेरीत* पडणार हे जवळजवळ नक्की होतं. मार्टिनानं गेल्या वर्षीची विंबल्डन, अमेरिकन, ऑस्ट्रे-लियन, फ्रेंच स्पर्धा जिंकून नुकताच एकेरीत आणि दुहेरीतही पाम श्रायव्हरच्या साथीत ग्रँड स्लॅम पुरा केलेला. त्यामुळं तिचं वर्चस्व वादातीतच होतं. शिवाय ग्रँड स्लॅममालिकेत मागच्या वर्षी विंबल्डन जिंकूनच सुरुवात केलेल्या मार्टिनाच या वर्षीही ही स्पर्धा जिंकून विजयवर्तुळ पुरं करायचं स्वप्न अस-णार हे उघडच होतं; पण क्रिस एव्हर्टही खूपच तुल्यबळ होती. ८२ सालानंतर ओळीने ११ सामन्यांत २९ वर्षांच्या क्रिसला मार्टिना-वर एकही विजय नोंदवता आला नसला तरी तिची जिद्द विलक्षण आहे शिवाय *आपल्यावर टीका करणाऱ्यांना आपल्या* खेळानेच उत्तर द्यायचं या इच्छेनं क्रिसन



क्रिस...
तिचा धडाका
आत्मविश्वास पाहून
मार्टिनाही भांबावून गेली

घडाक्यानं अंतिम सामन्याला प्रारंभ केला. मार्टिनाची सर्व्हिस दोन वेळा भेदून आणि स्वतःची एकदा राखून तिनं पहातापहाता ३-० अशी आघाडी घेतली. हॅनामांडलिकोव्हाला उपांत्य फेरीत तिनं ज्या पद्धतीनं हरवलं होतं तशीच ती आताही खेळत होती. तिचा धडाका, आत्मविश्वास इतका होता की, खुद्द मार्टिनाही काही काळ भांबावून गेली; पण पण हा दबाव क्रिस कायम राखू शकली नाही. ४ थ्या गेममधेच तिची सर्व्हिस तोडून मार्टिनाने आपला १ ला गेम जिंकला आणि परत स्वतःची सर्व्हिस राखली. यानंतर प्रत्येकीने स्वत.ची सर्व्हिस राखली; पण ८ व्या गममध्ये क्रिस ४–३ अशी पुढं असताना मार्टिनाने तिची सर्व्हिस तोडून सेट ४–४ असा बरोबरीत आणला. पुढे ६–६ पर्यंत ही बरोबरी कायम राहिली. टायब्रेकरचा अवलंब केल्यावर मात्र मार्टिनाने ७–६ (७-५) असा १ ला सेट जिंकला. या सेटमध्ये दोघींनीही तोडीस तोड खेळ केला. त्यांनी काही फटके तर विश्वास बसणार नाही इतके सुरेख मारले. विशेषतः मार्टिनाच्या सर्व्हिसवर क्रिसने मारलेले परतीचे फटके अप्रतिमच होते. अतिशय चपळाईने ती कोर्टवर हालचाली करत होती; पण तिला दबाव राखता आला नाही आणि मार्टिनाने मात्र अगदी मोक्याच्या वेळी गुण मिळवले. दुसऱ्या सेटमध्ये मात्र मार्टिना काहीशी वरचढ भासत होती. तरीही क्रिसने तिला चांगलीच लढत दिली; पण मार्टिनाच्या प्रभावी सर्व्हिसने तिला हात दिला. या सेटमधला ५ वा गेम तर विलक्षण रंगला. १–३ अशा गेमनी पिछाडीवर असताना स्वतःच्या सर्व्हिसवर क्रिसने ४०–० अशी आघाडी घेतली; पण मार्टिनाने तिला गाठले व ड्यूसवरून पुढचाही गुण घेतला; पण क्रिसने गेमपॉइंट वाचवून गेमही जिंकला. मात्र यानंतर ३–२ अशा आघाडीवरून मार्टिनाने तिला पुढे एकही गेम मिळू दिला नाही. शेवटच्या गेममध्ये तिनं ४०-० अशी आघाडी घेतल्यावर क्रिसने ४ मॅच–पॉइंटस् वाचवले; पण तिचा एक फटका मात्र कोर्टबाहेर गेला आणि मार्टिनाने हा सेट व सामनाही जिंकला! क्रिसएव्हर्ट–लॉइड सामना हरली तरी तिने लढत इतकी जोरदार दिली की, मार्टिनालाही आपले सारे कसब पणाला लावून खेळावं लागलं. त्यामुळंच हा सामना प्रेक्षणीय ठरला.

## जॉन–मार्टिनाची मक्तेदारी

तसं हे विंबल्डन मार्टिना-मॅकेन्रोचं म्हणूनच ओळखलं जाईल. या दोघांनीही एकेरीच्या विजेतेपदाबरोबरच अनुक्रमे पाम श्रायव्हर आणि पीटर फ्लेमिंगच्या साथीत दुहेरीची विजेतेपदंही खिशात टाकली आणि तिथलंही आपलं वर्चस्व स्पष्ट केलं, तशी या दोघांच्या यशाबद्दल फारशी कुणालाच शंका नव्हती. खेळात काहीही होऊ शकतं आणि त्यामुळंच फारसे अंदाज वर्तवले जात नाहीत; पण या वेळेस मात्र विशेष हे की, तज्ज्ञ, प्रेक्षक व बेटिंग करणारे लोक यांपैकी बहुतेकांना हे दोघंच जिंकणार याविषयी जवळजवळ खात्री होती आणि गेल्या संपूर्ण वर्षात प्रत्येकी फक्त १ सामना गमावणाऱ्या मार्टिना आणि मॅकेन्रोने त्यांचा विश्वास खोटा ठरवला नाही.


## लेंडल–विलँडर–कॅश

विजेत्यांनी जरी अपेक्षापूर्ती केली तरी काही खेळाडूंनी मात्र चांगल्या कामगिरीबद्दलच्या त्यांच्या चहात्यांच्या अपेक्षा फोल ठरवल्या. महिला खेळाडूंबद्दल बोलायचं तर उदयोन्मुख, तरुण खेळाडू आपली छाप उमटवण्यात अयशस्वी ठरल्या. गेल्या वेळची उपविजेती आँद्रिया जॅगर या वेळेस खांद्याच्या दुखण्यामुळे या स्पर्धेत उतरू शकली नाही. पाम श्रायव्हर आणि ब्रिटनचं आशास्थान असलेली ज्यो डुरी या सीडेड–खेळाडू उपांत्यपूर्व फेरीतच गारद झाल्या. ८१ सालची उपविजेती हॅना मांडलिकोव्हा उपांत्यफेरीत पोचली खरी; पण तिथं क्रिसएव्हर्ट लॉइडसमोर खेळताना ती पूर्ण निष्प्रभ ठरली! त्यातल्या त्यात चमक दाखवली ती सहाव्या सीडेड कॅथी जॉर्डनने. चौथ्या सीडेड पाम श्रायव्हरला तिनं उपांत्यपूर्वफेरीत हरवलं आणि नंतर मार्टिना नवरातिलोवालाही चांगली लढत दिली. अर्थात मार्टिनाला हरवायला ती पुरेशी नव्हती. परिणामी क्रिस व मार्टिना या दोन नेहमीच्या प्रतिस्पर्धीच पुन्हा एकदा विंबल्डन चषकासाठी खेळल्या. वाढत्या वयातही आपला अनुभव आणि कौशल्य यांचा योग्य समन्वय साधणाऱ्या क्रिसएव्हर्टची जिद्द खरोखरच विशेष आणि मार्टिनाबद्दल काय बोलणार? क्रीडाकौशल्याचं जे टोक तिनं गाठलं आहे त्याच्यापर्यंत इतर खेळाडू पोचूही शकत नाहीत. बियॉन बोर्गने ज्याप्रमाणे ७६ ते ८० या काळात सतत ५ दा

विंबल्डन अजिंक्यपद मिळवून आपली मक्तेदारी निर्माण केली होती तशीच आता मार्टिनाने केली आहे, असं म्हटलं तर अतिशयोक्ती ठरू नये.

पुरुष खेळाडूंमध्येही नेहमीचे परिचित चेहरेच चमकलेले दिसतात. जॉन मॅकेन्रोने या स्पर्धेत विजेतेपद मिळवलं असलं तरी या वर्षीच्या फ्रेंच ओपन स्पर्धेत लेंडलकडून पराभूत झाल्याने ही स्पर्धा सुरू व्हायच्या आधी त्याच्या मनावर बरंच दडपण होतं. स्पर्धा सुरू झाल्यावर मात्र ते नाहीसं झालं. कदाचित या स्पर्धेआधीच्या क्वीन्स क्लब टूर्नामेंटमधील विजयाने त्याला नवा आत्मविश्वास दिला असेल; पण त्याचं आपल्या खेळावर पूर्ण नियंत्रण होतं एवढं निर्विवाद ! खेळावरच्या नियंत्रणाबरोबरच किंवा त्यापेक्षाही जास्त जाणवलं ते त्याचं जिभेवरचं नियंत्रण ! मॅकेन्रोची या स्पर्धेतही वागणूक चक्क आदर्श होती. आपला राग त्यानं कधीही व्यक्त केला नाही. याच्यामुळं फुकट ताकद खर्च होऊन खेळावर लक्ष एकाग्र करणं अवघड जातं हे त्याला कदाचित जाणवलं असावं; पण त्याच्या या शांतपणामुळं, त्याची चिडचिड, आरडाओरडा यांची सवय झालेल्या विंबल्डनच्या प्रेक्षकांना मात्र अगदी चुकल्या-चुकल्यासारखं वाटत असणार !

द्वितीय सीडेड इवान लेंडल मात्र पुन्हा एकदा त्याच्याविषयीच्या अपेक्षा पुऱ्या करू शकला नाही. हा झेक खेळाडूच मॅकेन्रोचा अंतिम फेरीतील संभाव्य प्रतिस्पर्धी आहे असं मानलं जात होतं. लेंडलची गुणवत्ता वादातीत आहे; पण आतापर्यंत ग्रँडस्लॅम स्पर्धातील कोणत्याही स्पर्धेत चांगली कामगिरी तो करू शकला नव्हता. या दडपणाचा खेळावरही परिणाम झाला होता; पण या वर्षीच्या फ्रेंच ओपन स्पर्धेत अंतिम फेरीत मॅकेन्रोविरुद्ध पहिले दोन सेट हरल्यावरही शानदार खेळ करत त्यानं सामना जिंकला होता. त्यामुळे त्याचा आत्मविश्वासही वाढला होता; पण विंबल्डनच्या उपांत्य फेरीत मात्र लेन्डल-कॉनर्सची गाठ पडल्यावर हिरवळीच्या कोर्टवर कॉनर्सच अधिक प्रभावी ठरेल हे मॅकेन्रोचं भाकित खरं टरलं. २४ वर्षांच्या लेंडलच्या तुफानी सर्व्हिसला ज्या तडफेनं ३२ वर्षांच्या कॉनर्सने तोंड देऊन



कॉनर्स...
अंतिम फेरीत त्याचा सूरच
हरवला होता.
मॅकेन्रो-कॉनर्स सामना
त्यामुळे अतिशय कंटाळवाणा झाला.

त्याच्यावर मात केली ते खरंच कौतुकास्पद होतं. उपांत्य फेरीतल्या या पराभवाबरोबरच लेंडल पुन्हा एकदा मोठी कामगिरी करण्यात अयशस्वी ठरला. स्वीडनच्या मॅटस् विलँडरच्या पदरीही असंच अपयश आलं. 'ज्युनियर बोर्ग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या १९ वर्षांच्या खेळाडूकडं त्यानं दोन वर्षांपूर्वी 'फ्रेंच ओपन' जिंकल्यापासून मोठ्या अपेक्षेने पाहिलं जातं. या वर्षी मात्र ४थं सीडिंग मिळालेला विलँडर मनगटाच्या दुखण्याने या स्पर्धेत उतरेल की नाही याची शंका वाटत होती; पण तो उतरला आणि पहिले दोन सामने सुरेख खेळ करून त्याने जिंकलेही. मात्र तिसऱ्या फेरीत ऑस्ट्रेलियाच्या पॅटकॅश या बिनसीडेड खेळाडूकडून तो अनपेक्षितरीत्या पराभूत झाला आणि हा १९ वर्षीय पॅटकॅशच खऱ्या अर्थाने विंबल्डनमध्ये चमकला. परवा-परवापर्यंत त्याचं नावही कुणाला माहीत नव्हतं. तो पहिल्यांदा चमकला डेव्हिस कपस्पर्धेत आणि या विंबल्डनस्पर्धेनंतर तर तो टेनिसक्षेत्रातला नवा तारा म्हणून ओळखला जाऊ लागलाय. या स्पर्धेत त्याने मॅटस् विलँडर, केविन करन आणि आंद्रेझगोमेझ या सीडेड खेळाडूंना पराभूत करून उपांत्य फेरीपर्यंत धडक मारली. तिथं मात्र तो मॅकेन्रोकडून पराभूत झाला. एकेरीत चांगली कामगिरी करत असतानाच दुहेरीतही त्यानं पॉल मॅक्नामीच्या साथीत सरळ अंतिम फेरी गाठली. तिथंही ते मॅकेन्रोफ्लेमिंग जोडीला ५ सेटस्मध्ये जोरदार लढत देऊनच पराभूत झाले. ही स्पर्धा या अर्थाने कॅशनेच गाजवली. कॅश किंवा विलँडरसारखे खेळाडू या स्पर्धेतील अमेरिकन वर्चस्वाला शह देण्याची कुवत बाळगून आहेत.

## भारत पुन्हा पुन्हा निराश

या स्पर्धेतली भारतीयांची कामगिरी-या विषयावर जेवढं बोलावं तेवढं कमीच होईल. अर्थात कोणत्याही खेळातल्या खेळाडूंच्या निराशाजनक कामगिरीची आपल्याला इतकी सवय झालीय की, त्याच्याबद्दल आपल्याला आता काही वाटतही नाही. विंबल्डनच्या बाबतीतही दुसरं काही झालं नाही. पूर्वी एकदा रामनाथन कृष्णनने विंबल्डनची उपांत्य फेरी गाठली होती आणि ८१ साली विजय अमृतराज उपांत्यपूर्वफेरीत पोचला होता, एवढंच आपलं या स्पर्धेतलं कर्तृत्व. विजय अमृतराज कधी ना कधी विंबल्डनचे विजेतेपद मिळवील या आशेनं प्रत्येक विंबल्डनची आपण अगदी उत्साहानं वाट पहात असतो. वर्षामागून वर्षं उलटताहेत आणि विजय आता ३० वर्षांचा आहे. या स्पर्धेत तर एकेरीत आणि आनंद अमृतराजच्या

साथीत दुहेरीतही १ त्याच फेरीत पराभूत झाला. रमेश कृष्णनने गतसालच्या उपविजेत्या क्रिसलेविसवर मात करून आणि नंतर केविनकरनला चांगली लढत देऊन थोडी-फार चमक दाखवली; पण हे पुरेसे नाही. भारतीय खेळाडू मागे पडतात याचा अर्थ त्यांच्याकडे गुणवत्ता नाही असं नाही; पण जिंकण्यासाठी जे 'किलर इन्स्टिक्ट' लागतं त्यात ते जरूर कमी पडतात. तसं नसतं तर ८१ साली विजय अमृतराजविरुद्ध उपांत्य-पूर्व सामन्यात दोन सेटस् हरलेल्या आणि तिसऱ्यातही १–२ असं मागं पडलेल्या कॉनंर्सला विजयवर डाव उलटवता आला नसता! याच्याबरोबरच विजय, रमेश आणि इतर भारतीय खेळाडू यांच्या दर्जातला फरकही लक्षात घ्यायला हवा. या फरकामुळंच, म्हणजे दुसरी फळी हा प्रकारच अस्तित्वात नसल्यामुळं आपल्याला वर्षानुवर्षे एकाच खेळाडूकडे चांगल्या कामगिरीच्या अपेक्षेनं बघावं लागत. ही परिस्थिती बदलायची असेल तर गरज आहे ती योग्य खेळाडू निवडून त्यांना अगदी लहान वयातच योग्य प्रशिक्षण देण्याची. लहान वयातच त्यांना निवडणं जरूरीचं आहे. कारण त्यांच्या खेळाचा साचा एकदा ठरून गेल्यावर मग त्याच्यात बदल होणं कठीण असतं. निरुपमा मांकडच्या निवृत्तीनंतर महिला आघाडी-वरही सामसूमच आहे. तिथेही असे प्रयत्न व्हायला हवेत. दूरदर्शनच्या थेट प्रक्षेपणा-मुळे असेल किंवा आणखी कशाहीमुळे असेल टेनिसची जी आवड भारतात निर्माण झालीय त्याचा वेळीच योग्य उपयोग करून घ्यायला हवा. असं झालं तर भारताचीही एखादी महिला किंवा पुरुष खेळाडू आनंदानं आणि अभिमानानं विंबल्डन चषक–स्वीकारत असल्याचं दृश्य दिसायला वेळ लागणार नाही !

पुस्तके

# कृष्णाकाठ

## यशवंतराव चव्हाण यांच्या पूर्वजीवनातील आंदोलनाचे भावपूर्ण आकृतिबंध

वि. शं. पारगावकर

यशवंतराव चव्हाण यांच्या आत्मचरित्राची सुरुवातच मुळी सुप्रसिद्ध कवी, नाटककार आणि विनोदी लेखक श्री. गोविंदाग्रज यांच्या एका कवितेच्या शीर्षकापासून होते, 'कृष्णा-काठी कुंडल आता पहिले उरले नाही.' अशी काहीशी त्या कवितेची ओळ होती असे यशवंतरावांना स्मरते. कुंडल या गावाचा संबंध यशवंतरावांच्या बालजीवनाशी निग-डित आहे. त्यांचे आजोळ 'देवराष्ट्र.' हे गाव 'कुंडल' पासून दोन–तीन मैलांवर आहे. ते म्हणतात, 'कृष्णकाठी जसे कुंडल नव्हते व आजही नाही, त्याचप्रमाणे देवराष्ट्रही कृष्णाकाठी नव्हते व आजही नाही; पण तरीसुद्धा आम्ही सर्वजण स्वतःला कृष्णा-काठची माणसे समजतो.'

अशा एका स्मरणरमणीयतेपासून यश-वंतरावांच्या आत्मचरित्राला सुरुवात होते. ही सुरुवातच यशवंतरावांच्या अवघ्या जीवनावर व त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झग-झगीत प्रकाशाचा झोत टाकते. तसेच ते पुढे आणखी असेही म्हणतात, 'ग्रामीण जीव-नाची पार्श्वभूमी हा माझ्या जीवनाचा श्रीगणेशा आहे.' ते म्हणतात, 'पुढे मी राजकीय कामानिमित्त आणि सरकारी कामासाठी देशांतर्गत आणि सर्व जगातही खूप फिरलो. तरी पण या परिसराची ओढ माझ्या मनात कायमची राहिली आहे. असे का होते, ते मला माहीत नाही; पण वस्तु-स्थिती ही अशी आहे.'

व्यक्तीच्या आत्मचरित्रात स्मरणरमणीय-तेला फार महत्त्वाचे स्थान आहे. त्या व्यक्तीच्या जीवनाचा पायाच मुळी या स्मरणरमणीयतेवर (NostalGia) आधा-रित आहे. आज राजकारणात यशवंतराव चव्हाण यांचे नाव फार मोठे आहे; पण या विकासाचा उगम त्यांच्या लहानपणीच्या आयुष्यात आहे. देवराष्ट्र हे खेडे त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू आहे. कृष्णेच्या आस-पासचा प्रदेश त्यांच्या मनोविकासाचे माध्यम आहे. कराड ही त्यांच्या बालजीवनाची कर्मभूमी आहे आणि हे सारे त्यांच्या आत्म-चरित्रात येते ते केवळ शब्द बनून येत नाही तर एका वयाच्या विशिष्ट अवस्थेतील भावजीवनाचा त्याला आकार लाभतो.

हे त्यांचे भावजीवन जितके साधे आहे तितकेच ते शुद्ध आणि निर्मळ आहे आणि ते जितके सरळ साधे आहे तितकेच ते विश्लेषणात्मकही आहे.

एखादी व्यक्ती आपले आत्मचरित्र का लिहिते ? त्याचे उत्तर माझ्या दृष्टीने असे आहे की, आत्मचरित्राच्या माध्यमातून व्यक्ती आपल्या स्वतःचाच शोध घेत असते. हा शोध जितका प्रामाणिक असेल तेवढे ते आत्मचरित्र प्रभावी असते. मात्र या जीव-नाच्या अखंड प्रवासात ती एकटी, एकाकी केव्हाच असू शकत नाही. तिचे जीवन निसर्गाशी आणि समाजाशी बांधलेले असते. जसे एखाद्या रसायनातील अनेक घटक वेग-वेगळे करून त्या प्रत्येक घटकाचे अस्तित्व अबाधित राखता येते, तसे व्यक्तीचे नसते. कोणत्याही व्यक्तीला निसर्गापासून आणि समाजापासून अलग राहून जीवन जगताच येत नाही. ती निसर्गावर व समाजावर आरूढ होऊ शकेल; पण त्यांच्यापासून वेगळी राहू शकणार नाही. निसर्ग अथवा समाज व्यक्तीला घडवीत असतो, तसेच

व्यक्तीदेखील निसर्गाला आणि समाजाला घडवीत असते. हा मानवी जीवनाचा झगडा अखंडपणे अविरतपणे चाललेलाच असतो.

या झगडयाचे मोठे मनोज्ञ दर्शन यशवतरावाच्या आत्मचरित्रात घडते. कुठल्याही व्यक्तीचा आत्मचरित्र लिहिण्यामागे आणखीही एक हेतू असतो. तो म्हणजे तिचे भावजीवन, वैचारिक आणि बौद्धिक जीवन याचा एक आलेख मांडणे. अशी व्यक्ती जेव्हा समाजात जीवन जगत असते त्याबरोबरच त्या व्यक्तीचा आणि तिच्या भोवतालच्या समाजाचा एक इतिहास घडत असतो आणि ती व्यक्ती जेवढी संवेदनाक्षम असेल, बुद्धिमान असेल आणि महत्त्वाकांक्षी असेल तेवढे तिच्या आत्मचरित्राला अधिक महत्त्व येत असते.

यशवतराव ही एक असे जीवन जगलेली व्यक्ती आहे. त्याच्या जीवनाला कुठल्याही मोठया अगर प्रतिष्ठित घराण्याची पार्श्वभूमी अथवा परंपरा लाभलेली नाही. एका खेडयातील अत्यंत सामान्य घरात त्यांचा जन्म झाला. कुठलेही खास संस्कार त्यांना वारसा म्हणून लाभले नाहीत त्यांच्याभोवती होते फक्त त्याचे मन आणि त्या मनाभोवती होता निसर्ग आणि अशिक्षित मानवी समाज. त्यानी जे अनुभवाचे धन गोळा केले ते सारे याच पार्श्वभूमीवर. अशा परिस्थितीत माणसाच्या हाती असते ते फक्त जगणे आणि अशा जगण्यासाठी कष्टाची कामे करणे. अशा परिस्थितीत अत्यंत कष्टाने जीवन जगणारा लक्षावधी माणसाचा समाज अजून या देशात अस्तित्वात आहे. स्वातंत्र्य मिळूनदेखील आज तीन तपे उलटून गेली तरीही ही स्थिती, विशेषत: खेडयापाडयातील चित्र अजूनही बदललेले दिसत नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात तर अशा परिस्थितीची भीषणता फार होती.

अशा काळात यशवतरावाचा जन्म झाला. त्या काळाचे सर्व परिणाम आणि परिणामाच्या सर्व खुणा त्यांच्या जीवनावर उमटलेल्या दिसतात. या परिणामांचे ओझे वागवीतच त्यांच्या जीवनविकासाचा झगडा चाललेला त्याच्या आत्मचरित्रात दिसतो. मात्र या झगडयातून आपले व्यक्तिमत्त्व घडवीत असताना त्यांच्या मनावर ज्या प्रतिक्रिया उमटतात त्यांमध्ये कडवटपणा, उद्वेग, विषण्णता, उदासीनता, अगतिकता किंवा आकात याचे दर्शन तर ते घडवीत नाहीतच, उलट एक प्रसन्नता, उल्हास, समाधान तसेच प्राप्त परिस्थितीची एक उमदी जाणीव, आत्मविश्वास आणि आकांक्षा या वृत्तीचे सहज दर्शन त्यांच्या आत्मचरित्रातून सतत घडत राहते.

एकीकडून त्याचे जीवन कष्टमय धडपडीतून जात असता, परिस्थितीचे दाहक चटके बसत असताना, आर्थिक विवचनेचा एक काळा ढग सतत डोक्यावर तरंगत असताना ते एवढयाशा लहान वयामध्येदेखील कधी दिग्मूढ झालेले दिसत नाहीत. उलट भोवतालच्या लोकजीवनाचे निरीक्षण करण्यात आणि एकीकडे त्या लोकजीवनाशी समरस होताना, दुसरीकडे त्या जीवनाचा सूक्ष्म अभ्यास करताना त्यांच्या मनाचे जे दर्शन घडते ते मनोज्ञ वाटते.

## वाचन आणि वक्तृत्व

जेव्हा त्या वेळचा समाज पारतंत्र्याचे जीवन जगत होता, स्वातंत्र्यविषयक जाणिवांची त्या निरक्षर आणि गरीब समाजाला चाहूलदेखील लागलेली नव्हती, तेव्हा यशवतरावाच्या मनाला स्वातंत्र्यविषयक विचारानी घेरलेले होते. शाळेतील जीवनात त्यानी टिळकाची आणि टिळकांवरील अनेक पुस्तके वाचली. ते भजनी मंडळात सामील झाले. शिवजयंतीच्या उत्सवात त्यानी आत्मीयतेने भाग घेतला. त्यांनी रात्री-रात्री पायपीट करून लोकनाटये पाहिली. वक्तृत्वस्पर्धेत भाग घेतला आणि पारितोषिके मिळविली. पोहण्याचा छंद केला. त्यातच एकदा ते बुडता बुडता वाचले तसेच ते म्हणतात, 'महात्मा फुल्याचे चरित्र वाचल्यानंतर मला काही तरी नवीन वाचल्यासारखे वाटले. त्यानी उभे केलेले प्रश्न महत्त्वाचे आहेत; पण त्यासाठी कोठल्या तरी एका जातीचा द्वेष केला पाहिजे, ही गोष्ट काही मला पटत नाही. जे समाज मागे पडले आहेत, त्याना जागृत करणे, त्याच्यात नवीन धारणा निर्माण करणे हाच एक मार्ग उत्तम आहे अशी माझी बाजू होती.'

काही तरी नित्य नवीन वाचीत राहणे आणि त्यावर विचार करणे हा यशवतरावांचा छंद होता.

याच वयातील त्यांनी ऐकलेल्या एका तुफान सभेतील भाषणाचाही ते उल्लेख करतात. त्या व्याख्यानाचा विषय होता 'ब्राह्मणाचे भवितव्य'. ब्राह्मणसमाजाविषयी अत्यंत कठोर अशी टीका त्या भाषणात होती. याच सभेत वक्त्यानी लिहिलेले 'देशाचे दुष्मन' हे पुस्तकही वाटले जात होते. त्याची एक प्रतही यशवंतरावांनी मिळविली होती आणि ती त्यानी वाचून काढली. ते पुस्तक वाचल्यानंतर त्याच्या मनात झालेल्या संघर्षाचे त्यानी विश्लेषण केले आहे त्या संदर्भात यशवंतराव पुढे म्हणतात, 'त्याची परिणती अशी झाली की, मी मनाने आणि विचाराने आमूलाग्र बदललो -- विशेषत: श्री जवळकरानी टिळकावर केलेली टीका ही बरोबर नव्हती, असे माझ्या मनाने घेतले' त्या वेळी यशवंतराव मराठी सातवीच्या वर्गात शिकत होते. हे लक्षात घेतल्यावर यशवंतरावाचे मन आणि त्या वयात त्याच्या विचाराची दिशा या गोष्टीवर चागलाच प्रकाश पडतो.

एकीकडे एवढया लहान वयापासून आपले व्यक्तिमत्त्व घडवीत असता त्याचे मन विचाराच्या दुहेरी आंदोलनात गुतलेले असल्याचे स्पष्टपणे प्रत्ययाला येते. एक म्हणजे वाचनापासून निर्माण होणाऱ्या विचाराच्या आदोलनाचे आणि दुसरे म्हणजे सभोवतीच्या समाजाशी झालेल्या घर्षणामुळे निर्माण झालेल्या वैचारिक आणि भावनिक आदोलनाचे चित्र त्याच्या आत्मचरित्रात स्पष्टपणे आणि तेवढयाच नितळ स्वरूपात दिसते.

हे चित्र पाहात असतानाच व्यक्तीच्या आत्मचरित्राकडे पाहण्याचा एक दृष्टिकोण तयार होतो. वाचक व्यक्तीची आत्मचरित्रे का वाचतात? आणि ते कोणत्या दृष्टीने वाचतात? एक ललितकलाकृतीचा प्रकार म्हणून? का त्या काळाच्या इतिहासाची ओढ म्हणून? मला वाटते इतिहासाची ओढ म्हणून वाचकाना चरित्रवाङ्मय पुरते. एखाद्या व्यक्तीच्या आत्मचरित्रात त्या व्यक्तीच्या इतरांनी लिहिलेल्या चरित्रापेक्षा अधिक काही तरी असते. शिवाय आत्मचरित्राचा घाटही चरित्रवाङ्मयाच्या घाटापेक्षा निराळा असतो. आत्मचरित्रात

लेखकाची जी लेखनशैली असते तशा प्रकारच्या शैलीचा चरित्रग्रंथात अभाव असतो. त्या शैलीला बरेचसे विचारप्रधान ग्रथित रचनेचे रूप लाभलेले असते. तसेच चरित्र-ग्रंथाचे स्वरूप तटस्थ, त्रयस्थ, संशोधनात्मक, विधानात्मक आणि तर्कपद्धतीचा अवलंब करणारे असते.

आत्मचरित्रात चरित्रनायकाचे जे मन असते, त्या मनाची स्पंदने सतत जाणवत राहतात. याव्यतिरिक्त चरित्र-ग्रंथात आणि आत्मचरित्रात आणखी एक महत्त्वाचा प्रश्न जो सतत जाणवत असतो तो म्हणजे त्या व्यक्तीच्या जीवनातील स्फूर्तिस्थानाचा होय. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचे एक स्फूर्तिस्थान असते. ते स्फूर्तिस्थान त्या व्यक्तीच्या जीवनाचा केंद्रबिंदू असते. त्या स्फूर्तिस्थानाच्या प्रकाशाशिवाय ती व्यक्ती जीवन जगूच शकत नाही.

## स्फूर्तिस्थान

या संदर्भात माझ्या लहानपणीची एक गोष्ट इथे आठवते. माझी आई रात्री झोपताना एक गोष्ट सांगत असे. ती एका प्रचंड सळसळत्या नागाची गोष्ट असे. त्या नागाच्या मस्तकावर एक चकाकता खडा असे. रात्री जेव्हा तो नाग आपल्या भक्ष्यशोधार्थ म्हणजेच जीवन जगण्यासाठी बाहेर पडत असे, तेव्हा रानात एका विशिष्ट ठिकाणी तो आपल्या मस्तकावरील तो प्रकाशमान, चकचकीत खडा काढून ठेवीत असे आणि त्या मैल मैल पसरणाऱ्या प्रकाशात तो आपले भक्ष्य शोधीत फिरत असे. पुढे एकदा एका माणसाने संधी साधून नाग मैलभर दूर गेलेला असताना त्या विशिष्ट ठिकाणावरचा खडा घेतला आणि आपल्या खिशात घालून तो निघून गेला आणि मग इकडे या नागाचे सारे जीवन अंधारमय झाले. त्याला जगणे अशक्य झाले. म्हणजे तो प्रकाशमान खडा त्या नागाच्या जीवनाचे स्फूर्तिस्थान होता.

असेच प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचेही एक स्फूर्तिस्थान असते. तिच्या अवघ्या भावजीवनाला व्यापून राहिलेले हे स्फूर्तिस्थान, कोणते तरी एखादे प्रतीक असेल, एखादी वस्तू असेल, एखादी व्यक्ती असेल, एखादा परिसर असेल किंवा एखादे स्थान असेल. ते स्थान तिच्या जीवनाचा परवलीचा शब्द असेल, तिच्या जीवनाचा केंद्रबिंदूही असेल.

मला वाटते यशवंतरावांच्या जीवनाचे स्फूर्तिस्थान, केंद्रबिंदू हे त्याचे आजोळ आणि त्याच्या भोवतालचा सारा परिसर असावा. त्यांच्या अवघ्या भावजीवनाला आणि वैचारिक जीवनाला अर्थ या केंद्रबिंदूपासूनच प्राप्त झालेला आहे. तो सारा परिसर त्यांच्या जीवनाला आजवर विलक्षण स्फूर्ती देत आलेला आहे.

चरित्रग्रंथ आणि आत्मचरित्र यामधील भेद आणखीही एका दृष्टीने स्पष्ट करता येईल. चरित्र-ग्रंथात व्यक्तीच्या विकासाबरोबर तिच्या भोवतालच्या परिसराची जशी पार्श्वभूमी असते, तसेच त्या व्यक्तीच्या विकासाच्या टप्प्यामध्ये मुख्यत: वैचारिक घडामोडीचा, तिच्या मतमतांतरांचा, त्यामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाचा तत्कालीन जीवनावर पडणाऱ्या प्रभावाचा एक ऐतिहासिक आलेख मांडलेला असतो. तिच्या भावजीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न जरी चरित्र-ग्रंथाचा लेखक करीत असला तरी तो त्याचा प्रमुख उद्देश नसतो. उलट एखादी व्यक्ती जेव्हा आपले आत्मचरित्र लिहिते तेव्हा तिच्या त्या लेखनामागे त्या व्यक्तीचे भावजीवन पार्श्वभूमी म्हणून सतत आपल्या दृष्टोत्पत्तीस येत असते. तिच्यामधील वैचारिक जीवनाची आंदोलने देखील तिच्या भावजीवनाशी एकरूप झालेली असतात.

याशिवाय दुसराही एक महत्त्वाचा फरक आत्मचरित्रपटलेखनात असतो. तो म्हणजे ती व्यक्ती आपण जगलेल्या अवघ्या जीवनाची नोंद आपल्या आत्मचरित्रात करीत नसते. आपल्या जीवनामधील घटनांची एका विशिष्ट प्रकाराने आणि एक विशिष्ट हेतू मनासमोर धरून मांडणी करून ती आपले आत्मचरित्र लिहीत असते. म्हणजे तिने जगलेल्या जीवनाची एक विशिष्ट प्रकारेच निवड करण्याचे स्वातंत्र्य ती घेत असते. उलट चरित्र-ग्रंथलेखकाचा उद्देश यापेक्षा निराळा असतो. त्या व्यक्तीसंबंधी आणि तिच्या संबंधात उपलब्ध असणाऱ्या सर्व घटनांची नोंद चरित्र-ग्रंथाचा लेखक करीत असतो. असे करीत असताना त्याची दृष्टी एका तर्क-कर्कश संशोधकाची असते, एका इतिहाससंशोधकाची असते. असा चरित्र-ग्रंथ लिहीत असताना; त्या चरित्रनायकाचे आत्मचरित्र जरी त्याला उपलब्ध असले तरी त्याकडे तो एका संशयखोर दृष्टीनेच पाहत असतो. तसे त्याला पहावेच लागते. व्यक्तीच्या संदर्भात उपलब्ध होणाऱ्या पुराव्याकडे— अस्सल पुराव्याकडेच पाहून लिहिण्याची त्याची दृष्टी असते. पुष्कळ वेळा त्या लेखकाला उपलब्ध झालेल्या अस्सल पुराव्याच्या आधारावर तो लेखकाने लिहिलेल्या आपल्या आत्मचरित्राला आणि त्या आत्मचरित्राला लाभलेल्या स्वरूपाला देखील संपूर्णपणे बदलून टाकू शकतो.

हा मोठा आणि फार महत्त्वाचा फरक चरित्र आणि आत्मचरित्र याच्या रूपांमध्ये असतो. मग ही व्यक्ती तत्कालीन समाजात जेवढी महत्त्वाची असेल, तिच्या जीवनाचा विस्तार जेवढा अधिक प्रसरणशील असेल तेवढा हा फरक रुंदावत जाईल.

एकाच जातीच्या या दोन साहित्यप्रकारात हा फरक कशामुळे पडतो हे एव्हाना आपल्या लक्षात आले असेल. वर सांगितले ते एक कारण झाले. तसेच दुसऱ्याही एका दृष्टीने या दोन साहित्यप्रकारांकडे पाहता येते. काम्‍यू हा प्रसिद्ध लेखक म्हणतो त्याप्रमाणे माणसाचे जीवन हे अनेक प्रकारच्या विसंगतींनी आणि तर्कशुद्ध सातत्याच्या अभावाने भरलेले आहे. या विसंगतीतूनच आणि तर्कशुद्ध सातत्याच्या अभावातूनच माणूस आपल्या जीवनात संगती शोधण्याचा प्रयत्न करीत असतो आणि या त्याच्या सततच्या चाललेल्या धडपडीलाच माणूस जीवन या नावाने संबोधीत असतो.

म्हणजे विसंगतीकडून तर्कसंगतीकडे जाण्याची त्याची सततची धडपड असते. म्हणून एखादी व्यक्ती जेव्हा आपल्या जीवनाला एक तर्कसंगत रूप देण्याचा तिचा प्रयत्न असतो आणि हा प्रयत्न म्हणजेच व्यक्तीच्या आत्मचरित्राचे रूप असते. हे रूप तिच्या अवघ्या जीवनाची एका विशिष्ट प्रकारे निवड करून ती साधीत असते. म्हणूनच आत्मचरित्र हा एक वाङ्मयाचा ललितप्रकार असतो. ती एक ललितकृतीच असते असे म्हणावयास हरकत नाही. आपल्या भावजीवनाचे आणि वैचारिक जीवनाचे टप्पे आपल्या जीवनविषयक विशिष्ट दृष्टिकोणातून मांडणे हा तिचा त्या लेखनामागील

प्रमुख हेतु असतो. आपल्या व्यक्तित्वामध्ये वैचारिक जीवनाची जी जडणघडण होत असते ती मुख्यत: व्यक्तीच्या भावजीवनाच्या आधारेच आणि असे आलेखन फक्त एखादी व्यक्ती आपल्या आत्मचरित्रातूनच करू शकते. चरित्रग्रंथात अशा आत्मप्रकारित भावजीवनाला काही बाह्य पुराव्याचा आधार असल्याशिवाय वाव नसतो.

## यतींद्रनाथांचे उपोषण

याचे एक उदाहरण मी यशवंतरावांच्या आत्मचरित्रामधीलच देतो. ते पान ४३ वर म्हणतात. 'याच सुमारास किंवा याच्या थोडे पुढे–मागे माझ्या भावविश्वात क्रांती करणारी एक विशिष्ट घटना घडली. ती घटना म्हणजे यतींद्रनाथ दास यांनी सुरू केलेले आमरण उपोषण आणि याच संदर्भात पुढे ते लिहितात. यतींद्रदासांची प्रकृती उपवासामुळे दिवसेंदिवस खंगत चालली होती. माझी अस्वस्थताही प्रत्येक दिवशी वाढत होती...क्षणाक्षणाला ते मृत्युसमीप जात असल्याची कल्पना मला अस्वस्थ करून सोडीत होती...अखेर तो दुष्ट दिवस उगवला. एके दिवशी लाहोरच्या तुरुंगात भर दुपारी एकच्या सुमारास प्रखर सूर्याला साक्षी ठेवून त्यांनी प्राणाहुती दिली मायभमोसाठी! कणाकणाने झिजून त्यांनी तेजस्वी आत्मार्पण केले !

पुढे पान ४४ वर ते याच घटनेविषयी लिहितात, '.. या घटनेमुळे माझ्या मनोवृत्तीत आमूलाग्र बदल झाला. देशात घडणाऱ्या घटनांचे अर्थ समजावून घेण्याच्या मनस्थितीपर्यंत पोहोचलो. जातीय विचारांच्या संकुचित कोंडवाड्यातून बाहेर पडण्याचा माझा विचार पक्का झाला...संकुचित दृष्टीने काम करण्यापेक्षा कुठल्या तरी व्यापक दृष्टीने काम केले पाहिजे अशी मनाची घडण होत होती...कणाकणाने आणि क्षणाक्षणाने ज्यांच्यासाठी देहत्याग करावा, अशी ध्येये आणि कामे या देशामध्ये आहेत. एका अर्थाने माझा आपल्या मनाशी निर्णय झाला. मला माझ्या आयुष्याचे सार समजले आणि सूर सापडला.'

आता पुन्हा याच घटनेभोवती गुंतलेल्या त्यांच्या मनाचे चित्रण ते करतात. 'यतींद्रनाथांच्या मृत्यूने मी हादरून गेलो होतो हे प्रत्यक्ष माझ्या आईने पाहिले होते. ज्या दिवशी यतींद्रनाथ वारले, तो सबंध दिवस मी जेवलो नाही. रात्री झोपलोही नाही !'

यशवंतरावांचे भावजीवन ढवळून काढणारी ही घटना त्यांच्या आत्मचरित्रात आहे. अशा अनेक घटना आहेत ज्यामधून आपल्याला त्यांच्या वैचारिक जीवनातील आंदोलने आणि त्यांच्या भावजीवनामधील कल्लोळ यांचे मोठे प्रभावी दर्शन घडते. यशवंतराव आज आपल्याला माहीत आहेत ते मुख्यत्वे एक राजकीय व्यक्ती म्हणून; पण त्यांचे हे व्यक्तित्व कसे घडत गेले याचे कुतूहल जसे त्यांच्या वाचकांना असेल तसेच ते त्यांनाही असले पाहिजे आणि त्या कुतूहलापोटीच त्यांनी आपल्या आत्मचरित्राच्या माध्यमातून याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## वैचारिक प्रभाव

भावजीवनाबरोबरच वैचारिक आंदोलने त्यांच्या जीवनाशी कशी येऊन भिडत होती याचेही त्यांनी केलेले चित्रण मोठे मार्मिक आहे. म. गांधी, जवाहरलाल नेहरू आणि मानवेन्द्रनाथ रॉय यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाच्या लाटा त्यांच्या भावजीवनाला कशा ढवळून काढीत होत्या त्याचे चित्रण त्यांनी आपल्या आत्मचरित्रात पान १५८ वर केलेले आहे. ते म्हणतात, 'गांधींच्या व्यक्तिमत्त्वावर निष्ठा, पंडित जवाहरलाल नेहरूंच्या विचारासंबंधी एक नवी जवळीक.. आणि मानवेन्द्रनाथ रॉय यांच्या विचारांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, अशा या वैचारिक त्रिकोणात मी या वेळी उभा होतो.'

हे जे वेगवेगळ्या प्रकारचे आघात–प्रत्याघात यशवंतराव यांच्या जीवनावर होत होते त्यामुळे भावनांचा कल्लोळ उडत होता आणि या साऱ्या रसायनातून एक नवी आकृती घडत होती. ती आकृती म्हणजेच यशवंतराव यांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या या व्यक्तिमत्त्वाच्या जडण–घडणीशी जसा त्यांच्या सभोवती घटणाऱ्या प्रसंगांचा संदर्भ आहे, तसेच त्या वेळच्या प्रसिद्ध व्यक्तींच्या वैचारिक जीवनाचा आदर्शही त्यांच्याशी संलग्न आहे आणि या दोन्ही गोष्टींव्यतिरिक्त अखंड वाचनातून त्यांनी मिळविलेल्या ज्ञानाचाही फार मोठा वाटा आहे. साहित्यामधील सर्व वाङ्मयप्रकारांशी त्यांचा संबंध आलेला आहे. त्यांनी उत्तम ललितकृतींचे वाचन केले आहे. त्यांनी बर्नार्ड शॉ यांच्या नाट्यसंहितेचें जसे सूक्ष्म वाचन केले आहे, तसेच त्या वेळी गाजलेल्या समाजवादावरील पुस्तकांचेही वाचन केले आहे. म. गांधींचे 'हरिजन' हे साप्ताहिक तर ते न चुकता वाचीत असत. या सर्व राजकीय आणि वाङ्मयाच्या सहवासाने त्यांचा राजकीय पिंड तयार झाला आणि त्यांच्या जीवनाला एक विशिष्ट प्रकारचा तोल आला. कोणत्याही राजकीय व्यक्तीच्या बाबतीत जी गोष्ट अत्यंत महत्त्वाची असते ती म्हणजे तिचे मन अनेक प्रकारच्या विषयांनी समृद्ध व्हावे लागते. अशा या मनाचा साक्षात्कार यशवंतरावांच्या आत्मचरित्राच्या या पहिल्या खंडात घडतो. असे हे दुर्मिळ व्यक्तित्व आज महाराष्ट्रात फक्त यशवंतराव यांचेच आहे !

या अशा वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास पुढे कसा होत गेला, हे पाहण्याची उत्सुकता आज प्रत्येक मराठी मनाला आहे. ज्यांनी त्यांच्या आत्मचरित्राचा हा पहिला खंड वाचलेला असेल त्यांची उत्सुकता आता नक्कीच वाढलेली असेल. मला व्यक्तिशः त्यांनी केलेल्या राजकरणाचा आणि त्यांच्यावर घडलेल्या वाङ्मयीन संस्कारांचा आलेख त्यांच्याच शब्दांतून आणि शैलीतून वाचण्याची विशेष उत्सुकता आहे. □

यशवंतराव चव्हाण
आत्मचरित्र
खंड पहिला
'कृष्णाकाठ'
प्रेस्टिज प्रकाशन, पुणे
पृष्ठे : ३२१, मूल्य : ६६ रुपये.

# गारांचा पाऊस

शोभा भागवत

## अध्यक्षमहाशय आणि माझ्या बंधुभगिनींनो....

शाळेत लोकमान्य टिळकपुण्यतिथीचा कार्यक्रम होता. ५–६ मुलं बोलणार होती. सर्वांची भाषणं 'पाठ' करून घेतली होती शिक्षकांनी. 'हातवारे' कसे करायचे ते पण सांगितलं होतं. टेबलाच्या कडेला डावा हात टेबलावर ठेवून उभं रहायचं. अध्यक्षमहाशय म्हटल्यावर उजव्या हातानं अध्यक्षांकडे निर्देश करायचा आणि माझ्या म्हटल्यावर स्वतःच्या छातीवर हात ठेवायचा आणि बंधुभगिनींनो म्हणताना श्रोत्यांवरून डावीकडून उजवीकडे अर्धवर्तुळाकार हात फिरवायचा हे गुरुजींनी करून दाखवलं होतं. प्रत्येकाच्या भाषणात 'चिखलात जणू कमळच उगवले' हे वाक्य होतं, तसंच 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हे म्हणताना टेबलावर मूठ आपटायची हेही ठरलेलं होतं. तसं व्यवस्थित सगळं चालू होतं; पण एक मुलगा पाठ म्हणून दाखवता दाखवता पुढे पुढे चालत गेला. टेबलापासून दूर गेला आणि स्वराज्य हा माझा जन्मसिद्धहक्क आहे वाक्य आलं. तो इकडे तिकडे मूठ आपटायला बघू लागला. टेबल मागे राहिलं होतं. मग तो लगबगीनं मागे आला, टेबलावर मूठ आपटली, मग श्रोत्यांकडे वळून 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' म्हणाला. मग पुढे भाषण सुरू केलं. सगळ्यांची हसता हसता पुरेवाट झाली. ही लगबग पाहून एक मुलगा तर पाठांतरच विसरला आणि इतका बावरला की नकळत त्यान चड्डीवर नको तिथे हात धरून पुढचं भाषण अंऽअंऽ करत पूर्ण केलं कसंबसं. त्याची रडकुंडीला आलेली परिस्थिती आणि श्रोते हसतायत असा विसंगती नावाचा विनोद चालू होता.

भाषणाची तयारी करून घेताना गुरुजी अनेक गोष्टी सांगायचे. धीटपणे बोलायचं. समोरचे सगळे लोक मूर्ख आहेत असं समजून बोलायचं वगैरे; पण अगदी परवा–परवापर्यंत भाषणाला सुरुवात करताना हॉलभर आपल्याच हृदयाचे ठोके ठक् ठक् ठक् ठक् करून घुमत आहेत असं वाटायचं. आपल्याला जे बोलायचं आहे त्याचा आपण भरपूर अभ्यास केलाय, त्यावर आपले म्हणून स्वतःचे स्वतंत्र विचार आहेत, ते लोकांपर्यंत पोचवायची आपल्याला तळमळ आहे. समोरचे लोक मूर्ख नसतात. त्यांच्याशी भाषणातून आपल्याला संवाद साधायचा असतो ह्या गोष्टी जसजशा कळत गेल्या तसतसा बोलण्यात सहजपणा येत गेला. साधेपणा, सोपेपणा येत गेला. भीती कमी झाली आणि भाषण ही काही एवढी प्रचंड कठीण गोष्ट नाही. एरवी बोलतो तशापैकीच अनेक लोकांशी एकदम बोलायचं. त्यांना कंटाळा आणायचा नाही इतकं हे साधं आहे हे लक्षात आलं.

मुलांची भाषणं पाठ करून घेणं, त्यावर हातवाऱ्यांचे अलंकार चढवणं हा सगळा अव्यापारेषु व्यापार असतो अशी आता खात्री वाटू लागली आहे. वर्षातून एकदा किंवा दोनदाच वक्तृत्वस्पर्धा (याला खूप मुलं वक्तृत्वस्पर्धा म्हणतात.) ही पद्धतच चुकीची आहे. वर्गातच रोज दोन तरी मुलांना वर्गाला गोष्ट सांगणं, एखाद्या विषयावर काही वाचलेलं सांगणं, घडलेली घटना सांगणं, अमुक एका गोष्टीबद्दल 'मला काय वाटलं' ते सांगणं ही प्रथा शाळेत निर्माण केली पाहिजे. एखादी गोष्ट शिकवताना मुळातला दृष्टिकोनच चुकीचा असला की त्याचे परिणाम खूप काळ रहातात.

वक्तृत्वस्पर्धेसाठी भाषण ही मुळात पहिली चूक. कारण त्यात शाळेतली चारच मुलं तयार होणार. स्पर्धेला ठेवलेले प्रचंड कठीण विषय– चारित्र्यसंवर्धन हेच खरे शिक्षण इ. चारित्र्य म्हणजे काय आणि संवर्धन म्हणजे काय हे माहीतही नसताना बोलायचं. साहजिकच मग शिक्षकांनी खूप उच्च उच्च शब्द वापरून भाषण लिहून द्यायचं चूक नं तीन. मुलांनी पाठ करायचं चूक नं. चार आणि त्याचा ताण पंधरा दिवस घेऊन एकदाचं ते स्पर्धेला आपण खूप स्मार्ट आहोत, सहजपणे बोलतो आहोत असा आभास निर्माण करत ओकून दाखवायचं.

यापेक्षा सहजपणे हे शिक्षण होणार नाही का? मुलांच्या निबंधातूनही मुलांना काय काय कळतं, काय वाटतं, त्यांचा अनुभव काय हे काही व्यक्त करण्याची संधी क्वचितच मिळते आणि निबंध–लेखन हा आनंद न राहता वेठबिगारी होते.

वक्तृत्व किंवा लेखन हे मुळात आपल्यात जे नाही ते दाखवणं, प्रदर्शन असं नाहीच. जे मनातून स्फुरतं तेच बोललं पाहिजे, लिहिलं पाहिजे आणि त्यासाठी मनाच्या खजिन्यात भर घालत राहिलं पाहिजे हे मुलांना समजावून द्यायला हवं.

या संदर्भात एका दिग्दर्शकानं सांगितलेलं आठवलं. तो म्हणतो मी अभिनेत्यांना असं असं रडा, असं हसा, अस कधी सांगत नाही. फक्त प्रसंग समजावून देतो, मनस्थिती कशी असेल ते सांगतो आणि ह्या प्रसंगी आता तू कसा वागशील, बोलशील तसं कर असं सांगतो.

आपण वक्तृत्वात, लेखनात, नाटकात मुलांना हे असं असं करा असंच सारखं दाखवत असतो. त्यामुळे अभिनय हा अभिनयच राहतो. तो जिवंत होत नाही. मग राक्षसाचं हसणं असं इतर मख्खपणावर चिकटवल्यासारखं हः हः हः हः असं स्वतंत्र तरंगत राहतं. स्पर्धेत मिळालेली ढाल घेऊन परतलं की, पुन्हा पुढल्या स्पर्धेपर्यंत वक्तृत्व हा विचार डोक्यात नसतो. निबंध लिहायची वेळ आली की, सरांनी किंवा बाईंनी मुद्दे द्यायची मुलं वाट बघतात.

ह्या गोष्टी करणं, ही कौशल्यं शिकणं ही अशी तात्कालिक गोष्ट नसतेच. ते रोजच्या जगण्यात मिसळून जायला हवं. वक्तृत्व संपादन करायचं तर चांगल्या वक्त्यांची भाषणं वाचायला हवीत, त्यांची रचना अभ्यासायला हवी, भाषणं ऐकायला हवीत,


आपण कसे बोलतो ते टेप करून ऐकायला हवं, एरवी आपण लोकांशी कसे बोलतो ते लक्षपूर्वक पहायला हवं, आपल्याजवळ लोकांना सांगण्यासारखं खरंच काही साठलंय का हेही बघायला हवं. त्यासाठी वेगवेगळे अनुभव घेत राहणं, ते मांडताना भाषेचे प्रयोग करणं, भाषेचं अंतरंग समजून घेणं हे सगळं आपल्या जगण्याचा भागच बनलं पाहिजे.

मग लहान मुलांची भाषणं अगदी पाच–सात ओळींचीच असतील. तिसरी चौथीतल्या मुलांना सलग २ मिनिटं कदाचित बोलता येईल, पाचवी–सहावीतल्या मुलांना ३–४ मिनिटं बोलता येईल. दहा मिनिटं भरून काढणं हा उद्योग होता कामा नये. सहजपणे ताण न घेता बोलणं मुलांना शिकता आलं पाहिजे, पुन्हा पुन्हा ते करण्याची संधी शाळेत, घरात मिळाली पाहिजे.

हे जर आज आपल्या लहान मुलांसाठी केलं नाही तर आज आपण एका कंटाळवाण्या खोटया, दिखाऊ वक्त्याचं बी पेरून ठेवतो आहोत जे पंचवीस वर्षांनंतर बहराला येणार आहे आणि त्याच्याबरोबर अगणित कंटाळलेले श्रोते निर्माण करणार आहे. □

---

# कुंपण आणि आकाश



## मंगला गोडबोले

आपल्याकडे श्रावणमहिन्याचं आणि बायकांच्या व्रतवैकल्यांचं नातं फार जुनं आहे. फरक इतकाच की, पूर्वी या महिन्यात फक्त सणवार, व्रतवैकल्यं व्हायची, तर हल्ली तीही तितकीच धुमधडाक्यानं होतात आणि ती करावीत की करू नयेत याविषयीच्या चर्चाही तितक्याच हिरीरीनं केल्या जातात. एकानं स्त्रियांचा वेळ जातो आणि दुसऱ्यानं मासिका–साप्ताहिकांचे रकाने भरतात. एरवी दोन्हीतही नाविन्य बेताचंच असतं. उदाहरणार्थ व्रतवैकल्यांचं समर्थन करणारांनी त्यामागचा अर्थ शोधायचा, शास्त्रीय आधार शोधायचे किंवा त्या जुन्या व्रतांना नव्या सामाजिक जाणिवेच्या झालरी मोठ्या हौसेनं जोडायच्या. म्हणजे तुळस हवा शुद्ध करते म्हणून ती दारासमोर असण्याचं समर्थन करायचं किंवा शुक्रवारच्या सवाष्णीऐवजी मोलकरणीला जेवायला घालावं, सोळा सोमवारांच्या उद्यापनाला कुष्ठधामातली जोडपी बोलवावीत, असे सामाजिक जाणिवेचे सल्ले द्यायचे. हे झालं व्रतसंबंधीच्या विचाराचं एक टोक. मोलकरणीला जेवायला द्यायचं ते श्रावणातच का? शुक्रवारीच का? असा विचार करायला लागलं की, या युक्तिवादातलं वैय्यर्थ जाणवल्याशिवाय राहत नाही. विचाराच्या दुसऱ्या टोकाला, ही व्रतं जातिव्यवस्थेला, सामाजिक अन्यायाला, स्त्रीच्या अप्रतिष्ठेला खतपाणी घालणारी आहेत म्हणून ती कधी कोणीच करू नयेत, असा पुरस्कार केला जातो. वास्तविक पाहता सामाजिक जाणीव ही काही आजच्या मूठभर पुरोगामी विचारवंतांची मिरासदारी नाही. तसं असतं तर एकेका प्राण्याची, पक्ष्याची, एकेका नात्याची, प्रसंगाची आठवण ठेवणारी सणवारव्रतं आपल्या समाजात यापूर्वी कधीच झाली नसती. ( उदाहरणार्थ अनुक्रमे : बैलपोळा, कोकिळाव्रत, भाऊबीज, पाडवा, अविधवानवमी, गंगापूजन अशी काही व्रते, सणवार आठवावेत. ) याबाबत शक्यता अशी दिसते की, ज्या कामात मानवी जीवन आजच्यापेक्षा सर्वार्थानं लहान व संकुचित होतं, ज्या काळात मानवी संबंध हे मुख्यतः कुटुंबाधिष्ठित होते, ज्या काळात एकूण सामाजिक अभिसरणच फार मर्यादित होतं त्या काळाच्या न्यायाच्या कल्पनांप्रमाणे कुठे तरी कधी तरी हे समारंभ ठरत गेले असले पाहिजेत. आज सामाजिक अभिसरण खूपच वाढलं आहे. सर्व समाज समान पातळीवर वेगवेगळ्या नात्यांनी जगू बघतोय, सर्वांना समान संधीचं तत्त्व आपण स्वीकारलं आहे. त्यामुळे, पार्श्वभूमी खूप व्यापक झाल्यावर मूळचंच चित्र अगदी नगण्य वाटावं, तसं या व्रतवैकल्यांबाबत आपलं होतंय. लांब कशाला ज्या संतांनी महाराष्ट्रात विठ्ठलभक्तीच्या रूपाने मानवतावादाचा पाया रोवला, एक प्रकारची मानवतावादी चळवळच अभावितपणे उभी केली, त्यांच्यातलाच एक अग्रेसर कवी रामदास एके ठिकाणी काय म्हणून गेला आहे ?–

भेद ईश्वर करून गेला।
तो त्याचे वाचेनि न वचे मोडिला ॥

यावरून रामदासांची जाणीव कोती ठरत नाही तर त्या वेळच्या देशकालपरिस्थितीचा परिपाक म्हणून त्याकडे बघावं लागतं. तसंच व्रतांकडेही बघावं लागेल. मग व्रतं स्त्रियांनाच का? सौभाग्यवतीचं कौतुक का? मुलगा असण्याची अपूर्वाई का? याचा अर्थ लागत जाईल.

सारांश सणवार, व्रतवैकल्य यात सात पिढ्यांचा घोर अन्यायही नाही आणि सात पिढ्यांचा उद्धारही नाही. स्त्री–पुरुषांच्या आजच्यापेक्षा वेगळ्या भूमिका असणाऱ्या, एका वेगळ्या काळात, एका वेगळ्या समाजरचनेसाठी ती निर्माण झाली होती. आज ती स्वच्छपणे गैरलागू आहेत. तरीही ती होतात. का? विरंगुळा म्हणून सामाजिकीकरण व्हावे म्हणून. फॅशन म्हणून. सवय म्हणून. उत्सवप्रियता आहे म्हणून. एरवी सर्वसाधारण माणसांच्या बाबतीत त्याचा धर्माशी फक्त नावापुरताच संबंध असतो. किंबहुना धर्मभावनेची तीव्रता कमी झाली आणि प्रदर्शन वाढलं, म्हणजेच कर्मकाण्डाचं प्राबल्य माजलं असाच जगातल्या बहुतेक सर्व धर्मांचा इतिहास आहे. आपणही त्याला अपवाद नाही. व्रतवैकल्यांमागची ही दूरस्थ धर्मभावना बहुतेक स्त्रियांच्या बाबतीत सुस्त अजगरासारखी पडून असते. जरा डिवचली की, मात्र अख्खं अस्तित्वच ती गिळू बघते. स्त्रीचळवळीच्या सुरुवातीच्या काळात नेमकं हेच झालं असलं पाहिजे. फार कशाला, आजही पहिल्यांदा एखाद्या स्त्रीच्या किंवा समूहाच्या व्रतवैकल्यांना आक्षेप घेतला गेला की, पहिली प्रतिक्रिया हीच असते. का करू नको? आम्ही करणार !

यातला 'आम्ही' हा शब्द सर्वांत महत्त्वाचा ! त्यामागची समूहाची भावना, समूहातली सुरक्षितता, समूहाचं आंधळं

अनुसरण हे महत्त्वाचं ! अखेरीस हे सगळं असतं तरी काय ? हे तर छोट्या माणसांच्या जगण्याचे छोटे आधार असतात. विचारांना कितीही पटलं तरी एका क्षणी, झटक्यात, क्रूरपणे हे आधार हिसकावून व्यक्तीला निराधार करणं, तिच्या जीवनात पोकळी निर्माण करणं कितपत बरोबर आहे याविषयी माझ्या मनात शंका आहे. याउलट या आधाराची गरजच भासू नये इतकं सामर्थ्यवान, हेतुपूर्ण जीवन स्त्रिया कशा जगतील हे आजच्या काळाचं खरं आव्हान आहे असं मी मानते.

साधी गोष्ट आहे. आज शहरापासून दहा दहा मैल आत जाऊन बघावं. या व्रतवैकल्याचं स्वरूप क्रमाक्रमानं गडद होत जाताना दिसेल. तसंच शहरांमध्येही धकाधकीचं, व्यावसायिक स्पर्धेचं जीवन जगणाऱ्या स्त्रियांपेक्षा पूर्ण वेळ गृहिणी जास्त मन लावून व्रतवैकल्य करताना दिसतील. म्हणजेच जिथे वेळ आहे, सुविधा आहे आणि मुख्यत्वेकरून मनाचं रितेपण आहे तिथे व्रतवैकल्यांचं प्राबल्य आहे असं स्थूलमानानं म्हणता येईल. ( व्यक्तिगत गरजांना मुरड घालून, वेळ, पैसा, श्रम उधळून खरोखरच देहदंडानं केलेल्या व्रतांचं प्रमाण आहे पण अत्यल्प आहे. ) त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तीच्या जीवनातसुद्धा जसजसं वय, विचाराची शक्ती, प्रचलित समाजजीवनाचं भान वाढत जातं तसतसा सणवारव्रतांचा आग्रह कमीकमी होत जातो, अशीही पुष्कळ उदाहरणं दिसतात. अशा व्यक्तींना मागे वळून बघताना आपल्या भाबडेपणाचं, आंधळेपणाचं, प्रवाहपतितपणाचं आश्चर्य वाटतं आणि पुरेशी प्रामाणिक असली तर ती ते कधी बोलूनही दाखवतात. याबाबतीत नाळ कापण्याचा एक क्षण, एक प्रसंग किंवा एक विचार असा नसतो, तर स्वतःच्याही नकळत सावकाशपणे पण निश्चितपणे चालू राहणारी ती एक प्रक्रिया असते. ही ही प्रक्रिया स्त्रियांच्या मनामध्ये सुरू करून देणं हे आजच्या स्त्रीचळवळीचं खरं कार्य असायला हवं. नाळ कापण्याचा जो क्षण ज्याचा त्यानं किंवा जिचा तिनं स्वतःच शोधला किंवा गाठला तर कुणालाही न दुखवता, अतिशय अलगदपणे, सहजपणे अनावश्यक फापटपसारा गळून पडेल याची मला खात्री वाटते.

गेली चारपाच वर्षं नेमक्या चातुर्मासाच्या दिवसात एक गरीब बाई आमच्या बंगल्यात येऊन अंगणातलं काहीबाही वेचायच्या. कधी लाल फुलं, कधी पांढरी फुलं, कधी दूर्वा वगैरे ! आर्थिक स्थिती सुधारावी, मुलगा पोटाला लागावा म्हणून देवाला साकडं घालण्यासाठी त्या कसले कसले लक्ष वाहायच्या म्हणे. परवा सहज भेटल्या होत्या आणि 'यंदा येणार का ?' म्हणून विचारलं तर म्हणाल्या, 'नाय बा. यंदा आपल्याला टैम नाही.'

म्हटलं का हो ? सकाळी घराबाहेर तर पडलेल्या दिसत्या.'

तर म्हणाल्या, 'माल आणायला जाते. या दिवसात बायकांना घरोघरी उपवासाचे पदार्थ, भाजण्या वगैरे हव्या असतात त्या करून द्यायला सुरुवात केली. चार महिने श्वास घ्यायला फुरसत मिळणार नाही असं वाटायला लागलंय.'

'मग तुमचा देव, त्याचं साकडं कुठे गेलं ?'

'देव असतोच हो देवळात, जाता–येता देवळाबाहेर चपला काढून चटकन एक नमस्कार करते. तो पोचतो त्याला.'

मला गंमत वाटली. 'त्याला' काय पोचतं, रुचतं, पचतं हे कोणालाच माहिती नाही. आपल्या जीवनात त्याला कितपत स्थान देणं आपल्याला परवडणार आहे हा खरा प्रश्न असतो. पुढे–मागे या बाईचा धंदा वाढला, पायी जाण्याऐवजी वाहनावर वगैरे ये–जा करण्याइतकी परिस्थिती सुधारली, पायात फटफट्या रबरी सपाताऐवजी सोयीचे हलके सुरक्षित असे सॅण्डल आले तर पुढेमागे नमस्कार करण्यासाठी सॅण्डल काढण्याच्या फंदातही ती कदाचित पडणार नाही आणि त्याच्याही पुढे–मागे कधी तरी 'ऑर्डर' पोचवायच्या घाईत नमस्कार करण्याची तिला तितकी निकडही वाटणार नाही !

अशा वेळी पुन्हा पुन्हा बिरबलाची ती जुनीच गोष्ट नव्यानं आठवते. एखाद्या रेषेला धक्काही न लावता ती लहान वाटायला हवी असेल तर तिच्याशेजारी ठळक मोठी रेघ काढावी असं बिरबलानं सुचवलं होतं. बायकांच्या बाबतीतही तेच करायला हवंय. हेतुपूर्ण जगण्याची ठळक मोठी रेघ काढून बघू या, व्रतवैकल्याच्या छोट्याछोट्या रेषा केव्हाच गायब होतील ! □


एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला ?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

लेक वालेसा
डॉ. श्रीकांत मुंदरगी
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

काही दिवस श्यामचे काही राधाचे
फिरोझ रानडे
पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

# नाटचस्पर्धा आणि नव्या नाटचसंहितांची उणीव

वि. भा. देशपांडे

जुलै महिन्यामध्ये महाविद्यालयांतील प्रवेशांचे काम बऱ्याच प्रमाणात आटोक्यात आलेले असते. त्याच वेळी निरनिराळचा प्रकारच्या निवडणुकांचे वारेही वाहू लागतात. नाटकाच्या संदर्भात महत्त्वाची हालचाल (विशेषतः पुण्यात तरी) आरंभित होते ती पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेची. जसा नित्यनेमाने पावसाळा येतो तसाच हा स्पर्धांचा हंगामही सुरू होतो.

विविध नाटचस्पर्धांचा हा हंगाम सुरू झाला की, सर्वांत महत्त्वाची चर्चा आणि शोधाशोध असते ती म्हणजे नाटचसंहितांची! नुसत्या पुरुषोत्तमकरंडकस्पर्धेपुरते बोलायचे म्हटले तरी तीस–पस्तीस संघ त्यामध्ये सहभागी होतात. यातल्या अनेकांना स्पर्धेसाठी नवी नाटचसंहिता हवी असते. ती मिळवण्यासाठी निरनिराळे प्रयत्न चाललेले असतात. एखाद्याला त्या धावपळीत चांगली संहिता हाती लागते. अनेकजण नवी संहिता उपलब्ध होत नाही म्हणून जुन्याच संहितांची निवड करतात, तर त्यातले अगदी थोडेजण स्वतःच संहिता लिहून सादर करण्याचा यत्न करतात.

ही धावपळ गेली पंधरा–वीस वर्षे मी पाहतो आहे. ती पाहून अनेकदा असे वाटते की, जर ही धावपळ थांबवायची असेल तर यातून काही मार्ग काढायला हवा. यातला एक मार्ग म्हणजे नाटचसंहितांची पेढी (बँक) तयार करणे हा एक आहे. ही कल्पना नवीन नाही. नाटकक्षेत्रातले अनेक लोक ही कल्पना आपापसात अनेकदा बोलून दाखवतात. अनेकांना या गोष्टीचे गांभीर्य पटत असते; पण प्रत्यक्षात योजना कार्यान्वित होत नाही. कारण गरजेपुरती ही चर्चा होते आणि स्पर्धा मार्गी लागल्यावर किंवा ती हवा थंड झाल्यावर पुन्हा कोणीही त्याचा गांभीर्याने विचार करीत नाही. तो विचार अथवा ती योजना प्रत्यक्षात यायला हवी. त्याची थोडी–फार रूपरेषा पुढीलप्रमाणे सांगता येईल.

महाराष्ट्रात आता जवळपास प्रत्येक महत्त्वाच्या शहरात एखादी का होईना एकांकिका–स्पर्धा होत असते. अशा स्पर्धेत ज्या लेखकांनी नव्याने एकांकिका लिहिल्या असतील त्याची एक प्रत आपल्या नावपत्त्यासह मध्यवर्ती ठिकाणी अलिखित नियम म्हणून पाठवायला हवी. स्पर्धेचे जे संयोजक असतील त्यांनी यासाठी पुढाकार घ्यायला हवा- अशा संयोजकांनी जर आपल्याकडच्या स्पर्धेत आलेल्या नव्या एकांकिका–संहितांची यादी तयार केली, त्यांची एकेक प्रत कठोर नियम करून स्वतःकडे घेतली तर काही संहिता हाताशी लागतील.

अशी कोणतीही योजना सुचवली गेली की, त्यावर पहिला प्रश्न नेहमी विचारला जातो, तो म्हणजे हे काम कोणी करायचे ? ही नेमकी जबाबदारी कोणाची आहे ? याची उत्तरे पुष्कळ आहेत. थोडक्यात सूत्ररूपाने सांगावयाचे तर असे म्हणता येईल की, विशिष्ट नाटचसंस्था, नाटचपरिषद मध्यवर्ती कार्यालय तसेच शाखा, शासनाचे सांस्कृतिक संचालनालय किंवा अशाच प्रकारचे सांस्कृतिक कार्य करणाऱ्या खाजगी संस्था यांनी ही जबाबदारी उचलावयाची आहे. जसा आपल्याकडे एक नियम आहे की, कोणत्याही एकांकिकेचा-नाटकाचा जाहीर प्रयोग करण्यापूर्वी शासननियुक्त प्रयोगपूर्व परिनिरीक्षण मंडळाकडे नाटचसंहितेची एक प्रत पाठवावी लागते. तिथला क्रमांक मिळणे आवश्यक असते. त्याच पद्धतीचा नियम स्पर्धांच्या संदर्भात असायला हवा. आताच (वरच्या परिच्छेदात) सुचविल्याप्रमाणे ती प्रत नाटचपरिषदेच्या वा जी मध्यवर्ती संस्था ठरवली जाईल अशा ठिकाणी ती प्रत येणे अगत्याचे आहे. हा नियम स्पर्धेच्या संयोजकांनी काटेकोरपणाने पाळला जातोय किंवा नाही ते पाहायला हवे. जर तसे घडले नाही तर त्या लेखकास अथवा स्पर्धकसंघास स्पर्धेत सहभागी होऊ द्यायचे नाही. जसे इतर काही नियम अतिशय कडकपणाने पाळले जातात किंवा नाही याकडे संयोजक जागरूकतेने पाहतात तसे याही बाबतीत पाहायला हवे.

ठरल्याप्रमाणे मध्यवर्ती केंद्रात ह्या संहिताप्रती आल्यावर त्यासाठी व्यवस्था पाहणारी एक यंत्रणा राबवावी लागणार आहे. या यंत्रणेमार्फत संहितांची यादी करणे, ती गावोगाव ज्या नाटचपरिषदांच्या शाखा अथवा तत्सम कार्य करणाऱ्या संस्था असतील त्यांना पाठवणे. ज्यां कोणाला त्या संहिता समक्ष पाहण्याची– चाळण्याची– वाचण्याची इच्छा असेल, त्यांना विशिष्ट अटींवर ते करू देणे. निदान ती यादी संबंधितांना देऊन, त्यांचा आणि मूळ लेखकाचा संपर्क साधला जाईल, अशी तरी व्यवस्था केली जावी.

हे सारे शासनाने करावे असे म्हणून मोकळे होण्यात मतलब नाही. त्याला अशासकीय संस्थांनी हातभार लावणे आवश्यक आहे. शासनाने अशा कार्य करणाऱ्या संस्थेस भरघोस अर्थसाह्य द्यावे. त्यामुळे हे कार्य सुकर होईल. त्याचबरोबर साहित्य संस्कृति मंडळ आणि प्रकाशक यांच्यावरही ही जबाबदारी आहेच. साहित्य संस्कृति मंडळ सध्या नव-लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी काही अनुदान देते. काही प्रकाशक या अनुदानाचा फायदा घेऊन काही एकांकिकासंग्रह काढतातही; पण ती संख्या फारच थोडी आहे. कदाचित नव्या लेखकाच्या एकांकिका-संग्रहाला बाजारात उठाव नाही हे कारण सांगितले जाते. काही अंशांनी ते खरेही आहे; पण त्यातून आणखी एक मार्ग म्हणजे त्या त्या वर्षातल्या निवडक एकांकिका किंवा त्या

वर्षीच्या विविध स्पर्धांमध्ये पहिल्या क्रमांकाच्या एकांकिका संग्रहरूपाने प्रकाशित करणे. काही प्रकाशकांनी हा प्रयत्न केलाय, काही करीत आहेत; पण अशा प्रयत्नाची म्हणजे संग्रहांची संख्या किती तरी पटीनी मोठी व्हायला हवी. आज त्याची गरज आहे. कारण स्पर्धा उदंड झाल्या आहेत; तुलनेने एकांकिकासंग्रह, प्रकाशने अल्प आहेत. वास्तविक नव्या एकांकिकाचे लेखन भरपूर होत आहे; परंतु त्यांची एकत्रित माहिती देणारी यंत्रणा नाही. ती यंत्रणा म्हणजे नाटयसंहितांची पेढी निर्माण व्हायला हवी. आणखी कोणी करेल, अशी वाट पाहण्यापेक्षा महत्त्वाच्या नाटयसंस्थांनी, नाटयपरिषद आदी मंडळींनी हे आता मनावर घ्यायला हवे. नाही तर परिणामी स्पर्धेच्या निमित्ताने होणारे नव्या एकांकिकाचे लेखन क्षणजीवी ठरणार आहे. त्यातले जे उत्तम आहे ते दीर्घकाल टिकले पाहिजे. त्यासाठी साह्यभूत व्हायला पाहिजे. □

चित्रपट

# जगण्यातला ताण दाखविणारे दोन प्रयत्न

'**सा**राश' व 'खडहर' हे दोन्ही चित्रपट गंभीर चित्रपटाच्या मोजक्या यादीत आहेत. त्यांची उच्च निर्मितिमूल्ये गृहीत धरूनही त्यांच्या कथानकांची व दिग्दर्शकाची त्याकडे बघण्याची दृष्टी यासंबंधी फरक जाणवतो.

गंभीर चित्रपट 'बोअर' असतात, डोक्याला ताण देऊन भेजा खलास करतात इत्यादी दोषच मी गुण मानले आहेत. चित्रपट मनोरंजन, कॅथार्सिस वगैरेसाठी असतात, ते नाकबूल नाहीच. त्याचबरोबर भेजा खराब करणाऱ्यांनाही अस्तित्वात राहण्याचा हक्क आहे, किंबहुना त्यांचे ते एक वैशिष्टय आहे. त्यांची चिकित्साही त्या पद्धतीने व्हावी. ते किती वास्तव-जीवनानुभूतीशी प्रामाणिक आहेत त्यावरून त्यांचे मूल्य जोखावे.

'सारांश' ची पार्श्वभूमी आहे शिवाजी पार्कमध्ये राहणारे 'संध्याछाया' सारखे निपुत्रिक-एकाकी जोडपे. बी. व्ही. प्रधान-त्याची पत्नी पार्वती यांचा न्यूयॉर्कमध्ये असणारा एकुलता एक मुलगा अजय गुंडाच्या हल्ल्यात ठार होतो. अंधाऱ्या गुहेत प्रतिध्वनी उमटत रहावे तसे या म्हाताऱ्याच्या जीवनाचे होते. सुन्न. अगतिक!

इथून जीवनातील वास्तव ताण सुरू होतो. प्रधान (अनुपम भट) व पार्वती (रोहिणी हट्टंगडी) एकमेकांना धीर देत आयुष्य जगायचं म्हणतात. प्रधान आपल्या मुलाच्या दुःखात सतत चूर असतो. कोणत्याच गोष्टीचा अर्थ त्याला कळत नाही. पार्वती मात्र आशावादी असते. आपला अजय आत्म्याने जिवत असून इथेच कुठे तरी आहे. देवदेवता-स्वामी याच्यावर विश्वसून ती आशावादी बनते. मुलगा मेला या वास्तवाचा स्वीकार करून त्याबद्दल दुःख मानणे किंवा अ-वास्तव आशावर सुखी राहणे या दोन वृत्तीमध्येही ताण आहे. स्वामीच्या आश्रमाबाहेर प्रधान आपल्या बायकोकडे निर्विकार भ्रमिष्ट दृष्टीने पाहतो अन् एकटाच रात्रभर भिरभिरत राहतो.

माणसाच्या विचारातील हे द्वंद्व, कसमस प्रधानच्या भ्रमिष्टासारख्या वागण्याने दाखविले आहे. वास्तवातच राहण्याचा पण केलेला म्हातारा चिडतो- संतापतो- आत्महत्या करण्याच्या प्रयत्नांपर्यंत येतो. वास्तवाचा स्वीकार न करणारी त्याची पत्नी शांत असते. धीर देते, आशा दाखवते. असं का?

इथे प्रधानचा बालपणापासूनचा मैतर भाऊ (सुहास भालेकर) एक स्पष्टीकरण घेऊन पुढे येतो. ("पहले तो हम दोस्त थे। अब क्या है... पता नहीं" असे हे सुहृद) प्रत्येकाच्या जगण्याला एक 'निमित्त'- 'कारण' 'ध्येय'; 'उद्दिष्ट'- म्हणजे 'मकसद' पाहिजे तरच तो जगू शकतो. भाभीच्या जीवनात तसे मकसद आहे. अजयच्या परत येण्याचा तिला इंतजार आहे. ती वाट पाहत आहे. त्यामुळे ती आलेला दिवस लोटू शकते. प्रधानकडे काय आहे? वास्तवाचा स्वीकार केल्याने अजयची आशा नाही आणि दुसरा वास्तव 'मकसद' नाही!... मग भाऊ हास्याच्या आवरणाखाली म्हणतो- मलासुद्धा जगायला एक निमित्त आहे 'भाभीला रोज पहाटे फूल देणे!'

इथे रोजच्या अनुभूतीतले सत्य क्षणभर उघडे होऊन चकाकून जाते.

कुठल्या ना कुठल्या कारणासाठी रोजचा दिवस आपण लोटत असतो. रोज उठून तोच दिनक्रम, तेच लोक, तेच अनुभव-त्याच निराशा-हे सर्व सर्व सहन करत जगायच तरी का? आपण त्यासाठी प्रत्येक वेळी एक 'कारण' निर्माण करतो... आजचा दिवस-महिना-वर्ष 'या' साठी! ते कारण म्हणजे नवा अनुभव- ज्याच्या आशेच्या आधारावर जगायचे!... माणसं इतकं असहाय, केविलवाणं जीवन जगत असतात.. स्वतःच, स्वतःसाठी असं जीवन जगण्याची त्यांची तयारीच नसते! भाऊच्या खिन्न चेहऱ्यावरून हा ताण सतत जाणवत राहतो.

## अखेर निमित्त मिळाले!

मग या जोडप्याला जगण्यासाठी एक समान निमित्त सापडते. मात्र वेगवेगळया कारणासाठी वेगळ्या पातळयांवर त्यांच्या घरात रहायला आलेली अविवाहित पेइंग गेस्ट सुजाता (सोनी राझदान) गरोदर आहे असे समजल्यावर पार्वतीचे डोळे लकाकतात. स्वामींनी सांगितलेला अजयचा पुनर्जन्म सुजाताच्या अर्भकाच्या रूपाने होणार अशी तिची खात्री पटते. अजय पुन्हा दिसावा म्हणून ती सुजाताची काळजी घेते. ती संतती अनौरस-अनैतिक असली तरी!

दुसरीकडे (चित्रपटातील गरजेमुळे) सुजाताच्या अर्भकाला गर्भातच मारून टाकण्याचा विडा उचलणारा-तिच्या प्रियकराचा बाप चित्रे (निळू फुले) पूर्ण प्रधानकुटुंबावरच खार खाऊन असतो. सुजाता व तिच्या अर्भकाचे रक्षण करणे-हे एक 'निमित्त' प्रधानला मिळते. जबरीने, नकारात्मक भूमिकेतून हे निमित्त असले तरी ते वास्तव भौतिक आहे.

पार्वतीला मिळालेले कारण अ-वास्तवतेतून येते; प्रधान मात्र काही इहवादी मूल्यांतून त्रिवेशी सामना द्यायला तयार होतो. जगण्याची ही एक असहायता!

स्वतःच्या जगण्याच्या इहेसाठी हे जोडपे सुजाता व तिच्या अज्ञात अर्भकाला अस-

रेशः उपयोग करून घेत असते ! पार्वतीच्या विचित्र नजरेवरून, वागण्यावरून तर केवळ अजयसाठी म्हणून सुजाताला 'पोसत' जगत असल्याची जाणीव होत राहते.

सुजाताकडे बघण्याची पार्वतीची दृष्टीच किळसवाणी वाटते. सुजाताचे व्यक्तित्व, इच्छा तिचे अर्भक यांच्याकडे ती एक साधन म्हणून बघते—स्वत:ची अ–वास्तव भूक पूर्ण करण्यासाठी. दुसऱ्या पातळीवर प्रधान सुद्धा स्वत:च्याचे 'मकसद'साठी झुजत असतो. सुजाता किंवा तिचा प्रियकर यांच्या इच्छेला इथे स्थानच नाही !

शेवटी अनेक फिल्मी प्रसंगांतून सुजाता व तिचे होणारे अर्भक चित्रेच्या तावडीतून वाचतात. पार्वती समाधानाने हसत झोपते अजय आता येणार म्हणून !

इथे प्रधान (खरोखर) जागे होतात. हे प्रकरण चाललंय कुठं ? पार्वती कधी आपल्या अ–वास्तव विश्वातून—त्यातून मिळणाऱ्या समाधानातून बाहेर येणार की नाही? आणि त्या जोडप्यावर पार्वतीची अजयसंबंधीची वासना का लादली जावी ?

सुजाता व तिच्या अर्भकावर पार्वतीच्या अजयच्या रूपाचे सावट का रहावे ? त्या नव्या जोडप्याला व त्यांच्या येणाऱ्या अर्भकाला स्वत:चा अर्थ का नसावा ? असे प्रश्न प्रेक्षकाना पडतात. मात्र दिग्दर्शक प्रधानकडे पाहतो. त्याला पार्वतीचा भ्रमिष्टपणा वाढत जाण्याबद्दल चिंता लागून राहते.

प्रधान त्या नव्या जोडप्याला घरातून निघून जायला सांगतात. ते जोडपे समजूतदारपणे निघून जाते. इथे आपले 'सावज' सुटले म्हणून दु:खाने पार्वतीचा आवाज फाटतो. चेहरा वेडावाकडा होतो—ती हिस्टेरिक होते. (या वेळी रोहिणी हट्टंगडीचा अभिनय कमालीचा आहे. पार्वतीची Irrationality असह्य होते.)

शेवटी राजश्री प्रॉडक्शनच्या चित्रपटांप्रमाणे सुखांत शेवट म्हणून प्रधान पार्वतीला 'जीवनासाठी' जग म्हणून सांगतो. सद्गदित होत्साती पार्वतीही अजयच्या राखेवर उगवलेल्या फुलांना कुरवाळते.

अन इथे पहिल्यापासून विणत आलेला कथेचा पीळ तुटतो !

तसा चित्रेप्रकरण, मंत्री, पोलीस यांचे चक्करमुळे या पिळाला हेलकावे बसलेलेच असतात. मात्र शेवटचा प्रसंग संपूर्ण कथेतला कोंडून राहिलेला प्रचंड नि:श्वास एकदम सोडतो.

माणसांचे वेगवेगळ्या भावनिक पातळ्यांवर जगणे, त्याचा परस्परांना 'थांग' नसणे, पार्वती–सुजाता यांच्या संबंधातील एक भेसूर कारुण्य, पार्वती व प्रधान यांच्या रूपाने जीवन–मरण, अवास्तव जीवन व द्वंद्वादातून स्वीकारलेली मरणाची वास्तवता यांच्यातील तणाव शेवटी जगण्याची उत्कट ओढ, निखळ जीवन जगता येत नाही म्हणून 'निमित्त' शोधण्याची छटपटाहट... या सर्व ताण्याबाण्यातून आपण जीवनाचा समरसून अनुभव घेत असतानाच शेवटी एकदम पठ्ठप्रभावाने 'जगण्या' विषयीचे सुभाषित ऐकावे लागते आणि एका सलग अनुभवाला तडा जातो. आतापर्यंतचा कटू, रखरखीत पण प्रामाणिक अनुभूतीशी इथे फारकत होते.

महेश भट्ट यांच्या दिग्दर्शकाने 'अर्थ' मोठ्या हिंमतीने काढला. त्याचा शेवट दाखवण्यातही धैर्य दाखवले. 'सारांश' ची कथावस्तू आशय तर प्रचंड ताकतीची आहे. माणसांच्या अस्तित्वाचे काही प्रश्न व असहायता त्यात दाखविली. मात्र त्याचा पुढे विकास करण्याऐवजी सुखांत 'घटनेत' शेवट करून वैचारिक परिणाम घालवला आहे.

## एक सलग अनुभव 'खंडहर'

'खंडहर' हा मृणाल सेनदिग्दर्शित चित्रपट म्हणजे एक लिरिक आहे. एक लहानसा प्रसंग घेऊन त्यावर पूर्ण मनो-व्यापार उभा केला आहे. खंडहरची कथा (माणूस– ७ जुलै ८४) तशी साधीच आहे.

बंगालच्या वीरभूम जिल्ह्यातल्या रंग उडालेल्या, भग्न अवशेषात तिघं मित्र रहायला येतात. दीपकच्या जुन्या वाड्याच्या गच्चीवरून अंधाऱ्या रात्री सुभाष (नसिरुद्दिन शाह) टॉर्च फिरवीत खंडहर झालेले महाल, प्रचंड खाब, माती घसरून चाललेल्या भिंती, गंजलेल्या खिडक्या पाहतो.

घरातली कसोसवरती यामिनी आपल्या आधळ्या रोगग्रस्त आईला घेऊन तिथेच राहते. आयुष्यातला एकेक दिवस त्या घळमातीत काहीच न घडता सुनसानपणे मिटत जातो. दुसरीकडे जावं तर आईचं काय ? तिला जास्तीत जास्त जगवताना आपलं आयुष्य खचत आहे– त्याचं काय ? असा ताण यामिनीपुढे असतो.

कधीही स्वत:ला व्यक्त न करणारी यामिनी सुभाषसमोर थोडी मोकळी होऊ पाहण्याची किंचित शक्यता असते. तोच आईने ऑब्सेशनमुळे केलेल्या उल्लेखांमुळे दोघांच्या अस्तित्वातच एक पोलादी पडदा उभा राहतो. यामिनीचे ज्याच्याशी लग्न होणार होते त्या कोण्या निरंजनची आईला आस असते. सुभाषला ती निरंजन समजून त्याच्याकडून यामिनीच्या लग्नाचे वचन मागते. आईच्या प्रश्नाची तीव्रता वाढत जाते. यामिनी–दीपू पाहत राहतात. शेवटी अगतिकतेने सुभाष 'होय' म्हणतो.

अन् एक विचित्र परिस्थिती होते. सुभाष आणि यामिनी यांच्या विकसित होऊ शकणाऱ्या संबंधाना असहायता, अगतिकता यांचा शाप येतो. प्रत्यक्ष सुजबी बोलणेसुद्धा फारसे सांकेतिक होत नाही. 'काही करू पाहतो; रुजतो अनर्थ तेथे' अशी अवस्था होते.

ज्या काही कल्पना मनात घेऊन आपण पुढे जातो, तसे घडत तर नाहीच. प्रत्येक घटनेनंतर पुढचे अंदाज प्रत्यक्षात येतच नाहीत. ठरवलेलं गणित उतरतच नाही. इथे मग प्रत्येक वेळी भव्य वास्तूचे भग्नावशेष, काळपटलेल्या उंच भिंती, भव्य खाब, ढासळलेले सौध मुळकटवून आपल्या डोळ्यासमोर आणले जातात.

कोणाची कितीही इच्छा असो– सुभाष-यामिनीतील संबंध पुढे सरकूच शकत नाही. दोघेही अनाम कारणाने आतल्या आत घुसमटत राहतात.

जाण्याच्या वेळी सुभाष हावरेपणाने भग्नावशेषाचे फोटो घेतो — आणि तिथे यामिनी दुरून बाजूने डोकावते. टेलिलेन्स लावून सुभाष ते अधुक रूप टिपत राहतो. खाल मारखी करताना हातांची ती तेज स्थिती, मनस्वी, अलिप्त डोळे.

तेवढीचे खूण राहते– जे घडले ते एवढंच. जीर्ण खंडहरात एकेक किल्ले ढासळतात. यामिनीसकट—

सुभाष तो फोटो जास्तीत जास्त मोठा करतो; पण लक्षात येतो ती फक्त खाल

सारखी करताना दिसणारा अनाम ग्रेस. तोच एक अनुभव. दुरून टिपलेला. एकदाच.

नंतर दुसरे जवळच्या कोनातून घेतलेले अनेक पोझेस त्या एका अनुभवाच्या कसोटीला कुठेही उतरत नाहीत.

खंडहर तसेच असतात. ढासळत चाललेले; पण अनाम आकर्षण आणि उदासी लेऊन बसलेले. तो एकच अनुभव पुढले अनुभव विस्कटून टाकू शकतो. याहूनही काही तरी अजून सांगायचे हे 'खंडहर' मधून जाणवत राहते.

एक संथ, उदास, मूक लय या चित्रपटात कायम ठेवली आहे. खंडहरातील छाया, प्रकाश, अंधार, कवडसे यांचा अनुभवच आपण घेतो. कुठेही खंड न पडता एक subtle पण तीव्र अनुभूतीत आपण जातो.

आशयाशी व त्यातील अनुभूतीशी प्रामाणिक राहण्याचा या चित्रपटात तोल कसोशीने संभाळलेला आहे. खरे पाहता यामिनीसारखी एक मनस्वी, अंतर्मुख स्त्री व सुभाषसारखा संवेदनशील कलावंत यांच्यातील ही रोमॅंटिक कथा म्हणता येईल. त्यात अपेक्षाभंग, हुरहूर इत्यादी नेहमीचे घटक टाकता आले असते. दुःखात शेवट करून चटका लावणारा वगैरे चित्रपट झाला असता; पण 'खंडहर'चा शेवट काय? असं विचारल्यास काहीच सांगता येणार नाही. तात्पर्याने संपणारी कथानके तात्पर्यासाठीच महत्त्वाची ठरतात. मात्र 'खंडहर'मध्ये एक अनुभूतीच तीव्रतेने कम्युनिकेट करण्याचा प्रयत्न राहतो. त्यामुळे चित्रपटमाध्यमातील प्रत्येक टप्प्यावरचे प्रसंग, अभिनयदिग्दर्शन, छायाचित्रण हे त्या एका अनुभूतीला व्यक्त करण्यासाठी असतात.

'सारांश' मध्ये एक अनुभव देण्याचा प्रयत्न आहे; शेवटी (कोणाच्या तरी सोयीसाठी) घाईघाईने तात्पर्य काढून एक सिद्धांतच तुम्हाला सांगितला जातो.

हे दोन्ही चित्रपट अभिनय, छायाचित्रणासाठी तरी अवश्य पहावेत. 'खंडहर' मध्ये जंगलातील रात्र, अवशेषात उमटलेला प्रकाश-सावल्यांचे द्वंद्व, टिपलेले आहे. 'सारांश' मध्ये रोहिणी हट्टंगडी यांच्या कॅमेरासेन्सला दाद द्यावी लागेल. अनुपम खेर अजूनही कॅमेराकॉन्शस वाटतात. सुहास भालेकर यांचा 'भाऊ' शिवाजीपार्कातली चाळ, समुद्रावरची पहाट यांचे छायाचित्रण अशा अनेक गोष्टी आवर्जून पाहण्यासारख्या आहेत.

कथानकाच्या बाबतीत फारच चिकित्सा करून उजवे-डावे ठरविता येत असले तरी, आधी हे सर्व चित्रपट उच्च निर्मितिमूल्ये असलेले आहेत हे मान्य करूनच वेगळ्या पातळीवरून परीक्षा करायची असते.

—संजय संगवई

---

## बुचकळ्यात टाकणारी— 'एक नयी पहेली'

---

मुलगी-आईची सासू; मुलगा-वडिलांचा सासरा होणार असं हे नात्याचं विचित्र कोडं. हे नातं निर्माणच (अधिकृतरीत्या) होऊ न देणं ही या कोड्याची उकल. नात्यावर कायदेशीर शिक्कामोर्तब होत नाही; पण भावनिकदृष्ट्या तरी कोडं न उलगडलेलंच राहतं.

असं कोडं निर्माण झालंय के. बालचंदर यांच्या प्रतिभेतून. कोड्याला पूरक असे शब्द, कोडं कसं सोडवावं याच्या सूचनाही त्यांच्याच, थोडक्यात म्हणजे कथा-पटकथा दिग्दर्शन सबकुछ के. बालचंदर. कोड्यातले बापलेक आहेत राजकुमार आणि कमलहसन. मायलेकी हेमामालिनी आणि पद्मिनी कोल्हापुरे.

कोडं असं— मुलगा बापाचं घर सोडून मुलीच्या आईकडे योगायोगाने येतो आणि तिच्या (म्हणजे आईच्या) प्रेमात पडतो तर या आईची मुलगी आईचं घर सोडून मुलाच्या वडिलाकडे येऊन त्याच्याशीच लग्न करण्याचा ध्यास घेते. कोड्यातली महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुलाला आई नाही व मुलीचे वडील परागंदा.

अशा काही घटना घडतात की दोन्ही जोड्या (कमलहसन-हेमामालिनी आणि राजकुमार-पद्मिनी कोल्हापुरे) लग्नाला तयार होतात. हेमामालिनी आणि राजकुमार या बालकांप्रमाणे प्रेमात बुडालेले दिसत नाहीत. तर लोकापवाद टाळण्यासाठी किंवा आणखी कशासाठी तरी ते लग्नास तयार होतात. त्यामुळे त्यांच्या दृष्टीने भावनिक गुंतागुंतीचा प्रश्नच उद्भवत नाही, तर त्यांचं कोडं सामाजिक प्रतिष्ठेचं असतं. राजकुमारच्या कटामुळ चौघे जण आमने सामने येतात आणि कोड्याचं स्वरूप त्यांना स्पष्ट होतं.

प्रश्न असा की, कोड्याची उकल कुणी आणि कशी करायची? कुणी तरी एक व्यवहारी प्रेक्षक असही म्हटला की, पद्मिनी-कमल, हेमा-राज जोडी जुळवा म्हणून; पण हे काही 'सहा हत्ती एका फियाटमध्ये कसे बसतील' अशा धर्तीवरचं कोडं नाहीये. त्यामुळे दिग्दर्शकानं (म्हणजेच कथालेखकानं) त्यावर अजून विचार केला आहे, तर इथे हेमामालिनीचा परागंदा प्रियकर अवतरतो. तो आल्यान प्रश्न सुटला असं हेमामालिनीला वाटतं आणि ती त्याच्याकडे जाते; पण तेवढ्यात तोच मरतो. कधीच त्याची सौभाग्यवती न झालेली हेमामालिनी त्याची विधवा होते. इथं कोडं सुटलं असं समजायला हरकत नाही.

विनोदाचा भाग बाजूला ठेवून पाहिलं तर वाटतं कथेची मूळ कल्पना वाईट नाही. असं प्रत्यक्षात होऊ शकतं; पण पुढे कथेला वळण कसं मिळत यावरच कथेची परिणामकारकता अवलंबून राहते. इथं नात्यातला हा जो विचित्र संबंध निर्माण झालाय तो खरं तर अंतर्मुख करणारा; पण दिग्दर्शकानं त्याला पुरेसा न्याय दिला आहे असं मला तरी वाटत नाही.

याचं एक कारण, मी मगाशी म्हटलं त्याप्रमाणे, राजकुमार आणि हेमामालिनी यांची पुरेशी भावनिक गुंतवणूक आपल्याला दिसत नाही आणि ती नसताना लग्नासारखा एक महत्त्वाचा निर्णय ते घेतील हे शक्य वाटत नाही. राजकुमारला जर हे लग्न शिक्षा वाटत असेल तर त्याच्यावर लग्न करण्याचं काहीएक बंधन नाही. शेवटी पद्मिनी एक अनाथ मुलगी (ती तसं सांगते) त्यानं तिला आपल्या घरात आश्रय दिलेला. तीही, त्याला मान्य नसेल तर घरातून निघून जायला तयार असते. असं सगळं असताना या चौघांना समोरासमोर आणण्यासाठी तो जो कट रचतो त्याचं प्रयोजन कळत नाही. किंबहुना तो अमानुष वाटतो.

लग्नापासून सुटका करण्याचा मार्ग

म्हणावं तर हा मार्ग किती अनावश्यक आहे हे पटतं. मुलाला परत मिळवण्यासाठी म्हणावं तर मुलाच्या मनाप्रमाणं त्याला वागू द्यायला तो कधीच तयार नसतो. म्हणजे मुलगा परत त्याला सोडून गेलेलाच असतो. मायलेकींची गाठ घालून देण्यासाठी म्हणाव तर तसंही वाटत नाही.

प्रेक्षकांना या नात्याचं स्वरूप बऱ्याच आधी कळलेलं असल्यानं या चौघांच्या भेटीनं प्रेक्षकांना अचानक धक्का देण्याचं तंत्रही यातून साधत नाही. तर कथा पुढे कशी न्यायची याबाबत कथालेखकाचाच गोंधळ उडाल्याचं फक्त यातून जाणवत.

कथा जर योग्य प्रकारे हाताळली गेली असती तर त्यातून एक उत्तम भावनिक–कौटुंबिक चित्र तयार झालं असतं; पण हे चित्र पूर्णत: पलायनवादी झालं आहे. रूढ अर्थानं नव्हे, तर अशा अर्थानं की, या गुंतागुंतीच्या नात्याची योग्य, पटेल अशी उकल काढण्यात ते यशस्वी होत नाही. राजकुमारचा तर या सगळ्या नात्याची थट्टा करणाराच सूर दाखवला आहे.

लक्ष्मीकांत–प्यारेलालचं संगीत असलेली गीतं अगदीच साधारण आहेत. या रटाळ गीतांच्या जोडीला मध्येच दक्षिणी पद्धतीचा 'आजकी युवा पिढी' बाबतचा संदेशही ऐकवला आहे.

अभिनयात विशेष उल्लेखनीय काहीच नाही. एके काळी राजकुमारचे चाहते खूप होते, आजही असतील; पण इथं त्याच्या अभिनयाची झलक जाणवत नाही. हेमामालिनी आणि पद्मिनीच्या वाट्याला 'इमोशनल' काम आहे आणि कमलहसन आधी अँग्री यंग आणि नंतर रोमँटिक यंग मॅन दाखवला आहे.

विशेष उल्लेखनीय म्हणजे कमलहसन असूनही नाच ?– एकही नाही !

–उज्ज्वला लेले

# अनवट

## □ बिचारा अमिताभ!

अमिताभ बच्चन बिचारा आजारी पडला अन् सगळ्या पत्रकारितासृष्टीने परत एकदम लेखण्या न् खास अंक सरसावले; पण लगेच तो घरी परतला...ही काय पद्धत झाली ? तरी तेवढ्या काळातसुद्धा टाइम्स ऑफ इंडियापासून ते लहानसहान जिल्हा वृत्तपत्र व नियतकालिकातसुद्धा अमिताभला झाले तरी काय ? असे गहन प्रश्न चर्चिले गेले. 'मायस्थेनिया ग्रॅव्हिस' सारख्या रोगासंबंधी 'सकाळ' सारख्या वृत्तपत्रांनी तज्ज्ञांचे दोन-दोन लेख छापले ! (सामाजिक बांधिलकी ती हीच. लोकांना या रोगाविषयी माहिती हवीच.) तो घरी परतला अन् अजून वरंच 'मॅटर' तसंच राहिलंय !

मात्र अमिताभ आपला या सगळ्या गोष्टीकडे पाहून हैराणच झाला. नुकत्याच एका साप्ताहिकात दिलेल्या मुलाखतीत तो म्हणतो की, मी परत कॅमेऱ्यासमोर उभा राहू शकेन की नाही अशी शंका व्यक्त केली हे खरंच मात्र ते सहजपणे म्हटलेलं त्याला एकदम मोठं स्वरूप दिलं गेलं! आधी हातात असलेली कामे संपवून पुढे जरा बऱ्या, निराळ्या चित्रपटात काम करायची इच्छा असल्याचे त्याने (नेहमीप्रमाणे) सांगितले. आपण काम करत असलेल्या चित्रपटाबद्दलही त्याने असमाधान व्यक्त केले.

## □ राष्ट्रद्रोही पाऊस !

गरजत-बरसत पाउस आला, म्हटलं तसं साहित्यिकांना उधाण आलंय! प्रेसवाली पब्लिक आणि मौसमी कथा–कविताचे अश्रू गाळणारे सरसावले पापडी कविताही झाल्या! 'माणूस' च्या मुखे प्रतिनिधीने तर अख्तरी बेगमची बरसात ऐकवली... !

अन् 'त्या' ला दृष्ट लागली. भर ज्येष्ठ-आषाढात आश्विन-कार्तिकातलं तिपतिप ऊन पडायला लागलं. मराठवाड्यात तर मे महिन्यापेक्षा कहार ऊन !.

आता दुष्काळासारखी अवस्था होणार यासाठी (निदान) मानसिक तयारी ठेवावी की नाही ! या वर्षी दुष्काळ पडेल असा होरा पाश्चात्य शास्त्रज्ञांनी वर्तवला. त्यावर आमच्या देशाभिमानानी शास्त्रज्ञांनी राग व्यक्त केला अन् उपग्रहांच्या चित्रात मान्सूनच्या ढळवादळाचा तर पत्ता नाही ! या पावसाला राष्ट्र, देश अशी काही चाड नाही हेच खरं !


## □ औरंगाबादची 'जिगीषा'

औरंगाबादला नाटकं ही अपूर्वाईची गोष्ट नाही. कमलाकर सोनटक्के यांनी तिथे विद्यापीठातील 'ड्रॅमॅटिक्स' विभाग नावारूपाला आणला. लक्ष्मण देशपांडे सध्या तो चालवताहेत. औरंगाबादेत नाटकमंडळ्या तर अनेक आहेत. पथनाट्य, मध्यमवर्गीय नाट्य, कामगार–नाट्य असे अनेक उभे–आडवे प्रकार तिथे आहेत. पुण्या–मुंबईसारखी एक चिकट सुस्ती न् तिथल्या नाटकमंडळीत काही तरी नवं करून दाखवायची उमेद आहे.

दरवर्षी तिथे एक–दोन नाट्यसंस्था स्थापन होतात. गेल्याच वर्षी कॉलेजात शिकत असणाऱ्या पोरापोरींनी 'जिगीषा' नावाची नाट्यसंस्था पदरचे पैसे खर्च करून स्थापन केली. बुजुर्ग लोकांची मोनोपली काय म्हणून? याच विद्यार्थ्यांनी नाट्यलेखन, दिग्दर्शन, निर्मिती सुरू केली. प्रशांत दळवी छान नाटकं लिहितो, चंद्रू कुलकर्णी हा दिग्दर्शन, अभय जोशी, उर्मिला कुलकर्णी, मिलिंद जोशी, मिलिंद सफाई वगैरेसारखी संगीत अभिनयापासून लायटिंग सांभाळणारी हरहुन्नरी पोरं आहेत. त्यांनी सादर केलेलं 'मदर्स हाउस' (प्रशांत दळवी) हे नाटक तर पुण्या–मुंबईच्या प्रायोगिकवाल्यांनी उचलण्यासारखं आहे. त्यांच्या 'स्त्री' या पथनाट्याचा एक आगळी कृती म्हणून उल्लेख करावा लागेल.

परवाच जिगीषावाल्यांनी आपला पहिला वर्धापनदिन साजरा केला. नाट्यसमीक्षक वि. भा. देशपांडे हजर होते. या वर्धापनदिनानिमित्त चार दिवसांचा द्वितीय नाट्यसहवास नाट्यप्रेमींना दिला. प्रशांत दळवींच्या 'स्त्री' या पथनाट्याचा रौप्यमहोत्सवी प्रयोग 'गल्ली' आणि 'स्मशानातलं सोनं' या एकांकिका आणि पावसाचं गाणं या एकांकिका मोठ्या ताकदीनं सादर केल्या गेल्या.

औरंगाबाद, नांदेड, नागपूर, अकोला, लातूर या सगळ्या ठिकाणी किती तरी अशी गुणी आणि कस असलेली मुलं पुढे येऊ पाहतात अनेक क्षेत्रातली ! त्यांना वाव देणं हा उपकार नाही तर आपल्याला काही नवं पहायला मिळतं हे महत्त्वाचं. नाही तर आहेतच गडकरी–'छोटा गडकरी' तेंडुलकर, मतकरी आणि दळवी ! □



# मनःचक्षूचे सामर्थ्य

आपल्याला कोणती तरी कृती करण्यात आनंद मिळू शकतो, हे त्या व्यक्तीने आपल्या मनःचक्षूच्या साहाय्याने पाहण्यास सुरुवात केली की, त्या व्यक्तीला एखादी आनंददायक कृती प्रत्यक्ष करून पाहण्यास उत्तेजन मिळते आणि एकदा का त्या व्यक्तीला एखादी कृती प्रत्यक्ष करून आनंद प्राप्त करून घेता आला की, तिच्या मनःस्थितीत सुधारणा होण्यास वेळ लागत नाही. म्हणूनच मला जेव्हा सरिताने लिहिलेली नवी लघुकथा पोस्टाने मिळाली तेव्हा मी सरिताच्या पुढील प्रगतीबद्दल निःशंक झाले.

□

लेखांक : सहा । लेखक : कि. मो. फडके

## बहुरंगी जीवन

'संजीव, काल रात्री दादा म्हणत होते की, या मे महिन्यात आपण सर्वांनी आठ दिवस महाबळेश्वरला जावयाचे असेल तर नक्की तारखा ठरवून आपण रजेची वगैरे व्यवस्था करावयास सुरुवात केली पाहिजे.'

'ज्योती, मी तुला मागेच सांगितले होते की, मला महाबळेश्वरला जाऊन राहण्यात काहीही गोडी वाटत नाही. अर्थात तू तुझ्या रजेची व्यवस्था करावयास लाग आणि सर्वांच्याबरोबर जरूर महाबळेश्वरला जा !'

'तुझे हे नेहमीचेच आहे. तुला कशातच गोडी वाटत नाही. काय झाले आपण गेलो आठ दिवस महाबळेश्वरला तर ? मुले तर आत्तापासूनच आनंदाने नाचत आहेत.'

'हे बघ, मी तुला किती वेळा सांगितले आहे की, मी तिथे गेलो तर मला कमालीचा कंटाळा येईल. हा पॉइंट पाहा, तो पॉइंट पाहा, अन् बोटीत बसून कोठल्या तरी डबक्यात गोलगोल फेऱ्या मारा याचा मला मनस्वी तिटकारा आहे.'

'तुला कंटाळा आणि तिटकारा नाही कशाचा ? सदोदित असे घरकोंबड्यासारखे बसून राहण्याचा फक्त तुला कंटाळा येत नाही.

'सदोदित असे बसून राहण्याइतका मी नशीबवान नाही, हे माझे दुर्दैव आहे. कारण पोटासाठी मला रोज सात तास नोकरी करावी लागते आहेच.'


'खरंच तू सगळ्यांच्या उत्साहावर पाणी ओततोस !'

'ज्योती, काही तरी बोलू नकोस. मी काही तुला किंवा मुलांना कोठे जाऊ नका, असे सांगत नसतो आणि आजही सांगतो आहे की, तू मुलांना घेऊन खुशाल महाबळेश्वरला जा; पण मला मात्र महाबळेश्वरला जाण्याची अजिबात इच्छा नाही !'

संजीव व ज्योती यांच्यामधील भांडणाची सुरुवात बहुधा वरीलसारख्या संवादाने होत असे आणि अशा प्रकारे सुरू झालेले भांडण किती वेळ चालेल व त्याचे पर्यवसान कशात होईल ते काही सांगता येत नसे; परंतु ज्योतीचे म्हणणे असे होते की, अशा प्रकारच्या भांडणांचे मूळ संजीवच्या अरसिकतेत व घरकोंबडेपणात होते !

ज्योतीचे म्हणणे काही खोटे नव्हते. संजीव काही केवळ घरकोंबडा नव्हता. कारण किती तरी माणसे घरकोंबडी पण आनंदी असतात. कोणी पत्ते खेळतात तर कोणी दूरदर्शनवरील कार्यक्रम आवडीने पाहतात. कोणी वाचनात गढून गेलेले असतात तर कोणी चित्रकलेसारख्या एखाद्या कलेची मनोभावे उपासना करीत असतात. थोडक्यात म्हणजे घराच्या बाहेर न पडताही कित्येक माणसे सुखी व क्रियाशील असतात. उलट, संजीव कामावरून घरी परत आला की नुसता आरामखुर्चीत बसून राहतो. ना कोणाशी फारसे बोलणे ना कोणाकडे जाणे-येणे. नाटकाला किंवा सिनेमाला जाण्याची तर बातच सोडा; पण साधे फिरावयास जाणेही त्याला आवडत नसे. नोकरी करण्याशिवाय गत्यंतरच नव्हते, म्हणून तो नोकरी करीत होता. बाकीचा सर्व वेळ तो आपला उदासवाण्या चेहेऱ्याने आरामखुर्चीत बसून घालवीत असे किंवा खरे म्हणजे कंठीत असे. साहजिकच त्याला मित्र फारच कमी होते व जे होते त्यांचे म्हणणे असे होते की, संजीव फारच निराशावादी माणूस होता.

खुद्द संजीवचे म्हणणेही काही वेगळे नव्हते. आपण सर्व बाबतीत निराशावादी आहोत, हे तो मान्य करीत असे. त्याचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण असा निराशावादी असल्यामुळे तो सदैव उदासीनता व विषण्णता या भावनांनी ग्रासलेला असे. त्याच्या या भावनांच्या मुळाशी अर्थातच कित्येक मानसचित्रे धिंगाणा घालीत होती. त्यांपैकी काही मानसचित्रे त्याच्या स्वतःच्या भवितव्याविषयी होती, काही ज्योतीच्या भवितव्याविषयी होती तर काही त्यांच्या मुलांच्या



भवितव्याविषयी होती. वरवर पाहता तो सर्व मानसचित्रे विविध प्रकारची होती असे दिसले असते; परंतु त्या मानसचित्रांच्या कथानकांतील पात्रे भिन्न होती तरी त्या सर्व कथांचा शेवट नेहमी दुःखातच होत असे.

## संजीव निराशावादी का ?

संजीवच्या मनात नीट डोकावून पाहिले असते तर आपल्याला असे दिसून आले असते की, संजीव स्वतःच्या भवितव्याविषयी रंगवीत असे त्या मानसचित्रांतून असे कथानक उभे राहत असे की,त्याने कोणत्याही बाबतीत कितीही प्रयत्न केले तरी त्याला कधी कशात यश म्हणून येत नसे. त्याचे सर्व प्रयत्न फुकट जात असत. नोकरीत बढती मिळविण्यासाठी त्याने काही परीक्षा दिल्या तर त्यात तो नापास होत असे. जर तो परीक्षा पास झालाच तर त्याचे वरिष्ठ कोणते ना कोणते तरी कारण दाखवून त्याला बढती देण्याचे लांबणीवर टाकीत असत. एकूण काय तर तो ज्या पदावर काम करीत होता, त्याच पदावर पुढील पंधरा वर्षांनंतरही काम करीत राहणार होता व त्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती कधीच सुधारणार नव्हती. त्याची आर्थिक परिस्थिती न सुधारल्यामुळे ज्योती व मुले यांच्या वाढत्या आशा–आकांक्षा तो कधीच पुऱ्या करू शकणार नव्हता. त्याचा परिणाम असा होणार होता की, घरात कोणी त्याच्यावर प्रेम करणार नव्हते आणि त्याची आर्थिक परिस्थिती फारशी सुधारणार नसल्यामुळे त्याच्या मुलांच्या शिक्षणाचीही आबाळच होणार होती आणि त्यांचे आयुष्यही नेहमी सामान्य व निरस असेच राहणार होते.

संजीवच्या मनात सदैव अशा निर्जीव व शुष्क प्रतिमा धिंगाणा घालत असताना त्याला कोणत्याही गोष्टीबद्दल उत्साह वाटणे कसे शक्य होते ? माणसाच्या उत्साहाला खतपाणी मिळत असते ते त्याच्या जीवनाबद्दलच्या आशा–आकांक्षांकडून, असे म्हणणे वावगे ठरणार नाही; परंतु संजीवच्या मनातील प्रतिमासृष्टीतून असे नाटक उभे राहत असे की, ज्यातील नायकाच्या जीवनाबद्दलच्या सर्व अपेक्षा होरपळून, करपून, जळून गेलेल्या होत्या ! संजीवच्या मनातील निर्जीव व निःसत्त्व प्रतिमांचे दृश्य स्वरूप म्हणजेच त्याचे ते अरसिकासारखे वागणे.

येथे कोणी असा प्रश्न विचारील की, माणूस आपल्या मनात भवितव्याविषयी निर्जीव, निकृष्ट, दुःखदायक व भकास प्रतिमा रंगवीत असतो म्हणुन तो निराशावादी बनतो, का तो निराशावादी असतो म्हणून तो आपल्या मनात निर्जीव, निकृष्ट, दुःखदायक व भकास प्रतिमा रंगवीत असतो ? तसेच, माणूस आपल्या मनात स्फूर्तिदायक, उत्कृष्ट व आनंददायक प्रतिमा रंगविण्याचा सराव करतो म्हणून तो आशावादी बनतो का तो मुळातच आशावादी असल्यामुळे स्वतःच्या मनात स्फूर्तिदायक, उत्कृष्ट व आनंददायक प्रतिमा रेखाटतो ? म्हणजे माणसाच्या मनातील प्रतिमांमुळे त्याचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन ठरतो का त्याच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोणानुसार त्याच्या मनात प्रतिमांचे तरंग उठतात? या प्रश्नाचे उत्तर असे की, माणूस आपल्या मनात सातत्याने ज्या प्रतिमा रेखाटतो त्यानुसार त्याचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण घडत असतो असे गृहीत धरून चालणेच जास्त उपयुक्त असते. याचा अर्थ असा की, तुम्हाला आशावादी व्हावयाचे असेल तर तुम्ही आपल्या मनात स्फूर्तिदायक, उत्कृष्ट व आनंददायक प्रतिमासृष्टी निर्माण करण्यास शिकावे हे उत्तम !

## तो आशावादी कसा बनला ?

या संदर्भात, संजीवने आपला निराशावादी दृष्टिकोण झुगारून देऊन तो आशावादी कसा बनला हे पाहणे इष्ट ठरेल. आमची दोघांची पहिली भेट माझ्या चांगलीच लक्षात आहे. त्याचा चेहरा कमालीचा उदास दिसत होता आणि तो जरी आपणहून भेटावयास आला होता तरी काय बोलावे व कसे बोलावे हेच त्याला कळत नव्हते. थोड्या वेळाने तो अडखळत अडखळत जे काही बोलला

त्यावरुन माझ्या असे लक्षात आले की, त्याच्या मन:पटलावरील सर्व प्रतिमातून फक्त नैराश्यच व्यक्त होत होते. उदाहरणार्थ, त्याच्या मन.पटलावर कल्पनेच्या कुचल्याने तो अशी चित्रे रंगवीत असे की, त्याची आर्थिक स्थिती फारशी कधीच सुधारणार नव्हती आणि एकूण जीवनातच तो पूर्णपणे अयशस्वी होणे अपरिहार्य होते. त्याचा परिणाम असा होणार होता की, घरातील सर्वांना त्याच्याबद्दल जिव्हाळा किंवा आपुलकी वाटेनाशी होऊन अखेर म्हातारपणी निष्प्रेम व एकाकी जीवन जगणेच त्याच्या वाटचाला येणार होते !

ज्या माणसाच्या मन:पटलावर अशा भेसूर प्रतिमा सतत चितारल्या जात होत्या, तो उदास व दुःखी नसेल तरच नवल ! साहजिकच संजीवच्या चेहऱ्याकडे पाहून कोणालाही समजले असते की, तो अतिशय विषण्ण मन:स्थितीत होता आणि त्याच्या विषण्णतेच्या मुळाशी जी मानसचित्रे सतत स्पष्टपणे आकार घेत होती त्यांचे स्वरूप स्पष्ट झाल्यावर, मी ती मानसचित्रे बदलून टाकण्याच्या कामाला लागलो.

आम्ही दोघानी असे ठरविले की, ज्या गोष्टी करण्यात संजीवला पूर्वी कधी गोडी वाटत होती, आनद वाटत होता, त्या सर्व गोष्टींची प्रथम एक यादी तयार करावयाची. सजीवला काही ही कल्पना फारशी पसंत पडली नव्हती. कारण माझ्या या सूचनेवर त्याची पहिली प्रतिक्रिया अशी होती की, त्याला कोणतीच गोष्ट करण्यात कधी रस वाटत नसे ! परंतु मी चिकाटी सोडली नाही. उलट त्याला असे सांगितले की, हल्ली त्याला कशातच गोडी वाटत नसली तरी पूर्वी कधी तरी निदान काही गोष्टी करण्यात तरी त्याला नक्कीच गोडी वाटली असेल. थोड्या वेळाने संजीवने माझे म्हणणे मान्य केले व एके काळी ज्या गोष्टी करण्यात त्याला आनंद वाटत असे, त्यांची माहिती मला सांगावयास सुरुवात केली. पुढील अर्ध्या तासात आम्ही दोघांनी जी यादी तयार केली त्यात खालील गोष्टींचा समावेश होता.

१. पोहणे
२. फिरावयास जाणे.
३. मासिके वाचणे.
४. मांसाहारी जेवण जेवणे.
५. त्याच्या मोठ्या भावाच्या मुलाबरोबर खेळणे.
६. मित्रांबरोबर गप्पा मारणे.
७. जादूचे प्रयोग पाहणे.
८. सायकलवरून दूर भटकंती करणे.
९. चागले कपडे घालणे.
१०. रेडिओ ऐकणे.

नतर मी त्याला पुढील सूचना दिल्या.

'आता मी तुला एक गृहपाठ करावयास सांगणार आहे. हा गृहपाठ तू एका वेळी पंधरा मिनिटे करावयाचा सराव कर आणि दररोज दोन वेळा हा गृहपाठ करावयास विसरू नकोस. अशा प्रकारे तू हा गृहपाठ आठ दिवस करावयास हवास. गृहपाठ सोपा आहे. डोळे मिटून आरामखुर्चीत नीट रेलून बसून तू तुझ्या मन:पटलावर अशी चित्रे रगविण्याचा सराव कर की, पोहणे, फिरावयास जाणे, मासिके वाचणे इत्यादी ज्या गोष्टी करणे तुला एके काळी आवडत असे, त्या गोष्टी तू करीत आहेस. अशा आनंददायक प्रतिमाच्या डोहात तू स्वत:ला अगदी बुडवून काढले पाहिजेस. अशी प्रतिमासृष्टी तुझ्या मनात उभी करताना तुझे मन इतरत्र भरकटू लागले अथवा नकळत तू एखादी अप्रिय गोष्ट मन:चक्षूच्या साहाय्याने पाहू लागलास तर, अशी कल्पना कर की, तुझ्यासमोर 'येथे थाबा' अशी अक्षरे लिहिलेला मोठा फळा आहे व त्यामुळे तू अप्रिय प्रतिमा मन:पटलावर चितारण्याचे काम बंद करतोस आणि लगेच तुला एके काळी प्रिय असलेली कोणतीही गोष्ट तू करीत आहेस अशी प्रतिमा तुझ्या मन:पटलावर रेखाटण्यास सुरुवात करतोस.

एक आठवड्यानतर सजीव मला परत भेटावयास आला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरुनच मी ओळखले की, त्याची उदासीनता खूपच कमी झाली होती आणि तो माझ्याशी बोलू लागला तेव्हा माझ्या लक्षात आले की, माझा तर्क बरोबर होता. मी दिलेला गृहपाठ त्याने एक आठवडाभर एका वेळी पंधरा मिनिटे याप्रमाणे रोज दोन वेळा अगदी मनापासून केला होता. पहिले दोन दिवस, मी दिलेला गृहपाठ करणे त्याला फारच अवघड गेले होते. कारण सुरुवातीला त्याची मन स्थिती इतकी उदासवाणी होती की, कोणत्याही आनंददायक प्रतिमा स्वत.च्या मन:पटलावर रंगविणे हे काम त्याला जवळजवळ अशक्यच वाटले होते; परंतु पोहणे, फिरावयास जाणे, मासिके वाचणे इत्यादी गोष्टी एके काळी आपल्याला नक्कीच आवडत होत्या व त्याच गोष्टी आपण आता करीत आहोत, असे केवळ काल्पनिक चित्र मन:चक्षूच्या मदतीने पाहणे अशक्य असण्याचे काहीच कारण नव्हते, असे सतत स्वत.ला सागून त्याने पहिले दोन दिवस मी दिलेला गृहपाठ करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. त्यामुळे तिसऱ्या दिवशी सकाळी गृहपाठ करण्यास सुरुवात करण्याच्या वेळीच त्याच्या असे लक्षात आले की, त्याची उदासीनता थोडी कमी झाली होती. या काहीशा समाधानकारक परिणामामुळे त्याला गृहपाठ पुढे करीत राहण्यास हुरूप वाटू लागला आणि मग आठवड्यातील उरलेले दिवस त्याने अळंटळं न करता मी दिलेला गृहपाठ करण्याचा शिरस्ता चालू ठेवला.

## नवी प्रतिमासृष्टी

केवळ एका आठवड्यात आपल्या मन:स्थितीत बरीच सुधारणा झाली आहे, आपली विषण्णता कमी झाली आहे व मुख्य म्हणजे आपल्याला मन:चक्षूच्या सामर्थ्याचा उपयोग करण्यात रस वाटू लागला आहे, या जाणिवेने संजीव खूष झाला होता. शिवाय आपली स्वत:ची आणखी प्रगती कशी करून घेता येईल याबद्दल त्याला चांगलीच जिज्ञासा वाटू लागली होती. त्याचा द्विगुणित झालेला उत्साह विचारात घेऊन मी त्याच्या मनातील निराशावादी दृष्टिकोण उखडून टाकण्याची एक योजना मनाशी पक्की केली व त्या योजनेनुसार त्याच्याशी बातचीत करण्यास सुरुवात केली.

सुमारे दहा मिनिटे त्याच्याशी बातचीत केल्यावर माझ्या असे लक्षात आले की, त्याच्यापुढे कोणतेही निश्चित उद्दिष्ट नव्हते. भविष्यकाळात त्याला नक्की काय हवे होते व त्यासाठी तो काय करावयास तयार होता, याबद्दल त्याने मुळी कधी विचारच केलेला नव्हता. मी त्याच्या भावी जीवनाविषयी बोलावयास सुरुवात केल्या-

वर थोडा वेळ विचार करून त्याने मला असे सांगितले की, त्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी काही परीक्षा पास होऊन नोकरीत बढती मिळविणे, हा एक उपाय होता. तसेच नोकरी संभाळून कोणता तरी इतर उद्योग करून थोडे पैसे मिळविणे,हाही त्याची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा एक उपाय होता, असे तो म्हणाला. आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी त्याने आपणहून सुचविलेले उपाय विचारात घेऊन मी त्याला त्याच्या मनःपटलावर काही विशिष्ट प्रतिमा रंगविण्याचा सराव करण्यासाठी खालील सूचना दिल्या.

'संजीव, तू तुझ्या डोक्यात, मी आता तुला सांगतो तशी स्पष्ट मानसचित्रे रेखाटण्यास सुरुवात कर. तुझ्या कचेरीमार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षेस बसण्याचा दृढ निश्चय करून त्या दृष्टीने तू अभ्यासाला लागला आहेस. तू त्या परीक्षेसाठी लागणारी पुस्तके मिळवली आहेस. तुझ्या कचेरीतील ज्या सहकाऱ्यांनी ती परीक्षा या-अगोदर दिलेली होती, त्यांना तुझा इरादा सांगून तू त्यांचेकडून काही मार्गदर्शन मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेस. रोज रात्री जेवण झाल्यावर ८॥ ते १०॥ वाजेपर्यंत एकाग्र चित्ताने अभ्यास करण्याची शिस्त तू स्वतःला लावून घेत आहेस. तुला न समजलेल्या विषयासंबंधी तू तुझ्या कचेरीतील सहकाऱ्यांशी व वरिष्ठांशी चर्चा करीत आहेस.'

मी संजीवला वरील सूचना दिल्या तेव्हा माझ्या मनात मुख्यतः दोन हेतू होते. माझ्या मनातील पहिला हेतू असा होता की, त्याला त्याच्या नजीकच्या भविष्यकाळासंबंधी एक उद्दिष्ट निश्चित करण्यास मदत करणे आणि माझ्या मनातील दुसरा हेतू असा होता की, त्याने निश्चित केलेल्या उद्दिष्टानुसार त्याचे वर्तन घडावे म्हणून त्याच्या मनात एक नवी प्रतिमासृष्टी निर्माण करणे. अर्थात, माझ्या मनातील हे दोन्ही हेतू साध्य करण्याच्या दृष्टीने संजीवला वरील सूचना देण्यापूर्वी प्रथम त्याच्या मनातील विषण्णता कमी करण्यासाठी मी त्याला एक गृहपाठ दिला होता, तो त्याने एक आठवडाभर प्रामाणिकपणे केल्यामुळे त्याच्या मनातील विषण्णता बरीच कमी झाली होती व त्याच्या मनात मी त्याला करीत असलेल्या मार्गदर्शनाबद्दल उत्साह व जिज्ञासा निर्माण झाली होती, हे सर्व विसरून चालणार नाही.

परीक्षेची तयारी करण्यासंबंधी आपल्या मनात एक प्रतिमासृष्टी कशी उभी करावी हे माझ्याकडून नीट समजावून घेतल्यावर संजीवने माझा निरोप घेतला. त्यानंतर सहा आठवड्यांनी संजीव पुन्हा मला भेटावयास आला. त्या वेळी त्याच्या बोलण्यात उत्साह व आनंद ओतप्रोत भरला होता. त्याने अभ्यासाला तर सुरुवात केली होतीच; पण मुख्य म्हणजे त्याला इतरही अनेक गोष्टी कराव्याशा वाटू लागल्या होत्या. कचेरीमार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षा पास होणे, या उद्दिष्टाशिवाय आणखी काही उपक्रम हाती घेण्याचे त्याने ठरविले होते आणि आपली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी, ज्योतीच्या नावाने पोस्टाची सर्टिफिकिटे, युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाची युनिटस व काही कंपन्यांचे शेअर्स विकण्याचा उद्योगही त्याने चालू केला होता. शिवाय त्याच्या एकूण बोलण्यावरून मला असे आढळून आले की, त्याच्या निराशावादी दृष्टिकोणात खूपच बदल झालेला होता आणि आयुष्यात किती तरी गोष्टी करण्यासारख्या होत्या असे त्याला निदान वाटू लागले होते.



दोन वर्षांनंतर संजीव मला भेटला तेव्हा त्याने मला असे सांगितले की, कचेरीमार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांपैकी पहिली परीक्षा तर तो पास झाला होताच; पण शिवाय इतरही अनेक गोष्टी करण्यात तो निमग्न होता. ज्योतीच्या नावाने व तिच्या मदतीने चालू केलेल्या उद्योगामुळे त्याची आर्थिक स्थितीही सुधारली होती आणि तो त्याच्या कचेरीमार्फत घेतल्या जाणाऱ्या पुढील परीक्षेच्या अभ्यासाला लागला होता. इतकेच नव्हे तर त्याच्या घराजवळील एक महाविद्यालयात नाव घालून त्याने व्यवस्थापनशास्त्राच्या एका पदविकेच्या अभ्यासास सुरुवात केली होती.

वस्तुतः कचेरीत दिवसभर काम करून, संध्याकाळी महाविद्यालयात जाऊन शिकणे म्हणजे काही अगदी सोपी गोष्ट नव्हती; परंतु संजीवच्या मनातील निराशावादी दृष्टिकोणाच्या जागी आशावादी दृष्टिकोणाची पेरणी झालेली होती व त्यामुळे त्याला बरीचशी दगदग सहन करण्यात काही विशेष अडचण वाटत नव्हती. मात्र त्याने सांगितलेली एक गोष्ट मुद्दाम नमूद केली पाहिजे. ती म्हणजे, आपला आशावादी दृष्टिकोण मनात नीट रुजविण्यासाठी, त्याने आपल्या मनःपटलावर माझ्या सूचनेनुसार विधायक प्रतिमा चितारण्याचा सराव चालूच ठेवला होता.

संजीवच्या मनःस्थितीत इष्ट बदल घडून येण्यास वेळ लागला कारण तो मला प्रथम भेटावयास आला तेव्हा त्याचा सर्व जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोणच मुळी निराशावादी होता; परंतु विषण्णतेच्या आहारी गेलेल्या सर्वच माणसांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण काही इतका निराशावादी नसतो. त्यांच्या जीवनात घड-

लेल्या काही घटनांमुळे त्यांनी हाय खाल्लेली असते व म्हणून ती माणसे उदासीन व निष्क्रिय बनलेली असतात. अशा माणसांपैकी एक म्हणजे अकाली म्हातारा झालेला सुभाष ! खरे म्हणजे तो अतिशय उमद्या व मनमोकळ्या स्वभावाचा माणूस होता; परंतु एका कटू अनुभवामुळे त्याच्या चेहऱ्यावरचा सगळा आनंदच मावळला होता आणि तो जरी फक्त चाळीस वर्षांचा होता तरी मनाने मात्र अगदी म्हातारा झाला होता.

## सुभाष–सरिता

अशा कोणत्या अनुभवामुळे सुभाषमध्ये इतका बदल झाला होता? त्याचे असे झाले की, त्याला त्याच्याजवळील काही रकमेवर एकदम मोठे व्याज मिळविण्याचा मोह झाला. बँकेत, पोस्टात, खाजगी कपन्यांच्या शेअर्समध्ये वगैरे पैसे गुतवून फारसे व्याज मिळत नाही, म्हणून आपल्याजवळील रकमेवर भरपूर व्याज मिळविण्याचा एखादा मार्ग शोधला पाहिजे असे त्याने ठरविले. त्याच वेळी त्याला त्याच्या एका मित्राने एक मार्ग सुचविला. तो मार्ग म्हणजे पैसे गुप्तपणे एखाद्याला कर्ज म्हणून देणे. याचा अर्थ स्पष्ट होता तो असा की, पैसे कर्जाऊ म्हणून देण्याघेण्यासबधी सर्व व्यवहार तोंडीच करावयाचे होते. जर पैसे गुप्तपणे कर्ज म्हणून देण्याची तयारी असेल तर आजकाल एखाद्याकडे वर्षाला २६% व्याजही मिळू शकते, ही गोष्ट विचारात घेऊन सुभाषने आपल्याजवळील रक्कम गुप्तपणे कर्ज म्हणून देण्यास तयार व्हावे असे त्याला त्याच्या मित्राने सांगितले. सुभाषला २६% व्याजाचा इतका मोह सुटला होता की, त्याने आपल्या जवळील चाळीस हजार रुपये मित्राच्या सल्ल्याने एका व्यक्तीस कर्ज म्हणून गुप्तपणे देऊनही टाकले !

काही महिन्यानतर सुभाषच्या असे लक्षात आले की, त्याने कर्ज म्हणून दिलेल्या रकमेवर व्याज तर मिळणार नव्हतेच; पण कर्ज म्हणून दिलेली मूळ रक्कमही कधी परत मिळणार नव्हती. शिवाय सुभाषच्या मित्राने 'मी तुला फक्त एक मार्ग सुचविला होता आणि असा सर्व गुप्त व्यवहार केवळ विश्वासावरच अवलंबून असतो असेही स्पष्टपणे सांगितले होते.' असे म्हणून आपले अंग त्या प्रकरणातून केव्हाच काढून घेतले होते. साराश, पैशाच्या मोहाला बळी पडून सुभाषने फार मोठी खोट खाल्ली होती !

याच घटनेमुळे सुभाषच्या मनातील सर्व आनंद व उत्साह नाहीसा झाला होता व त्याचा चेहरा विषण्णतेने काळवंडला होता. आपण इतका मूर्खपणा कसा केला ? असे वारवार स्वतःला विचारून, तो स्वत.ला छळून घेऊ लागला. त्याला इतर कोणत्याच गोष्टीत रस वाटेनासा झाला. त्याच्या मनात त्याने सोसलेल्या आर्थिक नुकसानीसंबंधीच्या विचाराचे असे काही वादळ उठले होते की, त्यामुळे त्याची झोपही उडाली होती. साहजिकच तो कामावर जात असे तेव्हाही त्याची मन.स्थिती इतकी उदास असे की, कामात त्याचे धड लक्षही लागत नसे. त्याचे सर्व जीवनच जणू काही उद्ध्वस्त झाले होते.

सुभाष मला भेटावयास आला तेव्हा त्याच्या बोलण्यावरून एक गोष्ट माझ्या चटकन लक्षात आली. ती म्हणजे आर्थिकदृष्ट्या त्याचे फार मोठे नुकसान झाले होते, तरी तो काही कफल्लक झालेला नव्हता. त्याला चागली नोकरी होती व त्याची बायकोही नोकरी करीत होती. म्हणजे जरी आर्थिकदृष्ट्या त्याचे मोठे नुकसान झाले होते, तरी तो काही अगदी रसातळाला गेलेला नव्हता. त्यामुळे त्याला त्याच्या विषण्णतेवर मात करण्यास शिकविताना मी त्याला खालील सूचना दिल्या.

'सुभाष, तू प्रथम डोळे मिटून स्वस्थपणे या खुर्चीत अगदी आरामात बस. आता अशी कल्पना कर की, तू एका होडीत बसला आहेस; परंतु ही काही साधी होडी नाही, ही एक जादूची होडी आहे. ही होडी पाण्यावरून प्रवास करीत नाही. ही जादूची होडी असल्यामुळे ती कालप्रवाहावरून प्रवास करते. तेव्हा तू जर या होडीची दोन्ही वल्ही जोरात चालविलीस, तर ही होडी तुला भविष्यकाळात घेऊन जाईल. शाबास ! वल्ही जोरात चालव आणि तुझी होडी कालप्रवाहावरून आजपासून चार आठवडे पुढे गेली आहे अशी कल्पना कर. तुला तुझा महिन्याचा पगार मिळत आहे...आता वल्ही जोरात चालवून तू तुझी होडी कालप्रवाहावरून आणखी पाच महिने पुढे नेली आहेस म्हणजे तू चाळीस हजार रुपये घालवून बसल्याला आता सहा महिने होऊन गेले आहेत. अर्थात दर महिन्याला तुला तुझा पगार मिळत गेला आहे आणि आता कालप्रवाहातील त्या ठिकाणावरून तू मागे वळून पाहत आहेस... ठीक ! आता तुझ्या जादूच्या होडीतून प्रवास करीत करीत तू तीन वर्षे पुढे गेला आहेस व मागे वळून पाहत आहेस... तुला काय दिसते आहे बरे ?'

मी दिलेल्या सूचना ऐकून सुभाष काही वेळ तसाच डोळे मिटून स्वस्थपणे बसून राहिला व नतर तो मला काय म्हणाला ते पाहा :

'पहिली गोष्ट म्हणजे मी तीन वर्षांत कोणतीही रक्कम खूप मोठे व्याज मिळण्याच्या हव्यासाने, कोणालाही गुप्तपणे कर्ज म्हणून दिली नाही. मी माझे पैसे बँकेत व पोस्टाच्या अधिकृत योजनामध्ये गुतविले आहेत. एकूण मी एक चांगला धडा शिकलो किंवा शहाणपणा शिकलो ! अर्थात, त्यासाठी मला मोठी किंमत मोजावी लागली हे खरे; पण शहाणपणाही काही कमी शिकलो नाही, असे मला मागे वळून पाहिल्यावर दिसू लागले.'

त्यानतर सुभाषने डोळे उघडले व आम्ही दोघांनी काही वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्यावर त्याने माझा निरोप घेतला. तो जात असताना त्याच्या चेहऱ्यावरून असे दिसत होते की, त्याच्या मनातील उदासीनता बरीच कमी झाली होती. दोन आठवड्यानतर त्याने पत्र लिहून मला असे कळविले की, कालप्रवाहावरून प्रवास करणाऱ्या जादूच्या होडीची कल्पना त्याला एकदम पसत पडली होती आणि त्या होडीतून मधूनमधून सफर करून त्याने आपली विषण्णता झटकून टाकली होती.

जीवनात घडणाऱ्या काही कटु प्रसंगांमुळे विषण्णतेच्या आहारी जाणाऱ्या व्यक्तीचे आणखी एक उदाहरण म्हणजे सरिता. तिच्या प्रेमभगाची कहाणी एखाद्या नाटकात किंवा सिनेमात शोभेल अशीच होती. ती अहमदनगरला आपल्या आई–वडिलांबरोबर राहणारी मुलगी. तिचा प्रियकरही अहमदनगरचाच होता; परंतु तो पुण्याला वसतिगृहात राहून वैद्यकीय महाविद्यालयात शिकत होता. त्यामुळे लहान–मोठ्या सुट्टीत तो अहमदनगरला जात असे. तेव्हा सरिता त्याच्याबरोबर हिंडत–फिरत असे. शिवाय त्या दोघाचा पत्रव्यवहारही प्रेमिकांना साजेल अशाच प्रकारे चालू होता.

अखेर सरिताच्या प्रियकराचे शिक्षण संपले व तो डॉक्टर झाला, परंतु सरिताशी विवाह करण्यासबंधी तो काहीच बोलेनासा झाला आणि एक दिवस त्याने सरिताला स्पष्टच सागितले की, आता तो तिच्याशी विवाह करू इच्छित नव्हता ! त्याचा हा निर्णय ऐकून, सरिताचे हृदय प्रेमभंगामुळे विदीर्ण झाले होते व तिला जीवनाचा उबग आला होता.

सरिता मला भेटली तेव्हा तर तिने मला असे सागितले की, केवळ आत्महत्या करण्याचे धैर्य तिच्याजवळ नव्हते म्हणून ती जिवत होती इतकेच ! आणि खरे म्हणजे मला भेटावयास येण्याचीही तिची इच्छा नव्हती; परंतु ती मुबईला आलीच होती म्हणून तिच्या मावसभावाने तिला फारच आग्रह केल्यामुळे ती मला भेटावयास आली होती. मी तिच्याशी बोलता बोलता तिचे शिक्षण, छद व इतर आवडी–निवडी इत्यादी गोष्टीविषयी जमेल तेवढी माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. प्रथम तिचा एकूण सूर असा होता की, कसले शिक्षण अन् कसले छंद ! कशात मुळी काही अर्थच उरला नव्हता. तरीसुद्धा माझ्या असे लक्षात आले की, ती बी. ए. झाली होती. इतकेच नव्हे तर तिला सगीताची आवड होती व तिने काही वर्षे गायनाचे पद्धतशीर शिक्षणही घेतलेले होते. शिवाय तिला लेखनाची आवड होती व तिच्या तीन लघुकथा प्रसिद्धही झाल्या होत्या. तिच्याविषयीची ही माहिती लक्षात घेऊन मी असे ठरविले की, तिला कालप्रवाहावरून प्रवास करणाऱ्या जादूच्या होडीतून सफर कशी करावी हे शिकविणे हितकारक ठरेल.

माझे काम थोडें कठीणच होते. कारण सरिता इतकी निराश झालेली होती की, स्वतःची परिस्थिती सुधारण्यासाठी काही करावे, असे तिला वाटतच नव्हते आणि केवळ तिच्या मावसभावाच्या आग्रहाखातर ती माझ्याकडे आली होती, हे तिने मला अगोदरच सांगितले होते. तथापि, एवीतेवी तू माझ्याकडे आलीच आहेस तर एक प्रयोग करून पाहण्यास काय हरकत आहे, असे सुचवून थोड्या प्रयत्नाने मी तिचे मन वळविण्यात यशस्वी झालो. नंतर मी तिला खालील सूचना दिल्या.

'सरिता, प्रथम डोळे मिटून तू या आरामखुर्चीत नीट रेलून, स्वस्थ बस. आता अशी कल्पना कर की, तू एका होडीत बसली आहेस; परंतु ही काही पाण्यावरून प्रवास करणारी होडी नाही. ही एक जादूची होडी आहे व ती कालप्रवाहावरून प्रवास करते तेव्हा तू या जादूच्या होडीची दोन्ही वल्ही चालवून, भविष्यकाळात फेरफटका मारावयास जाऊ शकतेस. आता तू दोन्ही हातानी वल्ही चालविण्यास सुरुवात करून भविष्यकाळात प्रवेश कर. या होडीतून तू आजपासून एक महिन्यानतरच्या काळात प्रवेश केला आहेस. त्या वेळी तू काय करीत असशील असे तुला वाटते ?

अर्थात तुला वाटले तर तू तुझ्या मनःपटलावर असे चित्र रंगवू शकतेस की, एका महिन्यानतरही तू झाल्या-गेल्या गोष्टीबद्दल तेच तेच विचार करून स्वतःला विषण्ण व दुःखी-कष्टी करून घेत आहेस; परंतु तू तुझ्या मनःपटलावर असेही चित्र रंगवू शकतेस की, एक महिन्यानंतर तू एक लघुकथा लिहिण्यात मग्न झाली आहेस. जशी जशी तुझी लेखनात प्रगती होत आहे, तशी तशी तुझी मनःस्थिती सुधारत आहे प्रेमभंगामुळे तुझ्या वाट्याला आलेले दुःख इतके भयंकर नाही, हे तुझ्या लक्षात आले आहे आणि आता तू रोज काही वेळ चांगले संगीत ऐकण्यात घालविण्याचे ठरविले आहेस. शिवाय तू असेही ठरविले आहेस की, तुझ्या स्वतःच्या संगीतसाधनेत जरी काही वर्षे खंड पडला आहे, तरी पुन्हा एकदा तू त्या साधनेकडे वळावयास हरकत नाही.

चल, तुझ्या हातातील वल्ही पुन्हा चालविण्यास सुरुवात कर आणि कालप्रवाहावरून, तुझ्या होडीतून तू आजपासून सहा महिने पुढे जा. त्या वेळी तू काय करीत असशील व तुझी मनःस्थिती कशी असेल, याविषयीचे चित्र तू तुझ्या मनःपटलावर रेखाटून पाहा ! '

वरीलप्रमाणे सरिताला जादूच्या होडीत बसून, कालप्रवाहावरून भविष्यकाळात फेरफटका करण्याची पद्धत शिकविल्यानंतर मी तिच्या प्रतिक्रिया समजावून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा तिच्या बोलण्यावरून, एक गोष्ट स्पष्ट झाली. ती म्हणजे तिला असे वाटू लागले होते की, सध्या ती कितीही निराश झालेली असली तरी अजून सहा महिन्यांनंतरही तिने तसेच उदासीन व निराश राहणे काही अपरिहार्य नव्हतें. तिच्या प्रतिक्रियातून व्यक्त झालेला धागा पकडून मी तिला असे विचारले की, तिने अहमदनगरला परत


" मला शक्य असते तर मी या ग्रंथाच्या लाख प्रती काढून ग्रामीण भागातील मुलाबाळांच्या हाती पडतील अशी व्यवस्था केली असती. "
– कलकत्त्याहून **श्री. बा. जोशी**

' कार्व्हर ' पहिल्या आवृत्तीचे असे उत्फूर्त व भरघोस स्वागत झाले.

मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी शाळांसाठी – शिक्षणसंस्थांसाठी या ग्रंथाची शिफारस केली.

**दुसरी आवृत्ती**

**एक होता कार्व्हर** सौ. वीणा गवाणकर

मूल्य : तीस रुपये

**राजहंस प्रकाशन** १०२५ सदाशिव, पुणे ३०

गेल्यावर जादूच्या होडीत बसून भविष्यकाळात सफर करण्याचा सराव करण्यास काय हरकत होती? त्यावर ती म्हणाली की, तसे करावयास हरकत तर काहीच नव्हती. उलट अशा नौकाविहारामुळे ती एक दिवस बहुधा काही लिहिण्याचा प्रयत्न करू शकेल. आमच्या भेटीची वेळ संपली होती व माझे कामही झाले होते. सरिता माझा निरोप घेऊन निघून गेली.

सरिताचे नंतर काय झाले, हे अगदी थोडक्यात सांगावयाचे म्हणजे काही महिन्यांनी मला तिने तिच्या प्रसिद्ध झालेल्या एका नव्या लघुकथेची प्रत, पोस्टाने पाठविली

प्रेमभंगामुळे जेव्हा एखाद्या व्यक्तीचे हृदय विदीर्ण झालेले असते, तेव्हा ती व्यक्ती कशी वैफल्यग्रस्त होते, हे समजावून घेण्यासाठी सरिताचे उदाहरण उपयुक्त ठरेल. प्रेमभंग झालेली व्यक्ती, मनातल्या मनात काय करीत असते बरे? आपण इतके मूर्ख कसे? आपण आपल्या जोडीदाराच्या भूलथापांना कसे भुललो? आपल्या जोडीदाराच्या तुलनेने, आपण खरोखरच नालायक तर नाही ना? इतर माणसेसुद्धा आपले वागणे कसे तरी सहन करतात, अशी तर वस्तुस्थिती नाही ना? आपल्याला कधी कोणावर खरे प्रेम करता येईल का? आणि आपल्यावर कोणी कधी खरे प्रेम करू शकेल काय? असे अनेक प्रश्न स्वतःला सतत विचारून, प्रेमभंग झालेली व्यक्ती स्वतःला अतोनात छळीत असते.

प्रेमभंगामुळे निराश व वैफल्यग्रस्त झालेली व्यक्ती कमालीची विषण्ण झालेली असते, याला आणखीही एक कारण आहे. ते म्हणजे प्रेमभंग झालेल्या व्यक्तीचा असा पक्का समज झालेला असतो की, आपल्या जोडीदाराशिवाय आपल्याला या जगात सुखी होताच येणार नाही. इतकेच नव्हे तर आपल्याला आपल्या जोडीदाराशिवाय जीवन जगणेही अशक्य आहे! अशा वेळी प्रेमभंग झालेल्या व्यक्तीचे लक्ष तिला आनंद मिळवून देईल अशा एखाद्या गोष्टीकडे वेधणे हिताचे ठरते आणि यासाठी जादूच्या होडीत बसून भविष्यकाळात फेरफटका करण्याची पद्धत उपयुक्त ठरते. प्रेमभंग झालेल्या व्यक्तीने तिच्या जीवनातील आजच्या घटनेकडे, एका वर्षानंतरच्या, दोन वर्षांनंतरच्या किंवा तीन वर्षांनंतरच्या टप्प्यावरून पाहण्याचा सराव केला, तर हळूहळू त्या व्यक्तीच्या असे लक्षात येऊ लागेल की, हे जग बहुरंगी आहे व त्यात असंख्य माणसे आहेत आणि त्यांपैकी फक्त एकाच माणसावर आपले सर्व सुख अथवा जीवन अवलंबून ठेवणे वेडपटपणाचे आहे. शिवाय जग बहुरंगी असल्यामुळे, माणूस अनेक प्रकारच्या कृतीमध्ये रममाण होऊन सुखी जीवन जगू शकतो.

जादूच्या होडीतून भविष्यकाळात प्रवास करून प्रेमभंग झालेल्या व्यक्तीने एखाद्या कामात रममाण होऊन आपल्याला आनंद मिळू शकतो हे मनःचक्षूच्या सामर्थ्याने अनुभवले की, तिने अर्धी लढाई जिंकली, असे म्हणावयास हरकत नाही. आपल्याला कोणती तरी कृती करण्यात आनंद मिळू शकतो, हे त्या व्यक्तीने आपल्या मनःचक्षूच्या सहाय्याने पाहण्यास सुरुवात केली की, त्या व्यक्तीला एखादी आनंददायक कृती प्रत्यक्ष करून पाहण्यास उत्तेजन मिळते आणि एकदा का त्या व्यक्तीला एखादी कृती प्रत्यक्ष करून आनंद प्राप्त करून घेता आला की, तिच्या मनःस्थितीत सुधारणा होण्यास वेळ लागत नाही. म्हणूनच मला जेव्हा सरिताने लिहिलेली नवी लघुकथा पोस्टाने मिळाली, तेव्हा मी सरिताच्या पुढील प्रगतीबद्दल निःशंक झालो.

सरिताने जादूच्या होडीत बसून भविष्यकाळात फेरफटका मारण्याच्या पद्धतीचा उपयोग कसा केला, ते आपण पाहिलेच आहे; परंतु याचा अर्थ असा नाही की, त्या पद्धतीचा उपयोग फक्त प्रेमभंगामुळे निराश झालेल्या माणसांनाच करता येतो. कोणत्याही कारणामुळे विषण्णतेच्या व नैराश्याच्या अधीन गेलेल्या माणसाला या पद्धतीचा उपयोग करून आपल्या जीवनात इष्ट बदल करता येणे शक्य आहे. कारण या पद्धतीचे मत म्हणजे माणूस मनःचक्षूच्या सामर्थ्याने आपल्या पूर्वीच्या आयुष्यातील अथवा सध्याच्या आयुष्यातील अप्रिय घटनाकडे भविष्यकाळातील एखाद्या टप्प्यावरून पाहू शकतो आणि अशा प्रकारे मनःचक्षूचा उपयोग करून त्याला आपले पुढील आयुष्य अधिक सुखी व बहुरंगी करण्यासाठी काय करता येईल, यावर लक्ष केंद्रित करता येते. □

(क्रमशः)


# फिडेल, चे आणि क्रांती

अन्याय, जुलुम–जबरदस्ती व भ्रष्टाचाराची सीमा झाली की क्रांती अटळ ठरते. क्यूबन क्रांती हे त्याचे ढोबळ उदाहरण. संपूर्ण लॅटिन अमेरिका ढवळून काढणाऱ्या या क्यूबन क्रांतीचा इतिहास.

अरुण साधू

आवृत्ती : दुसरी

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

# नाट्यपंढरी



## मी गहाण राहीन !

शंकरराव मुजुमदार हे मराठी नाट्यसृष्टीतले एक जबरदस्त व्यक्तिमत्त्व ! रंगभूमीचा किमान पन्नास वर्षांचा इतिहास त्यांचे नाव न घेता लिहिताच येणार नाही ! १८८० त ते रूपसुंदर 'शकुंतला' म्हणून रंगभूमीवर आले. मग रुक्मिणी (सौभद्र) त्यांच्या नावावर जमा झाली. गंमत अशी की, त्यांना गाता येत नसूनही त्यांनी या भूमिका सर्वांगसुंदर वठविल्या. पुढे भाऊराव कोल्हटकर आल्यावर शकुंतला गाती झाली; पण रुक्मिणी मात्र आजतागायत तशीच्या तशीच – शंकररावांसारखीच स्वरूपगर्वा राहिली ! नट म्हणून शंकरराव पडद्याआड लवकर गेले; पण 'किर्लोस्कर संगीत मंडळी'चे मालक म्हणून त्यांची कारकीर्द दीर्घकाळ गाजली. शंकरराव मोठे कल्पक नि कर्तबगार होते. 'रंगभूमी' मासिक त्यांनीच सुरू केले. नाटकांचे नांदते घर किर्लोस्कर थिएटर (आताचे वसंत टॉकीज) त्यांच्याच कर्तबगारीने उभारले गेले ! त्यांचा सर्वत्र दबदबा नि दरारा असे. बोडस, बालगंधर्व, मा. दीनानाथ आदी सर्व कलावंत त्यांना भिऊन असत. (हे सर्व कलाकार आधी किर्लोस्कर कंपनीचेच.) गडकरी तर त्यांना फारच भीत असत. कदाचित शंकरराव मालक असताना ते डोअरकीपर होते म्हणून असेल ! गडकरी त्यांना पितृस्थानी मानीत. गडकरी विडीबहाद्दर; पण नानांपुढे (शंकरराव) चुकूनसुद्धा कधी विडी ओढीत नसत ! गडकऱ्यांचे लेखनगुण अचूक हेरून शंकररावांनी ते फुलविले. त्यांना लेखनप्रवृत्त केले. रंगभूमी मासिकात ते लिहू लागले.

गडकरी किर्लोस्कर कंपनीसाठी 'पुण्यप्रभाव' लिहीत होते, तेव्हा तर खूपच गंमत होई. नाटकमंडळीच्या बिऱ्हाडी गडकरी आपल्या मित्रमंडळीत गप्पा मारीत असता, 'काय गडकरी, कुठपर्यंत आलंय ?' असा दुरून शंकररावांचा आवाज आला की, गडकरी थंडी वाजत असल्याचे सोंग करून तोंडावर पांघरूण घेऊन झोपून जात ! शंकरराव निघून गेले की, पुन्हा त्यांच्या गप्पा रंगात येत. शंकररावांना त्यांची ही क्लृप्ति माहीत होती. त्यांचा हेतू त्यांना लिहिते करणे एवढाच असे.

पण पुढे पुढे शंकररावांकडून गडकऱ्यांची कळत न कळत हेळसांड होऊ लागली. गडकऱ्यांनी पाच-दहा रुपये खर्चाला मागितले, तरी ते चालढकल करीत. इतकेच काय एकदा रागारागाने, गडकऱ्यांनी विड्यांसाठी एक आणा मागितला, त्यावर काहीही न बोलता, मख्खपणे ते एवढेच म्हणाले, कोण आहे रे तिकडे, गडकऱ्यांच्या खोलीत एक शंभर विड्यांचं बंडल नेऊन ठेव !' सहाजिकच गडकऱ्यांना तो अपमान वाटला.

गडकऱ्यांना 'किर्लोस्कर' मंडळीचा जाज्वल्य अभिमान ! बालगंधर्व, बोडस, टेंबे निघून गेले, तरी किर्लोस्कर कंपनी त्याच थाटात चालली पाहिजे, याच ईर्षेने त्यांनी 'पुण्यप्रभाव' ल्याहायला घेतले होते. ते सदैव 'किर्लोस्कर'चीच बाजू घेत; पण शंकररावांकडून, आपल्या नानांकडून मिळणाऱ्या विचित्र वागणुकीमुळे ते बिथरून गेले होते. त्यांनी पुण्यप्रभावाच्या लेखनापोटी, कंपनीकडून काही रक्कम उचलली होती; पण नाटक लिहून होईना म्हणून शंकररावांनी तगादा लावला, तेव्हा गडकरी रागाच्या भरात म्हणाले, 'माझी लहर लागेल तेव्हा लिहीन. तुम्हाला धीर नसेल तर पैसे परत करीन!' शंकरराव पक्के व्यवहारी. ते लगेच म्हणाले, 'करा पैसे परत !' पण गडकऱ्यांजवळ पैसे कुठे होते ? तरी तिरमिरीत म्हणाले, 'गहाण राहीन नि पैसे परत करीन!' खिशात पैसे नसले की, गहाण रहाण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात अनेकदा येई. या वेळी मात्र ते रागाने कंपनी सोडून गोव्याहून निघाले ते मालवणला मामा वरेरकरांकडे गेले. मामांना सर्व हकीगत सांगितली; पण इथे एकादशीच्या घरी शिवरात्र पाहुणी अशातली गत ! तरी पण मामांनी आपल्या मित्रांकडून पैसे घेऊन मास्तरांना कर्जाऊ दिले नि गरज भागविली. मास्तरांनी कागद लिहून दिला तो असा—

'मी राम गणेश गडकरी, रहाणार पुणे, हल्ली मुक्काम मालवण, रा. रा. भार्गव विठ्ठल वरेरकर, रहाणार मालवण यांस लिहून देतो की, आपणाकडून आज तारीख १, माहे मे १९१४ रोजी माझ्या अडचणीकरिता (शंकरराव मुजुमदार यांस देण्याकरिता) १२० अक्षरी एकशेवीस रुपये एक महिन्याचे कराराने घेत आहे. ते एक महिन्याने, शेकडा चार टक्केप्रमाणे पोचते करीन. तारीख १ मे, १९१४.'

साक्ष— महादेव गोपाळ डांगी दस्तुर खुद्द
राम गणेश गडकरी दस्तुर खुद्द.

या सर्व प्रकरणात, 'भारत नाटक मंडळी' सोडून 'किर्लोस्कर'मध्ये आलेल्या चिंतामणराव कोल्हटकरांचा जीव खालीवर होत होता. गडकऱ्यांच्या सहवासाच्या लोभानेच ते 'किर्लोस्कर'मध्ये दाखल झाले होते; पण त्याच वेळी मास्तर कंपनी सोडून नेमके बाहेर पडलेले ! पुण्याच्या वास्तव्यात लिहून झालेले पुण्यप्रभाव त्यांनी वाचले होते. मास्तरांच्या तोंडून ऐकले होते. त्यावर त्यांचा जीव जडला होता; पण आता हे नाटक आपल्याला मिळणार नाही, म्हणून त्यांचा जीव हळहळत होता. ते सारखे शंकररावांच्या पाठीशी लकडा लावीत होते. 'मास्तरांची समजूत घाला; पण ते नाटक आपल्याकडे आणा!' त्यावर शंकरराव त्यांना एक दिवस म्हणाले, 'कोल्हटकर, तुम्ही बिलकुल काळजी करू नका. अहो, मास्तर आपल्याशिवाय दुसऱ्या कुणाला नाटक देणारच नाहीत. अहो, आपले ऋणानुबंधच तसे आहेत. किर्लोस्कर कंपनी हे मास्तरांचे दैवत आहे !'

अखेर शंकररावांचे व्यवहारी भविष्य नि अनुभवाचे बोल खरे ठरले. गडकऱ्यांचे नाटक किर्लोस्कर कंपनीकडेच आले. मास्तर स्वत: 'किर्लोस्कर'चे कैवारी म्हणून भांडण विसरले. शंकरराव सुखावले. चिंतामणराव आनंदात न्हाऊन निघाले. असा हा 'पुण्यप्रभाव'चा पुण्यप्रभाव !

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28


# जानेवारी ते जून मधील दहा राजहंस प्रकाशने

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव
पुणे ४११ ०३०

**आपली मुलं**
**शोभा भागवत** । वीस रुपये.
☐ आपली मुलं लहानाची मोठी होत असताना त्यांच्याकडे पाहण्याचा, त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व देण्याचा दृष्टिकोन देणारं पुस्तक.

**फिडेल, चे आणि क्रांती**
**अरुण साधू** । आवृत्ती दुसरी । बावीस रुपये.
☐ जुलमी राजवटींच्या टाचांखाली दडपल्या-चिरडल्या गेलेल्या लॅटिन अमेरिकन समाजाला नवी स्वप्ने देऊ करणाऱ्या एका क्रांतिचा इतिहास.

**तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय !**
**डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर** । वीस रुपये.
☐ विज्ञानातील अनेक आश्चर्यकारक नव्या गोष्टी, नवे प्रयोग तुम्हाला सोप्या भाषेत समजून-उलगडून दाखविणारे पुस्तक.

**विज्ञानेश्वरी**
**डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर** । वीस रुपये.
☐ किचकट गणितांच्या आणि अवघड प्रमेयांच्या, दाट जंगलातून मूलभूत शास्त्रीय सिद्धांताच्या पाऊलवाटा शोधणारे- खास ललितशैलीतील पुस्तक.

**राजहंस विद्यार्थी दैनंदिनी**
**सं. डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर** । पंधरा रुपये
☐ हसत-खेळत मुलांना विज्ञानयुगातील बिरवल बनवणारी -शाळेतील अभ्यासाला पूरक अशी दैनंदिनी.

**बलसागर**
**श्री. ग. माजगावकर** । तीस रुपये.
☐ राष्ट्रवादी भूमिकेतून नव्या क्षितिजांचा घेतलेला शोध.

**डॉ. आयडा स्कडर**
**सौ. वीणा गवाणकर** । बावीस रुपय.
☐ ग्रामीण भागात डॉक्टरी सेवा नेण्याचा प्रयत्न भारतात प्रथम डॉ. आयडांनी केला. त्यांच्या त्यागमय जीवनाची कहाणी.

**पूर्णिया**
**अनिल अवचट** । आवृत्ती तिसरी । बारा रुपये.
☐ अलिप्तपणे तरी भेदकतेने घडवलेले बिहारच्या माणसाचे दर्शन.

**लेक वालेसा**
**डॉ. श्रीकांत मुंदरगी** । बावीस रुपये
☐ लेक वालेसा आणि पोलिश जनता यांनी रशियन दडपशाहीविरुद्ध दिलेल्या लढ्याचे चित्रण-मराठीत प्रथमच.

**मला निसटलंच पाहिजे !**
अनु. **श्रीकांत लागू** । वीस रुपये
☐ इतिहासाच्या त्या धामधुमीच्या काळात, एका हुकुमशहाच्या मगरमिठीतून, जिवावर उदार होऊन, मृत्यूला पाठीशी घेत, ते निसटले व भारताच्या सुरक्षित भूमीत उतरले. त्यांच्या अतुलनीय साहसाची कथा.